नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचें
मुखपत्र

युगवाणी

अकोला संमेलन
खास अंक

एप्रिल १९५१



श्री. गजानन त्र्यम्बक माडखोलकर,
अध्यक्ष—विदर्भ साहित्य संमेलन, अकोला १९५१.

या अंकांत—


संपादक :
वामन चोरघडे.

वर्ष ६ वें.

अंक ४ था
किंमत आठ आणे


अनुक्रमणिका

वि. सा. सं. कोनशिला समारंभ पूजनविधी.



ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र पूजा करीत असून
श्री. सगदेव त्यांना सप्तगंगेचें पाणी दर्शवित आहेत.

वि. सा. संघाची कोनशिला.




वि. सा. सं.चे पेट्रन श्रीमंत बाबुराव देशमुख




अनुक्रमणिका

विजयादशमी—१९५०
विदर्भ साहित्य संघाच्या जागेवरील भूमिपूजन




उजवीकडून—रा. पु. सगदेव, वामन चोरघडे, न्या. मंगळमूर्ति, श्री. कुळकर्णी, संघाध्यक्ष—श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. डोळके, श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. यशवंत शास्त्री, श्री. पटवर्धन, डॉ. वि. भि. कोलते.

रामनवमी—१५-४-१९५१
कोनशिलान्यासाचा समारंभ



पं. द्वारकाप्रसाद मिश्र, शिक्षण मंत्री, मध्यप्रदेश, शिळा ठेवीत आहेत.



केला असला तरी पां
अधिकरणांतील अ
अधिकरणांत कांही
५।१२० व ६।२
मधील अनुच्छेद २

(३) सर्व वि
या विषयापुरती तरी
विचार करून इष्ट घ
पासूनच लागावें.


(४) भाषाघ
केली तरी चाललें अ
घडवून आणण्याचे प्र

विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण झाल्यावर अशी दिसेल.

आराखडा—श्री. भाईसाहेब करंजगांवर.

अनुक्रमणिका


चार संमेलनाध्यक्ष—पुसद ते अकोला




श्री. पु. य. देशपांडे (पुसद) डॉ. मा. गो. देशमुख (चांदा) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर (अकोला) डॉ. वि. भि. कोलते (गोंदिया)

★

वि. सा. सं.च्या १९५१च्या अध्यक्ष



प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे.



अनुक्रमणिका

आतांपासूनच सावध राहून लक्ष्य द्या !

म. म. दत्तो वामन पोतदार

※

[मराठी भाषेच्या बाबतींत आपले घटनात्मक हक्क काय आहेत ? महाराष्ट्रियांचें कर्तव्य काय आहे ? त्यांनी काय केलें पाहिजे ? म. म. दत्तो वामन पोतदारांनी अधिकारयुक्त वाणीने याबाबत केलेलें मार्गदर्शन महत्वाचें आहे.—संपा० युग०]

आपल्या देशाचा कारभार आज जरी बहुतांशी इंग्रजीत चालत असला तरी नवीन घटनाकायद्याप्रमाणे इंग्रजीच्या जागीं भारताची राजकाजभाषा हिंदी असल्याचें ठरलें आहे. घटनेच्या सतराव्या अधिकरणांत (पार्ट=अधिकरण; चॅप्टर=विभाग, आर्टिकल=अनुच्छेद) हे निर्णय समाविष्ट केलेले आहेत.

(२) सतराव्या अधिकरणांत जरी भाषाधोरणाचाच स्वतंत्रपणे निर्णय केला असला तरी पांचव्या अधिकरणांतील अनुच्छेद १२० वा आणि सहाव्या अधिकरणांतील अनुच्छेद ११० वा ह्यांचाहि या प्रकरणीं संबंध येतो. सतराव्या अधिकरणांत कांहीहि म्हटलें असलें तरी तें बाजूस ठेवून चालण्याचा अधिकार ५।१२० व ६।२१० मध्यें देण्यांत आलेला आहे. तसेंच अधिकरण ३ मधील अनुच्छेद २९ व ३० हेहि अंशमात्राने या प्रकरणीं लक्षांत घेतलेले बरे.

अधिकाराचा वेळींच उपयोग करा

(३) सर्व विचारी व देशहितैषी मंडळींनी मूळ संविधान किंवा घटना मुद्दाम या विषयापुरती तरी पहावी आणि संभाव्य इष्टानिष्ट परिणामांचा एव्हांपासूनच विचार करून इष्ट धोरणाचा निर्णय करावा व त्याप्रमाणे लोकजागृतीस आतां-पासूनच लागावें.

(४) भाषाधारी राज्यरचना मान्य झाली असती तर इतकी पंचाईत न केली तरी चाललें असतें. पण सांप्रत तरी ती गोष्ट लांबणीवर पडली आहे. ती घडवून आणण्याचे प्रयत्न केव्हांहि शिथिल करतां कामा नयेत. परंतु त्याच वेळीं प्रस्तुत येथे उपस्थित केलेला प्रश्नहि तितकाच किंबहुना अधिक तांतडीचा व महत्वाचा आहे. पूर्वी भाषाधारी राज्यरचनेची मागणी साहित्य संमेलनांतून करावी लागत होती; तशीच या विषयाचीहि व्यवस्था करावी लागेल. हा प्रश्न

राजकीय कारभार करणारी सत्ताधीश मंडळेंच सोडविणार; पण त्याचें महत्व वेळींच लक्षांत घेण्याचें ते टाळतील अशी भीति अगदीच अनाठायीं म्हणतां येणार नाही. तेव्हां निदान आपलें काम तरी आपण करावें.

(५) ज्याप्रमाणे भाषावारी राज्यरचना आम्हांला लोकशाही संपन्न करण्यासाठी हवी, तसेंच या प्रकरणींहि आमचें म्हणणें आहे. भारताची घटनाहि त्याच कारणांसाठी प्रवर्तित झाली आहे. म्हणून घटनेंत जे अधिकार किंवा सोयी दिलेल्या आहेत त्यांचा जर नीट आणि वेळींच उपयोग केला नाही तर पस्तावण्याची पाळी आपणांवर आल्याशिवाय राहणार नाही.

लोकसभेच्या कारभारांत हिंदीची सोय

(६) अधिकरण सतरा यांत कांहींहि म्हटलें किंवा ठरविलें असलें तरी अनुच्छेद १२० मध्यें निर्णय केला आहे कीं, पार्लमेंट अथवा भारतीय लोकसभा— या लोकसभेचीं दोन अंगें आहेत--आपला कारभार-बिझिनेस-हिंदींत किंवा इंग्रजींत चालवील. घटना अंमलांत आल्यापासून पंधरा वर्षांच्या आंत पार्लमेंटने कायदा करून व्यवस्था न केल्यास इंग्रजी आपोआप गळून पडेल आणि फक्त हिंदींतूनच पार्लमेंटचें कामकाज चालेल. तसा कायदा करून पंधरा वर्षांपलिकडेहि इंग्रजी चालू ठेवण्याची सवलत सतराव्या अधिकरणांतील अनुच्छेद ३४३ मध्यें आहे.

अनु. १२० मधील या तजविजीस फक्त अनु. ३४८ मधील बंधनें लागू राहतील. अनु. ३४८ मधील हीं बंधनें भारतीय अधिन्यायालयांतील कारभार आणि पार्लमेंटांतील कारभार, कायदेकानू, हुकुम, वटहुकुम वगैरे पार्लमेंटने कायदा करून निर्णय घेईपावेतों इंग्रजींतच चालतील अशा अर्थाचीं आहेत. पार्लमेंटला कायदा करून भारत सरकारची चालू व्यवहारभाषा जी इंग्रजी ती बदलतां येईल. तसें होईपावेतों घटनाजन्मापासून पंधरा वर्षेपर्यंत चालू व्यवस्थाच चालवावी लागेल असें बंधन अनु. ३४३ मध्यें आहे. मात्र अनु. ३४३ ने भारतीय लोकसभेच्या अध्यक्षांना या मदती पूर्वींहि इंग्रजीच्या जोडीला हिंदी चालू करण्याचा अधिकार दिला आहे.

याप्रमाणे भारतीय लोकसभेच्या कारभारांत हिंदी प्रविष्ट होण्याची सोय आणि बंधनें अनु. १२० व अनु. ३४३ व ३४८ लक्षांत घेऊन कशी होऊं शकेल तें आपण पाहिलें.

राज्यविधिमंडळाचें काय ?

(७) भारतीय लोकसभेप्रमाणेच राज्यविधिमंडळांनाहि असाच अधिकार अनु. २१० (अधि. ६) अन्वय देण्यांत आला आहे. फरक इतकाच कीं अनु. १२० प्रमाणे हिंदी किंवा इंग्रजी अशी अनुज्ञापक व्यवस्था भारतीय लोकसभेच्या कारभारासाठी निश्चित केली आहे तर अनु. २१० हा राज्यविधिमंडळांना तीच अनुज्ञापक सत्ता देतांना हिंदी किंवा इंग्रजी यांच्या जोडीला किंवा राज्यांतील स्वीकृत इतर एक किंवा अधिक भाषांची भर घालतो. शिवाय अनु. ३४८ हा

अनु. २१० ला अनु. १२० प्रमाणेच छेदीत आहे. म्हणजे अनु. ३४८ प्रमाणे राज्यमहान्यायालयांचें कामकाज भारतीय पार्लमेंट तसा कायदा करीपावेतो इंग्रजींतच चालावयाचें. शिवाय राज्यविधिमंडळापुढे यावयाचे कायद्यांचे मसुदे, व्हावयाचे कायदे, निघावयाचे सरकारी हुकुम, बटहुकुम वगैरे राज्यविविमंडळाला कायदा करून इंग्रजींत न काढतां इतर भाषेंत काढतां येतील. पण अशा इतर भाषेंतील कायद्यांचें वगैरे अधिकृत भाषांतर इंग्रजींत त्यासोबतच करावें लागेल व तें प्रमाणभूत समजलें जाईल.

(८) याप्रमाणे अनु. १२० अन्वये भारतीय लोकसभेचा कारभार व अनु. २१० अन्वये राज्यविधिमंडळाचें कामकाज इंग्रजींतून न करतां अनुक्रमे हिंदींतून आणि हिंदींतून अथवा अन्य राज्यभाषांतून चालविण्याची काय सोय घटनेंत केली आहे त्याचें स्पष्टीकरण झालें. अनु. ३४८ चें बंधन उभय स्थळीं कसें पडणार तेंहि दाखविलें

मराठीचें नांव शिल्लक राहणार नाही !

(९) मध्यप्रदेशाने या सवलतींचा लाभ घेण्याचा निर्णय केला आहे; आणि आतां त्याबद्दल मराठी मंडळ असंतोष व्यक्त करूं लागलें आहे. उद्यां मुंबई राज्यांत काय ठरेल कोणी सांगावें ! मुंबई राज्यांत तीन भाषांचे भाषिक एका राज्यांत नांदतात आणि त्यांत आतां सिंधी मंडळी आली असून ती विखुरलेली आहेत. शिवाय मुंबई शहरांत अनेक भाषिक गट आहेत.

येथील सरकारला हा गुंतावळा सुखकारक रीतीने सोडवितां येणार नाही ! इंग्रजीचें उच्चाटन शिक्षणांतून करण्याचा निर्णय तर सरकार आधीच घेऊन चुकलें आहे. मातृभाषेंतून शिक्षण दिलें पाहिजे हें सर्वमान्य तत्त्वहि आमच्या सरकारास मान्य आहे आणि मुंबई राज्यांत भिन्न भिन्न भाषिक गट बलिष्ठ आहेत. अशा पेंचांत घटनेने हिंदीची सवलत दिली आहे तिचा उपयोग कारभारासाठी करावा हा या पेंचांतून सुटण्याचा सहज सोपा मार्ग अवलंबिण्याची सुचना पुढे येईल आणि न जाणों ती चटकन् मान्यहि होईल ! मग घटनेंत अनु. २१० मध्ये राज्यांतर्गत इतर भाषा कारभारास वापरण्याची सवलत आहे ती फुकट जाईल ! आज कारभारांत हिंदी आली, उद्यां शिक्षणांतहि येईल. मग मातृभाषेंतून शिक्षण देण्याचें काय ? हळूहळू तेंहि सोडावें लागेल ! भारतीय एकतेचे भक्त आपलें स्वप्न साकार होणार म्हणून हर्षाने नाचूं लागतील. सर्वत्र हिंदीचा डंका वाजूं लागेल ! थोडयाच अवकाशांत मराठीचें नांव देखील शिल्लक राहणार नाही !

मराठीचीं अमृतकुंडें लोटून द्यावीं काय ?

(१०) आज पिढ्यान्‌पिढ्या जोपासलेली आपली संस्कृतीची प्रिय मराठी, जिच्याप्रीत्यर्थ देववाणी संस्कृत बाजूस ठेऊन 'देशी' चा आश्रय ज्ञानोबांनी केला, तुकोबांनी आपले जातिवंत जिवंत बोल जिच्यांतून उच्चारिले, पंत पंडितांनी जिचा आदर केला, विष्णुशास्त्री, बाळशास्त्री, टिळक, आगरकर, केळकर, राजवाडे,

केतकर, पांगारकर, गडकरी, कोल्हटकर, परांजपे प्रभृतींनी आपली प्रतिभा जिच्या पायीं वाहिली, मुक्ताबाई, जनाबाई, लक्ष्मीबाई, रमाबाई अशासारख्या माउलींनी जिचें लडिवाळपणें संगोपन केलें, अनेक साधुसंतांनी जिचा प्रसाद चाखविला, ती मराठी आम्ही एकाएकीं टाकूं काय, आणि टाकावी काय? चक्रधरादि महानुभाव जिच्यासाठी कळवळले ती आमची मराठी हरपली तर हजारों वर्षें ज्या पिंडावर आम्ही पोसलों ते शुष्क व नीरस होऊन आम्ही लुळेपांगळे आणि निःसत्त्व होऊन नाही का जाणार? नवी भाषा घेतली तरी ती अंगी मुरण्यास बहुत काळ जावा लागतो! आणि त्या काळांत तें ज्यांचें मूळ धन आहे ते किती पटीने श्रीमंत व समर्थ होऊन जातील? आम्ही भिकारी सहजच होऊन जाऊं! होतें तें गेलें आणि नवें वेताचेंच, आहे आहे, नाही नाही, असा आमचा भाषासंसार उध्वस्त होऊन जाणार नाही काय! आम्ही या नव्या जगांत शेंकडों कोस मागे पडलों आहोंत पण मराठीच्या बळकट आश्रयाने आम्ही हें अंतर तोडूं म्हणून उमेदीने कामाला लागल्याला अजून कोठे शंभर वर्षेंहि पुरीं झालीं नाहीत तोंच भरल्या ताटावरून उठून आम्ही रंक बनावें काय! आमच्या वैचारिक उद्यानाचीं वैराण वाळवंटें आपल्या हातांनीं करावीं काय? यांत लाभ काय? हें शहाणपणाचें होईल काय! जगाचा अनुभव काय आहे? पसतीस कोटींची मनाची एक भाषा अवश्य असावी, पण बोलाची–! छे! छे! तें घडलें नाही, घडणार नाही! मग जगाची एक भाषा कां नको! झाली तर कोण नको म्हणेल! शेंकडों वर्षें अमृतपान केल्यावरच एकाद्या भाषेंतून लोकात्म्याचा हुंकार होऊं लागतो! महात्मेच आमच्यासाठीं मराठीचीं अमृतकुंडें ठेवून गेले तीं आम्ही लोटून भलत्या भरीं भरणें योग्य ठरेल काय? अशा प्रश्नावळी एकामागून एक मनांत उठतात आणि ओरडून सांगावेंसें वाटतें कीं "बाप हो! सावध! एक विचार अनेक भाषांनीं बोलतां येतो; तसे अनेक विचार एका भाषेने बोलतां येतात! एक भाषा असली तर अनेक विरोधी मतें तींतून प्रतिपादतां येतात व भांडणेंहि पेटावितां येतात. एकता- मनाची, विचारांची, अवश्य पाहिजे. पण भलताच अत्याचार नको! आपली मूळ मराठी प्राण गेला तरी सोडूं नका! तिनेच तुम्हांला थोर केलें आणि यापुढेहि तीच तुम्हांला आणखी थोर करील! आपले कोट्यवधि गरीब बांधव ही एक मराठीच जाणतात. ती त्यांच्या रक्तामांसांत, कणाकणांत भिनलेली, तीच त्यांच्या उद्धाराचें साधन तें दूर लोटून त्यांना निष्प्राण करण्याचा म्हणजे त्यांची हत्या करण्याचा कसलाहि उद्योग क्षणभरहि करूं नका! मनांत देखील आणूं नका!"

मराठीला मान्यता द्या!

(११) अनुच्छेद ३४७ वाचा. त्यांत तुम्हाला असा अधिकार आहे की जर एखाद्या राज्यांत—पूर्वी प्रांत म्हणत होतो आतां घटना त्याला राज्य अथवा स्टेट असा योग्य शब्द वापरीत आहे—तेथील कोणी लोकसमूह आपली भाषा राज्यांत मान्य व्हावी अशी मागणी करील आणि जर राष्ट्रपतींची अशी समाधानी

होईल कीं ही मागणी करणारा लोकसमूह संख्येने भरदार आहे (सब्स्टॅन्शिअल पोर्शन ऑफ दी पॉप्युलेशन्) तर राष्ट्रपति फर्मावूं शकतील कीं त्या संपूर्ण राज्यांत किंवा त्याच्या विशिष्ट विभागांत त्या भाषेला त्यांनी दर्शित केल्याप्रमाणे मान्यता देण्यांत आली आहे.

(१२) अनु. ३४७ प्रमाणे मुंबई राज्यांत मराठीला मान्यता मिळण्यासाठी आपणांला मागणी करितां येईल; आणि राष्ट्रपतींचें समाधान करावें लागेल। नव्या निवडणुकी जवळ आल्याचा बोभाटा आहे. मग राष्ट्रपतींची निवड होईल. भाषाधारी राज्यरचना ही तर आपली मागणी आहेच, परंतु त्याच वेळीं ही नवी भाषामान्यतेची मागणीहि आपण एकमताने केली पाहिजे.

शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न

(१३) मागणी करण्यापूर्वी आपला संपूर्ण निश्चय व्यवस्थित रीतीने सिद्ध झाला पाहिजे. उदाहरणार्थ शिक्षणाचाच विषय घ्या. भारत सरकारने विद्यापीठ समिति नेमिली होती. तिचे प्रमुख डॉ. राधाकृष्णन् होते. त्यांनी आपला अहवाल सादर केलेला प्रसिद्ध आहे. या समितीला शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न विचारांत घ्यावाच लागला. या समितीचा निष्कर्ष पुष्कळ विचाराअंती लिहिला आहे. हा निर्णय असा आहे कीं कमींतकमी तीन भाषा तरी विद्यापीठीय पदवीधरांना आल्या पाहिजेतः (१) पहिली मातृभाषा (२) हिंदी भाषा अथवा संघभाषा (३) इंग्रजी (ज्ञानग्रहणास अवश्य इतकी). हा निर्णय यथायोग्य आहे. मातृभाषेतून सर्व शिक्षण मिळावें हेंहि या समितीस स्थूल मानानें मान्य आहे. परंतु उच्च शिक्षणाचे कामीं मातृभाषेबरोबरच हिंदी माध्यमाचा विकल्प ठेवावा; मग तो सर्व विषयांसाठी असो किंवा कांही विषयांसाठी असो.

(१४) ही सूचना दिसण्यांत एकदम वावगी वाटण्यासारखी नाही. माध्यमिकच नव्हे तर प्राथमिक शाळांतील वरच्या वर्गापासून म्हणजे साधारणपणे नव्या पांचव्या ईयत्तेपासून तों तहत शेवटच्या शालान्त परीक्षेच्या म्हणजे अकराव्या ईयत्तेपावेतों हिंदीचें शिक्षण आतां सुरू होणार हें स्पष्ट दिसत आहे. म्हणजे सात वर्षे हें शिक्षण सतत चालेल. आणि तरीहि पुढे उच्च शिक्षणांत, ज्या वेळीं विद्यार्थ्यांच्या बुद्धीला खरें प्रौढत्व येऊं लागतें आणि त्याची रसिकताबुद्धि व चिकित्सक बुद्धि विकास पावूं लागते त्यावेळीं शिक्षणाचें माध्यम हिंदी ठेवण्याचा विकल्प करावा म्हणून ही समिति आग्रहाची शिफारस करते. पदव्युत्तर शिक्षणासाठी हिंदी माध्यम आवश्यक असावें असा निर्बंध गुजरात विद्यापीठाचे कायद्यांत त्याप्रमाणे समाविष्टहि झाला आहे. कर्नाटक विद्यापीठ समितीची शिफारस त्याच वळणावर गेली आहे.

उच्च शिक्षणांतील पेंच

(१५) पदव्युत्तर विद्यार्थ्यांची खरी कसोटी पाहावयाची तर त्याची परीक्षा घेणारांत त्याच्या प्रदेशाबाहेरचे दूरचे अन्यभाषी तज्ज्ञ असलेले चांगले. पण प्रबंध किंवा उत्तरपत्रिका जर देशी भाषेंतच लिहिली तर मग असे बाहेरील तज्ज्ञ परीक्षक

कसे आणतां येतील ? अध्यापकांसंबंधानेहि तशीच अडचण आहे. आधीच उच्च ज्ञानी तज्ज्ञ थोडेच असणार; त्यांतून भौतिकादि विषयांत तर परिभाषेची अडचण व तज्ज्ञसंख्याहि थोडी. मग काय आपल्याच हातांनी आपणच दिवे ओवाळून घ्यावे आणि बाहेरील तज्ज्ञांना वगळावें ! उलट, उच्च विषयावरील प्रबंध आणि उच्च विषयांचें अध्यापन देशी भाषांतून होण्याचेंच अशक्य करावें आणि आमच्याच भाषांची स्वाभाविक उन्नति आम्हीच खुंटवावी ! आम्हीच एक प्रकारचा कमीपणा त्यांचे पदरीं बांधावा ! अनायासे ज्ञानपूर्ण प्रबंधाची भर देशी भाषेंत पडेल ती थांबवावी ! आमच्याच भाषेच्या भरीला रोखून धरावें ! असा हा पेंच आहे. आणि तो खरा आहे, तरी पण तो उतावीळपणे सोडवितां कामा नये.

दम खा, गमहि खा, पण तत्त्व सोडूं नका

(१५) अध्यापकाने हिंदीचा आश्रय विशेषप्रसंगी केला तरी चालेल. कारण तितकें हिंदी विद्यार्थ्याला आलेंच पाहिजे. पण म्हणून देशी भाषांचा हक्क त्यांस बजावूं दिलाच पाहिजे तो निदान प्रथम मान्य करून मग अवांतर तजविजी करून त्यांचा यथोचित व यथासमय परिहार शोधावा हेंच उचित. एक भाषांतराचा मार्ग आहे. तो त्रास वाटला तरी सोसावा. एकदम देशी भाषा व संघभाषा उभयतांची भर होईल. किंवा देशी भाषेंत मुख्य व सांगोपांग प्रतिपादन व्हावें आणि मुद्यापुरता संक्षेप हिंदींत करीत जावा. तोड काढतां येईल. आणि तीहि निरंतर लागणार नाही. भलतेंच तत्त्व वरून गोंडस दिसलें तरी भोळसटपणे मान्य करूं नये. सवलत द्यावी; दम खावा, गमहि खावी पण मूळ तत्त्व निखालस सोडूं नये.

(१६) असे प्रश्न व पेंच यापुढें सतत येत जाणार. म्हणूनच पक्क्या, स्थिर व दृढ मताची आवश्यकता आहे. घटनेंत सवड ठेविली आहे. वेळीच जागें राहून, योग्य व न्याय मार्गानें धिटाईने जाणें आपलें काम आहे.

वैचित्र्य म्हणजे विरोध नव्हे

(१७) भारत आपला आहे. भारतांतील सर्व भाषा एकपरी आपल्याच आहेत. त्या सर्वांवर आपली प्रीति असावी. सर्व गांव आपलें असलें तरी आपलें घर म्हणून वाटणारा आपलेपणा कांहीं निराळाच असतो. तोच न्याय येथेहि लागू आहे. आंबा म्हणजे आंबा. पण त्यांतहि हापूस, पायरी अशा परी असतातच. सारे आपण भारतीय; पण त्यांत मराठे, बंगाली, गुजराती, तामीळ वगैरे परी आहेत. वैचित्र्य हें वैभवाचें लक्षण आहे. वैचित्र्य म्हणजे विरोध नव्हे विरोधभावना विषारी म्हणून ती सर्वथा टाकावी. शुद्ध प्रेम वाढीस लावावें. सर्वांची समान उन्नति कशी होईल हें चिंतावें. पण असें करितांना आपलें जें असेल त्यावर सर्वाधिक माया करावी हाच सद्धर्म आहे ! जागे राहून आपलें कर्तव्य शुद्ध बुद्धीने आणि निर्भयपणे करूं या !

जीवन व व्याकरण

दा. ल. अ डो णी

☼

" एखादा सरस, सुरस मनोरंजक, चित्तवेधक—थोडक्यांत म्हणजे अथ-पासून वाचायला घेतल्यावर इतिश्री होईपर्यंत हातचा सोडूं नये असें वाटायला लावणारा–रसाळ ग्रंथ रटाळ केव्हा वाटायला लागतो ? " गंभीर मुद्रा करत पृच्छकाने—आणखी काय करणार तो ?—प्रश्न केला.

" विद्यापीठाच्या एखाद्या परीक्षेला लावून टाका म्हणजे झालं ! आणि मग घ्या एकनात विद्यार्थ्यांचं त्यासंबंधी मत. " दौडमतावर (Gallup pol) मलताच विश्वास असणारा उत्तरला.

यशोदेवता आणि विद्यार्थी यांच्यामध्ये घोंड म्हणून उभे राहणाऱ्या पुस्तकां-विषयी परीक्षार्थ्यांची भावना कशा प्रकारची असते याची सहज कल्पना करतां येईल. यावरून आपल्या विद्यार्थी जीवनांतील स्वानुभूतीच्या वासाचें पूट वरील विधानावर चढविलें म्हणजे त्याच्या सत्यतेचा पुन:प्रत्यय होईल. यामुळे होतें काय कीं, 'सब घोंड बारा टक्के' या न्यायाने रुक्ष, नीरस, तार्किक वा शास्त्रीय विषयांबरोबर रसाळ, ललित, सुलभ व रंजक विषयासंबंधानेहि विद्यार्थ्यांच्या मनांत अकारण प्रतिकूल ग्रह निर्माण होतो. जनमेजयाने केलेल्या सर्पसत्रांत ज्याप्रमाणे सापराध निरपराध–सर्वांच्याच आहुती एकामागून एक पडूं लागल्या, त्याप्रमाणे काव्य, चित्र, संगीत, व्याकरण इत्यादि रमणीय विषयहि विद्यार्थ्यांच्या अरुचीला—ते केवळ परीक्षेला लावल्यामुळे--पात्र झाले.

काव्य, चित्र, संगीत यांच्या मालिकेंत व्याकरणाला गोवलेलें पाहून कित्येकांना 'श्वानं युवानं मघवानमाह' या व्याकरणाचार्य पाणिनीच्या प्रमादाची आठवण होईल. उलट एकपंक्तीचा हा भलताच प्रकार पाहून 'झुणका भाकर' संघाचेहि सभासद 'अब्रम्हण्यम्' म्हणून ओरड करूं लागतील. हरिजनांना पंक्तिपावन करून घेण्याचा उपदेश करणारे 'जातपात तोडक मंडळा'चे कार्यकर्ते या बाबतींत मात्र पंक्तिप्रपंच करायला मागेपुढे पाहणार नाहीत. 'काव्य व व्याकरण ! संगीत व व्याकरण !! म्हणजे तिलोत्तमा आणि हिडिंबा, उर्वशी आणि कुब्जा या सारख्याच म्हणायच्या ? असाहि सवाल करायला ते मागेपुढे पाहणार नाहीत. खरोखर ललित कलांच्या सुंदर मालिकेत व्याकरणाला गोवण्यांत मी मोठीच

चूक केली, नाही ! कलाकामिनींचा विभ्रमयुक्त विलासकुंज पाहून स्वतः व्याकरण देखील ऋष्यशृंगाप्रमाणे संभ्रमांत सांपडलें असेल.

कला आणि व्याकरण ! कला व जीवन, भांडवलदार व कामकरी इत्यादि (खांडेकरांच्या आवडत्या) जोडीप्रमाणे यांतहि खरोखर दोन ध्रुवांचें अंतर आहे काय ? आणि असेल तर तें कोणी निर्माण केलें ? आपणच ना ! जातकुळीचा विचार केला तर नृत्य व व्याकरण यांचे उद्गमस्थान एकच असल्याचें आढळून येतें. हरिचरणापासून निघालेल्या मोक्षदायिनी गंगेप्रमाणे मोददायिनी नृत्यकला ही हरिचरणापासून निघाली, तर त्याच्याच डमरूमधून व्याकरणाचीं चतुर्दशसूत्रीं बाहेर पडली, तेव्हां दोघांचाहि समावेश एकाच "शैव" संप्रदायांत होतो हें उघड आहे. तांडव नृत्यांत प्रतीत होणारा रौद्र व भयानक या रसांचा अविर्भाव व व्याकरणाचा दत्त म्हणून उभा ठाकणारा जटिल अवतार पाहून होणारी शोचनीय अवस्था, या गोष्टी ध्यानांत घरल्या तर त्यांची एकवंशता एकदम पटेल. तथापि नृत्याप्रमाणे व्याकरणांतहि कलात्मक, सौंदर्यवर्धक, रसभरित, भावनाप्रवण भाग आहे, हें सहृदयतेच्या दृष्टीने पाहणाऱ्याला मात्र पटेल. पण लक्षांत कोण घेतो ?

मी तर असेंहि म्हणेन की आपल्या आध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, नैतिक, मानसशास्त्रीय इत्यादि साऱ्याच प्रवृत्तींचें प्रतिबिंब व्याकरणांत पडलेलें स्पष्ट दिसतें. 'जशी जनता तसा शास्ता' (People get government they deserve) या उक्तीप्रमाणे 'जसें लोकाचरण तसें व्याकरण' असें म्हणण्यास हरकत नसावी. आचार, धर्म, कर्मकांड कसोशीने पाळणाऱ्या आर्यांचें संस्कृत व्याकरण कसें सुघटित व सुसंबद्ध आहे हें पाहण्यासारखें आहे. उलटपक्षीं नियमासंबंधीच्या काटेकोरपणाचा इंग्रजी व्याकरणांतील अभाव त्यांच्या आचारांतील शिथिलतेचा व्यंजक आहे असें म्हणतां येणार नाही काय ? वर उल्लेखिलेल्या विभिन्न दृष्टिकोणांतून मराठी व्याकरणाचें नुसतें विहंगमावलोकन केलें तरी काय दिसतें हें पाहणें मनोरंजक व उद्बोधकहि होईल असें वाटतें.

'शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें, हें ज्या शास्त्राच्या अभ्यासाने समजतें तें व्याकरण.' या व्याख्येच्या गंगोत्रींतून प्रस्तुत शास्त्राचा पावन प्रवाह निघाला असें म्हणण्यास हरकत नाही. आचार व विचार यांप्रमाणे भाषण व लेखन यांतहि शुद्धता राखण्याची ही प्रतिज्ञा ध्येयदर्शी व मराठी मनाची आध्यात्मिक प्रवृत्ति दर्शविणारी आहे. शुद्ध, बुद्ध, निर्दोष परब्रह्म ज्याप्रमाणे मायेमुळे विविध स्वरूपांत भासमान होतें, त्याप्रमाणे कला व नीति, पावित्र्यविडंबन, अश्लीलता, भाषाशुद्धि अतिवास्तवता इत्यादि वादांचें पटल अशेष शब्दब्रह्मावर पडलेलें दिसतें, आणि बहुतेक साहित्यिक जीव या मायामोहांत गुरफटून सुखदुःखांचा आस्वाद घेत असतात.

नामाचे आपल्याकडे तीन तर इंग्रजींत पांच प्रकार मानतात. भारतीयांचें 'त्रयी 'प्रेम प्रख्यात आहे. (पाहा :-त्रिमूर्ति, त्रिलोक, त्रिपुटी, त्रिताप, त्रिगुण त्रिदोष इत्यादि.) पाश्चात्यांचा पांचभौतिकावर विश्वास. इंग्रजी नामप्रकारांतील समुदायवाचक व पदार्थवाचक नामें त्यांच्या सामाजिक-संघटनात्मक व ऐहिक-वस्तुनिष्ठ प्रवृत्ति दर्शवितात उलट त्यांचा अभाव आमच्या व्यक्तिनिष्ठ व पारलौकिक प्रवृत्तींचा निदर्शक आहे. भाववाचक नामाचा सामान्य नामासारखा होणारा उपयोग 'अव्यक्तं व्यक्तिमापन्नं' या गीतावचनानुसार निराकार परब्रह्माचा साकार अवतारच प्रकट करत नाही काय ? त्यालाहि लिंगवचन विभक्तीचे विकार होणें हें लौकिकरीतीस धरूनच आहे. एकवचनी रामाला पित्याचें व परिटाचें आणि बहुवचनी कृष्णाला स्वतःचें ('न धरीं शस्त्र करीं मी—') व भीष्माचें वचन कसें भोंवले हें प्रसिद्धच आहे. पित्याच्या विशेष भक्तीमुळें एकाला वनवास स्वीकारावा लागला तर भक्ताच्या भक्तीसाठीं दुसऱ्याला खरारा करणारा खासदार व्हावें लागलें. वैदिक किंवा प्राचीन मराठी वाङ्मयाकडे साम्यवादी अथवा समाजवादी दृष्टिकोणांतून पाहणाऱ्या भाई डांगे, लालजी पेंडसे प्रभृतींना विशेष नामाचा सामान्य नामासारखा उपयोग करण्याच्या मुळाशीं बहुजनवादाचीं (Proletairism) चीं बीजें हमखास आढळतील.

'विभक्ति' शद्वांत मतभेदाला जागा आहे. वि उपसर्गाचे विगत अथवा विशेष असे दोन अर्थ संभवतात. विभक्तींचा प्रत्यय नसलेली द्वितीया व पदवीचें पुच्छ नसलेली विद्वत्ता न मानण्याकडेच वैय्याकरणांचा व वावदुकांचा कल दिसतो. विशेषणाप्रमाणे वागणाऱ्या विशिष्टत्व-स्वामित्वदर्शक षष्ठी विभक्तीच्या ठायीं भक्ति नसणें, तिला बारगळणें हें साम्यवादाच्या तत्वाला धरूनच आहे. विभक्तीचे कारक व उपपद असे दोन प्रकार आहेत. आणि दुःखाची गोष्ट ही की 'कारकविभक्तेः उपपदविभक्तिर्वलीयसी' असें सूत्र आहे. आजच्याप्रमाणे प्राचीनकाळींहि क्रियेपेक्षा पदालाच, कार्यापेक्षा अधिकारालाच जास्त मान होता हें पाहून कोणता 'आर्य' पुरुष (शिल्लक असेल तर —) लज्जेने मान खालीं घालणार नाही ? मग क्रियात्मक लोकसेवे ऐवजीं महत् व उपपदासाठीं धडपडणाऱ्या राष्ट्रीयतावाल्यांची अधिकारभक्ति हीन का लेखावी ? संबोधन विभक्तीकडे पाहिलें म्हणजे 'मतप्रचार' हें वाङ्मयाचे प्रयोजन प्राचीनांना मान्य होतें हें सिद्ध होतें.

इंग्रजींत चार, मराठींत तीन तर हिंदींत फक्त दोन लिंगें मानण्याचा प्रघात आहे. वस्तुवाचक शद्व सापवाद नपुंसकलिंगी समजण्याची इंग्रजींत पद्धति आहे. निर्जीवावर देखील स्त्रीपुरुषत्वाचा आरोप करण्यांत चैतन्य हें स्थिरचर व्यापी आहे हीच कल्पना व्यक्त होते. उलटपक्षीं आचार, विचार, वेषभूषा इत्यादि बाबतींत पुरुषीकरणाचा स्त्रियांचा सोस पाहिला म्हणजे सामान्य लिंग मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति कशी झाली याची कल्पना करतां येते.

'नाम' महिम्याच्या ब्रह्मघोटाळ्यांतून बाहेर पडलें म्हणजे एक सोडून सर्व-नामें समोर येतात. इंग्रजींत तीं नामार्थक तर संस्कृतांत 'सर्वा'नुसारी आहेत. मराठीने या बाबतींत तेवढा इंग्रजींतला अर्थ घेतला व संस्कृतचें अनुसरण सोडलें. शब्दसृष्टींत अल्पसंख्यांक [नवविध] असणारा हा शब्दप्रकार आहे मात्र सर्वस्पर्शी आणि प्रभावी. शब्दब्रह्माचा हा अल्पाक्षरी वामनावतार कुतूहल प्रेरक, मर्मसंबंधी, विश्वदर्शक व चराचर व्यापी आहे. प्रत्येकाला सर्वांत जास्त प्रिय असणारा 'मी' सर्वनाम आहे हें विसरतां कामा नये. इंग्लिशांची 'आस्मिता'—अहंभावना त्यांच्या सदैव मोठ्या असणाऱ्या I मध्ये दिसून येते. 'अहं'काराला हीन लेखणारे भारतीय सर्वभूतीं एकात्मता पाहण्याऱ्या आपल्या स्वभावविशेषाला धरून 'आपण'चा सर्वपुरुषी (He includes she) प्रयोग करतात. आदरार्थी अनेक वचनाचा प्रकार आपल्या अतिप्रसिद्ध औदार्याचा निदर्शक नाही काय ?

एखाद्या समाजाची कर्तृत्वशक्ति भाषेंतील क्रियापदावरून अजमावितां येते. क्रियापदांचे प्रकार, त्यांची संख्या, रूपें इत्यादि गोष्टींकडे या दृष्टीने पाहिलें पाहिजे. उद्योगापेक्षा दैवावरच जास्त भरंवसा ठेवणाऱ्यांच्या भाषेत अ-कर्तृक क्रियापदें आढळायचींच. कां कुणाला ठाऊक पण अकर्मक क्रियापदाविषयी अनादर व सकर्मकविषयी आपलकी मला विद्यार्थीदशेपासून वाटते. पुष्कळांना असेंच वाटत असेल अशी कल्पना आहे. या अकारण आवडी निवडीमागे कोणता प्रवृत्ति, सुप्त वासना वगैरे असते हें मनोगादनवाद्यांनी तपासून पाहण्यासारखें आहे. अकर्मक क्रिया म्हटल्याबरोबर असफल कृतीची समजूत तर आपल्या मनांत बद्धमूल होत नाही ना ? निष्काम कर्मयोगाची महती मान्य असलेल्या मराठी मनाने सकर्मक क्रियापदावर लोभ करावा हें कितपत युक्त आहे ! की कर्तृत्वशून्य व्यक्तीच्या अप्रकट मनाची ही वासनामय प्रतिक्रिया आहे !

काळांत परिवर्तन, नवे प्रयोग, भिन्न रचना इत्यादि गोष्टी सहाय्यावाचुना होऊं शकत नाहीत. परार्थासाठीं सारे सोपस्कार निमूटपणे सहन करणारे सहाय्यधातु दधीचीप्रमाणे सर्वांना आदरणीय वाटतील. दुसऱ्या कित्येकांना स्वतः मरण्यापेक्षा—आपल्या अंगास तोशीस लागूं न देतां दुसऱ्यामार्फत कार्यभाग साधतां येतो. उत्पादनांतील संयोजकाप्रमाणे (Entrepreneur) स्थिति, शक्ति व रुचि यांना अनुसरून दुसऱ्यांकडून काम करवून घेणें याला जीवनांतील प्रयोजक रचना म्हणतां येईल. स्वावलंबी अथवा मजूर कामगाराला मात्र दुसऱ्याच्या श्रमावर निर्वाह करणाऱ्या 'बूर्झ्वा' (Beurgoeise वृत्तीच्या) आयतोबाची चीड येईल. शक्यार्थी बोलणारी व्यक्ती एकतर वयोवृद्ध असावी नाहीतर आजारीबिजारी असावी ही भावना माझ्या मनांत कायमची रुजली आहे. असें वाक्य कुणाविषयी झालें तरी आपल्या मनांत सहानुभूति, दया उत्पन्न करतें हें खास.

उलट कर्तरि वाक्यें कर्तृवाचकासंबंधी आदर निर्माण करतात. 'पळविलें जाण्यापेक्षा स्वतःच 'पळणें' हें केव्हाहि श्रेयस्कर. 'रडण्या-रडविण्या'संबंधी मात्र मतभेद होईल याची जाणीव आहे. पण मनुष्याच्या इच्छेप्रमाणेच कोठे

साऱ्या गोष्टी घडतात ! 'बुद्धिः कर्मानुसारिणी ' असेल तर क्रिया देखील कर्माचें अनुसरण कशी करणार नाही ? मग कर्त्यांचा क्रियाशीलतेचा सारा अभिमान गळून पडतो व तो बिचारा साधनागत होऊन बसतो. भानुरंगरत्वामुळे सर्वसामर्थ्यशाली बनलेलें कर्म (कार्य) कर्त्याला हतप्रभ करून टाकतें. 'कर्मणो गहना गतिः हेंच खरें ! अशा कर्माला कलाटणी देण्याची शक्ति एका भावांत आहे. 'भावे हि विद्यते देवः ' हें खरें की खोटें देव जाणे. पण भावाला प्राधान्य दिलें की कर्तृत्व साधनीभूत होतें आणि कर्म संकष्टांत सांपडतें. वर वर्णिलेल्या साऱ्याच क्रिया नेहमीच शुद्ध व सरळ रीतीने होतात असें नाही. वर्णांत आणि क्रियेत संकर हा व्हावयाचाच.

सामान्यतः साऱ्यांच अव्ययें अर्थव्यक्तीच्या बाबतींत अत्यंत कंजुष असतात. पण त्यांतूनहि अनेकशः अर्थ काढणारे कांही वस्ताद आढळतात. 'श्रीमंत याचक म्हणून प्रसिद्ध असलेले पं. मालवीयजी दुर्लक्षितांकडून लक्ष काढत असत. 'रात्रिरेवं व्यरंसीत्' या भवभूतीच्या चरणार्धांत 'एवं' या कालिदासाने सुचविलेल्या अव्ययाने अर्थशोभेत केवढी भर घातली !

यावरून अव्ययें वाटतात तितकीं अव्यय-अविकारी नाहीत हें स्पष्ट होतें. किंबहुना विकाराला वाचा फोडणें हेंच तर उद्गारवाचकांचें कार्य. 'उत्कट भावनांचा सहजोद्गार ' ही काव्याची व्याख्या मान्य केली तर एकेका भावनेला परिस्फुटता देणारें केवलप्रयोगी अव्यय हें एक सरस भावकाव्य आहे असें म्हणण्यास हरकत नसावी. भाषेचा आरंभ उद्गारवाचकानेच झाला असें भाषाभिज्ञांचें मत आहे. उभयान्वयी अव्यय मध्यस्थाची भूमिका स्वीकारतें. स्त्रीपुरुष, व्यक्ती, संस्था, गुण, क्रिया, कल्पना साऱ्यांचाच संयोग घडवून आणण्याची महत्त्वाची कामगिरी बजावणारा हा सांधा निरपेक्ष बुद्धीने करून अकर्ता-नामानिराळा राहतो. याउपर त्यांच्यांत विकल्प अथवा विरोध राहिला तर त्याचा काय अपराध ? असे संयोजक संख्येने केव्हाहि स्वल्पच असायचे.

संयोगाचें कार्य करणारी आणखी एक युति आहे. संधीचें क्षेत्र अक्षरांचें, तर समासाचें पदांचें. मध्यस्थाला आलें तरी ज्यांच्यात एकोपा घडवून आणायचा त्यांच्याबाबत मागचा पुढचा सारासार विचार करावाच लागतो. दोन्ही पक्षांना देवाणघेवाण करावी लागते. त्यामुळे एखाद्याला पायावर धोंडा पाडून घ्यावा लागतो, स्वत्व गमवावें लागतें, नाहीतर दुसऱ्याला डोक्यावर बसवून घ्यावें लागतें. व्यवहाराप्रमाणे व्याकरणांतहि संधि दुष्करच. त्यापेक्षा विग्रह करणें किती सोपें ! पडताळा पाहायचा असेल तर कोणत्याहि विद्यार्थ्याला किंवा वकिलाला विचारा. सामासिक रचना आर्यांच्या सामाजिक–कौटुंबिक कल्पनेचें शाब्दिक स्मारक आहे. एकत्र कुटुंब पद्धति रूढ असलेल्या आर्यावर्तात अनेक घटक गुण्यागोविंदाने नांदत. लोकांना कुटुंबविस्ताराची व लेखकांना समासांतील पदविस्ताराची तेव्हा आवडच

होती. 'अष्टपुत्रा' हा आशीर्वाद व दण्डीबाणादिकांची समासबहुल गौडी हेंच दर्शवितात. भारताचें महा-भारत, बृहत्तर भारत (इराण ते हिंदेशिया) करून 'विश्वं कृण्वन्तमार्यम्' ही मनीषा तेव्हा उत्स्फूर्त होऊं शकली आणि आज? दोघांत तिसऱ्याची गर्दी होते. दोन तीन पदांचे सामासिक शब्द जड, दुर्बोध, क्लिष्ट वाटतात. विभक्तकुटुंबपद्धति रूढावत आहे. भारत विभक्त झालें. साऱ्या क्षेत्रांत लघुता तेवढी वाढत आहे. मागे एकाने युक्तप्रांताला 'आर्यावर्त' नांव द्यावें म्हणून सुचविलें. वृत्तिसंकोचाची परिसीमा दुसरें काय?

द्वंद्व समास म्हटला म्हणजे दंड थोपटून लढत घेणाऱ्या मल्लांचे चित्र माझ्या डोळ्यासमोर यायचें. दोन तुल्यबल व्यक्ती एकमेकांजवळ आल्या म्हणजे त्यांच्यांत निदान अंतर्गत तरी द्वंद्व-विरोध असावा ही लाडकी कल्पना याच्या मुळाशीं असावी. स्त्रीदाक्षिण्याचा (Ladies first) धडा पाश्चात्यांपासूनच शिकण्याचें कारण नाही. सीताराम, राधाकृष्ण, पार्वतीपरमेश्वर या जोड्या काय सुचवितात? समाहार द्वंद्व संग्रहात्मक तर वैकल्पिक द्वंद्व विग्रहात्मक आहे. मध्यम पदाची गळचेपी व मध्यम वर्गाची कुचंबणा करून मध्यम पदलोपी समास व समाज बनत असतात.

ऋषीचें कूळ व नदीचें मूळ शोधूं नये हा दंडक शब्दांनाहि लागू पडतो. कित्येक खानदानी सुसंस्कृत, तर कित्येक हीनकुलोत्पन्न-अपभ्रष्ट आढळतात. कांहीं शुद्ध बीजाचे-तत्सम, तर कांहीं वर्णसंकराचे-तद्भव दिसतात. मनुष्याच्या स्वभावाप्रमाणे शब्दाच्या अर्थालाहि कल्पनातीत कलाटणी मिळते. वाल्याचा वाल्मीकि व विश्व-मित्राचा विश्वामित्र झाले तसेंच हें. त्यांतहि कांहीं सिद्ध तर दुसरे कांही साधित असतात. अंतरंगात प्रवेश केला तर त्यांच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटेल.

ईश्वरी सृष्टीची अनुगामिनी अशी ही शब्दसृष्टि साऱ्या मानवी व्यापारांची द्योतक असतां रुक्ष, नीरस, कलाहीन कशी असेल? या शब्दरूप महाकालीचें बाह्यरूप उग्र व कठोर दिसलें तरी तिचें अंतरंग सरस व कोमल आहे. सारांश, व्याकरण म्हणजे जीवन सागरांतील नौका, जीवनाला पथ्यकर व रुचकर रसायन आणि जीवनप्रासादाचें महाद्वार आहे. 'मुखं व्याकरणं स्मृतम्'।

अनुक्रमणिका

साहित्य आणि जनता

सौ. कुसुमावती देशपांडे

★

अलीकडे साहित्य आणि साहित्यिक यांच्या विषयीं सर्वसाधारण समाजांत अनेक प्रकारचे गैरसमज दिसून येतात. व्यवहारांत बुडून गेलेल्या माणसांना बौद्धिकतेचें, तत्त्व शोधनाचें थोडेसें वावडेंच असतें. त्यामुळे कांहीं अंशीं असे गैरसमज उत्पन्न होत असतील. परंतु तितक्याच प्रमाणांत स्वतः साहित्यिक व त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचें स्वरुप हेंहि अशा गैरसमजाला कारणीभूत होतात. विशेषतः एकाद्या समाजाला उतरती कळा लागली, दारिद्र्य, पारतंत्र्य वा इतर सामाजिक आपत्तींमुळे त्याच्या सामूहिक जीवनांतील जोम लयास गेल्यासारखा झाला, म्हणजे त्याची कला व त्यांतील सामूहिक जीवन यांची नेहमीच फारकत होते. कलावंत व साहित्यिक एक आपलेंच असें वेगळें आभासनिष्ठ विश्व निर्माण करून त्यांत रममाण होतात. तर सर्वसाधारण समाज कलावंताला, साहित्यिकाला वाळींत टाकतो; त्याला माणसाहून वेगळा समजूं लागतो. सर्वसाधारण व्यक्ति केवळ अद्यतन साहित्याकडे दुरून दुरूनच नजर टाकतात व म्हणूं लागतात, की हें आमचें नव्हे, याचा आमच्या जीवनाशीं संबंध नाहीं. कांहीं थोड्यांनी अशा साहित्याविषयीं याहून अधिक जवळीक बाळगली तर तें केवळ करमणुकीचें, जीवन विस्मृतीचें एक साधन म्हणून. दोन्ही प्रकारच्या व्यक्तींना साहित्याच्या थोर व सनातन परंपरेचा विसरच पडलेला असतो व या विस्मृतीमुळे वैयक्तिक व सामूहिक जीवनावर संस्कार करण्याच्या एका प्रभावी साधनाला ते पारखे होतात. साहित्य आणि समाजजीवन यांच्यांतील दूरीभावाचा परिणाम उभयपक्षीं एकच होतो व तो म्हणजे सांस्कृतिक मरण ओढवण्याचा. समाजजीवनापासून दूर, स्वप्नसाम्राज्यांत गेलेल्या कलेमध्ये प्राण राहत नाहीं व कलानिष्ठ, साहित्यविन्मुख झालेला समाज संस्कृतिशून्य बनतो; आपलीं स्वतःचीं जीवनमूल्यें पारखण्यास असमर्थ ठरतो. तेथील ' जिणें ' ' कवडीमोल ' ठरूं लागतें.

वस्तुतः जगांतील सर्व थोर साहित्य म्हणजे समाजजीवनाचा परिपाक आहे. तें स्थितिनिष्ठ असेल, परंपरागत असेल तर त्यामध्ये सामाजिक अनुभूतीला व्यक्तिमनाच्या द्वारे अभिव्यक्ति मिळालेली असते. असें साहित्य म्हणजे समाजजीवनाचा निस्यन्दच होय. तें परंपरेचा विध्वंस करणारें असेल, समाज व व्यक्ति यांच्यांतील

संघर्षाने भारलेलें असेल, नवजीवनाकडे ओढ घेणाऱ्या व्यक्तिमनांतील सूक्ष्म तरल भाव सूचित करणारें असेल तर त्यांतहि गूढ सामाजिक आकांक्षांचाच सहजोद्गार असतो. त्या आकांक्षा समाजाला सामूहिक जीवनांत अजून प्रतीत झालेल्या नसतात. परंतु त्या अबोधपणे, विरलपणे, समाजांत उदय पावलेल्या असतात. याप्रमाणे, थोर साहित्यांत जें जें अवतरतें तें तें समाजजीवनांत स्पंद पावत असतें. अशा अबोध स्पंदनाला व्यक्तिमनांतून अभिव्यक्ति मिळाली म्हणजे निनादाचीं नाजूक वलयें हळूहळू पसरतात, समरस हृदयांत पडसाद उठवीत जातात; समविचार, सममूल्यें यांना जोम आणतात. जीवनांत नवा आशय भरला जातो व म्हणूनच नवप्रेरणांनी भरलेलें साहित्य हें जीवनांतील एक अत्यंत प्रभावी शक्ति ठरते.

मराठी साहित्यापुरताच विचार करावयाचा तर सामाजिकता व नवप्रेरणा हे त्याचे मूलस्रोत आहेत. संस्कृत भाषेच्या गुहेंत निहित झालेलें धर्मतत्त्व सर्वसाधारण मराठी जनांपर्यंत पोंचवणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या वाण्यांतूनच मराठी कवितेचा जन्म झाला. युगानुयुगें, लोकजीवनाची साथ करीत, त्याबरोबर वळणें घेत, पण त्याला संस्कारित करीत मराठी वाङ्मयाची सरिता वाहात राहिली. मग आजच मराठी साहित्य व मराठी समाज यांमध्ये दूरीभाव कां निर्माण व्हावा !

साहित्यिक व सर्वसाधारण जनता या दोघांनीहि या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. साहित्याच्या समाजजीवनांतील स्थानाची जाणीव ठेवून हा विचार झाला पाहिजे. महाराष्ट्राच्या व नवभारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानांसाठी ज्या ज्या शक्ति साह्यकारी होतील त्या सर्वांची आता जपणूक करावयास हवी व त्यांचा जोम वाढवला पाहिजे. आजच्या परिस्थितींत विदर्भ साहित्य संघाचें हें मुख्य कार्य ठरावें. साहित्याच्या जाणकारांना संघाने समाजाभिमुख करून त्यांच्या करवीं समाजांतील साहित्याच्या अभिरुचीची जोपासना करावयाचें कार्य अंगावर घ्यावयास हवें. सर्वसाधारण जनतेंत मराठी साहित्याविषयीं जवळीक निर्माण करावयास हवी; मराठी साहित्याच्या थोर परंपरेची जाणीव जागृत केली पाहिजे. त्या परंपरेला अनुरूप अशा नवसाहित्याची मागणी करायला लोकांना प्रवृत्त केलें पाहिजे. चैतन्याने स्फुरलेलें, नव्या तेजाने नटलेलें, आमच्या आजच्या जीवनाला प्रामाणिकपणे व समरसपणे अभिव्यक्ति देणारें असें जें कांही निर्माण होत असेल तें ओळखण्याची दृष्टि त्यांना प्राप्त करून दिली पाहिजे; त्याचें स्वागत करण्याची उदारता त्यांच्यामध्ये निर्माण केली पाहिजे. कारण याच दृष्टीने, जाणीवेने, या उदारतेने आमच्या जीवनांतहि परिवर्तन घडून येणें शक्य आहे.

विदर्भ साहित्य संघ आमच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचें एक अत्यंत प्रभावी साधन आहे. त्याची शक्ति वाढवणें व त्याच्याकडून असें सांस्कृतिक कार्य करवून घेणें हा आमचा प्रत्येकाचा अधिकार आहे, कर्तव्यहि आहे.

अनुक्रमणिका

अकोल्याच्या वि. सा. संमेलनाच्या निमित्ताने संघाच्या हितचिंतकांच्या

सूचना

विदर्भ-साहित्य-संमेलनाचें अधिवेशन या महिनाअखेर अकोला येथे भरणार आहे. या संमेलनाला लाभलेली परिस्थिति अत्यंत अनुकूल व उत्साहदायक आहे. संमेलनाचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे साहित्य आणि राजकारण या दोन्ही क्षेत्रांत लीलेने अनिरुद्ध संचार करणारे, सिद्धहस्त, प्रतिभासंपन्न आणि प्रथितयश साहित्यिक आहेत. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा योग्य तो अभिमान त्यांच्या ठिकाणीं सदैव जागृत असल्यामुळे त्यांच्या भवितव्याविषयी अखंड चिंता त्यांनी वाहिली आहे. आधुनिक मराठी वाङ्मयांत त्यांनी मोलाची भर टाकिली आहे आणि त्यांच्या प्रतिभेला भावी महाराष्ट्राचें भव्य चित्र स्पष्ट दिसत आहे. हें चित्र साकार व्हावें म्हणून गेलीं अनेक वर्षें तळमळीचे प्रयत्न ते करीत आहेत आणि गेल्या वर्षभर विदर्भ साहित्य संघाला स्वतःची वास्तु मिळवून देण्याचे अविरत प्रयत्न यशस्वी करूनच अकोला येथे ते अध्यक्षपदी विराजमान होत आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखालीं होणारें संमेलन यशस्वीच होणार यांत शंका कसली !

वि. सा. संघाच्या व संमेलनाच्या पुढील वर्षीच्या अध्यक्ष प्रा. कुसुमावती-बाई देशपांडे या निवडल्या गेल्यामुळे या उत्साहजनक वातावरणांत अधिकच भर पडली आहे. आदर्श पत्नी, आदर्श माता, आदर्श गृहिणी आणि आदर्श अध्यापक या सर्व नात्यांनी प्रा. कुसुमावतीबाईंचें स्थान महाराष्ट्रामध्ये फार मोठें आहे. आधुनिक सुशिक्षित स्त्री स्वतःच्या सुसंस्कृत, संयमी आणि कर्तव्यप्रधान आचार-विचारांनी समाजांत केवढें मानाचें व आदराचें स्थान मिळवूं शकते हें त्यांनी दाखवून दिलें आहे आणि महाराष्ट्रीय स्त्रीचा गौरव त्यांनी वाढविला आहे. गृहिणी आणि माता या नात्याचीं सर्व कर्तव्यें उत्कृष्ट रीतीने पार पाडीत असताना, इंग्रजी भाषेचें उच्च दर्जाचें अध्यापन अनेक वर्षे करून शिवाय मराठी वाङ्मयांत त्यांनी टाकलेली मौलिक भर पाहिली म्हणजे त्यांच्या निरलस कार्यप्रवणतेची कल्पना येते. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांवर सारखेंच प्रभुत्व असणाऱ्या त्यांच्या सारख्या स्त्रियाच काय पण, पुरुषहि महाराष्ट्रांत फार थोडे आहेत. मराठी भाषा ही महाराष्ट्राची माता आहे आणि या मातेचा गौरव, कर्तबगार पुत्राना जन्म देणाऱ्या

प्रां. कुसुमावतीबाई देशपांडे या कर्तबगार मातेच्या हातीं सुरक्षित आहे एवढेंच नाही तर तो वाढविला जाईल यांत संशय नाही. संघाच्या पुढील कार्याच्या दृष्टीने अध्यक्षस्थानीं त्यांची निवड करण्यांत संघ-सदस्यांनी औचित्याबरोबरच दूरदृष्टिहि दाखविली आहे.

तिसरी उत्साहदायक गोष्ट अशी आहे की, विदर्भातील तरुण पिढींत मराठी वाङ्मय आणि भाषा यांची सेवा करूं इच्छिणारा एक मोठा वर्ग निर्माण झाला आहे. त्यांच्यामध्ये अनेक व्यासंगी विद्वान, उत्कृष्ट लेखक आणि कळकळीचे कार्यकर्ते आहेत. अशा तरुणांचा एक दमदार संच विदर्भ साहित्य-संघाभोवती गोळा होत आहे. त्यांचा उत्साह व अभिमान पाहिला म्हणजे या प्रदेशांतील मराठी भाषेचें भवितव्य उज्वल आहे याविषयीं शंका राहत नाही.

चौथी महत्वाची व सुदैवाची गोष्ट अशी आहे की प्रांतिक मंत्रिमंडळांत पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या सारखा श्रेष्ठ दर्जाचा, उदारमनस्क हिंदी साहित्यिक प्रमुख स्थानीं असल्यामुळे, मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्या विकासाला विरोध तर नाहीच पण उलट सर्व प्रकारचें साहाय्य राजसत्तेकडून होत आहे. मुंबई प्रांताच्या तुलनेने आपण या बाबतींत अधिक भाग्यवान आहोंत. महाराष्ट्र-साहित्य परिषदेला मुंबई सरकारने जागा दिली नाही पण आपल्या प्रांतांत वि. सा. संघाला प्रशस्त जागा सरकारने दिली एवढेंच नव्हे तर वार्षिक पांच हजारांची देणगीहि दिली. म. सा. परिषदेला अशी देणगी मिळते की नाही तें माहीत नाहीं. लोकमान्य टिळकांकरिता सुट्टी घ्यावी की नाही हा मुंबईकडे वादाचा विषय होऊं शकतो आमच्याकडे ही सुट्टी गेलीं अनेक वर्षे आहे. याशिवाय अनेक क्षेत्रांत तुलना करतां येईल. येथे एवढेंच सांगायचें आहे की, मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या विकासाला आपल्या प्रांतांत सर्व दृष्टींनी व सर्व बाजूंनी, आज परिस्थिति अत्यंत अनुकूल आहे.

अशा अनुकूल व उत्साहदायक वातावरणांत भरणाऱ्या अकोल्याच्या संमेलनाने कांही विधायक कार्ये हातीं घेतलीं पाहिजेत. पहिलें कार्य म्हणजे राजसत्ता लोकांकडे आल्यामुळे राज्यकारभारांत लोकभाषेलाच प्रमुख स्थान मिळालें पाहिजे, प्रांतिक कारभारांत तरी तिला गौण स्थान असतां कामा नये. या दृष्टीने आपल्या प्रांतांत हिंदीच्या बरोबरीने मराठीला स्थान मिळावें म्हणून 'मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५०' मधील चौथ्या नियमांत सुधारणा व्हावी अशा वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाने केलेला ठराव संमेलनांत पुन; संमत करण्यांत यावा. तत्पूर्वी ही सुधारणा झाली तर बरेंच.

यानंतर दुसरें कार्य म्हणजे मराठी शुद्ध लेखनाचें म. सा. परिषदेने मान्य केलेलें शुद्धलेखन गेलीं वीस-बावीस वर्षे इकडील शाळा-कॉलेजांतून शिकविलें आणि वापरलें जातें. इतक्या वर्षांच्या अनुभवावरून या नियमांत अधिक सुधारणा

करणें अवश्य आहे असें वाटूं लागलें आहे. 'लेखन हें उच्चारानुसारी असावें' हा सिद्धान्त वाच्यार्थाने घेतला तर लेखनाला नियमबद्धताच राहणार नाही हें खरें पण त्याच्या उलट लोकांचे उच्चार एकीकडे व लेखनाचे नियम भलतीकडे अशी स्थितीहि उपयोगी नाही. मराठी भाषेतील अनुनासिक महाराष्ट्राच्या कांही प्रदेशांत उच्चारित आहेत पण विदर्भांत ते उच्चारले जात नाहीत या दृष्टीने, अनेक अनुस्वार शुद्धलेखनांतून काढणें अवश्य आहे. शिक्षणाचा प्रसार समाजाच्या ज्या थरांमधून होत आहे व होत जाणार आहे त्यांच्या नेहमीच्या बोलण्यांतील भाषांकडे फार दिवस दुर्लक्ष करतां येणार नाही ही गोष्टहि लक्षांत घेतली पाहिजे. प्रादेशिक संमेलनांना प्रादेशिक भाषेचे विशेष लक्षांत घेणें अवश्य आहे. या दृष्टीने शुद्धलेखनाच्या नियमांचा फेरविचार झाला पाहिजे. व्याकरण शिकविण्याकडे शाळांमधून दुर्लक्ष होतें आणि विद्यार्थी निष्काळजी असतात हें खरें असलें तरी सर्वच दोष त्यांच्यावर लादून आपणांस मोकळें होतां येणार नाही. त्याची बोलण्यांतील भाषा व लेखी भाषा यांच्यांत भलतेंच अंतर असल्यास तें शक्य तितकें कमी करावयास नको काय? मराठी लेखनपद्धतींत अनेक विकल्प--ऱ्हस्व, दीर्घ--अनुस्वारांच्या बाबतींत निर्माण केले तर त्यांत अशास्त्रीय असें काय आहे? क्रियापदाच्या स्त्रीलिंगी वर्तमानकाळीं, तृतीय पुरुषीं, एक वचनीं प्रयोगांत 'जाते, जात्ये, जाती' असा विकल्प व्याकरणांनी जसा मान्य केला आहे तसे अनेक विकल्प जिवंत भाषेच्या व्याकरणांत येणारच. तत्सम शब्द ऱ्हस्वान्त किंवा मराठी भाषेच्या प्रकृतीला अनुसरून दीर्घान्तहि लिहावें असें लो. टिळकांनी सुचविलें होतें, तो विकल्प मान्य करणेंच अधिक न्याय्य होणार आहे. तात्पर्य हा विषय संमेलनाने हातीं घेणें अवश्य आहे. अकोट येथील संमेलनाने त्याकरितां एक समिति नेमिली होती. पण हा विषय सुचविणाऱ्याच्या गळ्यांतच तें काम अडकवून संमेलन मोकळें झाल्याने समितीचें काम अपुरें राहिलें. प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या लोकांनाच अधिकारपदी नेमण्याचें वि. सा. संघाचें धोरण याहि विषयांत स्वीकारून शुद्धलेखनाच्या फेरविचाराकरिता संमेलनाने समिती नेमावी. डॉ. कोलते किंवा डॉ. देशमुख यांच्यासारखा तरुण विद्वान निमंत्रक नेमावा आणि म. सा. परिषदेच्या शुद्धलेखन समितीवर काम केलेले प्रा. बळवंतराव खापर्डे, डॉ. य. खु. देशपांडे प्रा. बनहट्टी, श्री. हरिभाऊ नेने, अशी मंडळीं समितीचे सभासद असावी. प्रचलित शुद्धलेखन कायम ठेवावें अशा मताचा पुरस्कार करणाऱ्यांनाही समितींत स्थान असावें. त्यांनी एकमताने केलेले निर्णय पुढील संमेलनाला सादर करावे. संमेलनाने ते मान्य केले म्हणजे विद्यापीठांतहि ते मान्य होतील. म. सा. परिषदेचे शुद्धलेखनाचे नियम मुंबई विद्यापीठाने मान्य केले नव्हते. पुणे विद्यापीठाने ते नुकतेच मान्य केले आहेत.

तिसरें कार्य म्हणजे महाराष्ट्रीय मुलांना जसें हिंदी भाषेचें तसें अमहाराष्ट्रीय
 मुलांना मराठी भाषेचें शिक्षण आवश्यक करण्याची सूचना संमेलनाने शाळाखातें

व विद्यापीठाला करावी. सरकारी नोकरांच्या बाबतींतहि हाच नियम असावा व त्याकरितां हिंदीसाहित्य-संमेलनाच्या परीक्षाप्रमाणेच विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांना मान्यता देण्यांत यावी. असें केल्यामुळे प्रांतभेद आणि भाषाभेद यांमुळे उत्पन्न होणारा दूरीभाव नाहीसा होईल. एका प्रांतांतील लोक दुसऱ्या प्रांतांत अनेक कारणांनी पूर्वीप्रमाणेच यापुढेहि जात येत राहतील किंवा स्थायिक होतील. प्रांतां-भोवती कांही भिंती बांधावयाच्या नाहीत. आपण सर्व एकाच देशाचे नागरिक आहोंत आणि भारतीय संस्कृति ही आपणा सर्वांना सामान्य असणारी संस्कृति आहे. भाषाभेदामुळे हें आपलें सांस्कृतिक आणि राष्ट्रीय ऐक्य नष्ट होतां कामा नये. याकरिता राष्ट्रभाषेचा अभ्यास प्रत्येकाने केला पाहिजे आणि परप्रांतीय लोक ज्या प्रांतांत जातील तेथील भाषा त्यानीहि शिकली पाहिजे, ती त्यांना बोलतां आली तर उत्तमच पण निदान समजली तर पाहिजेच. मराठी भाषेच्या प्रदेशांत कांही थोड्या, ती भाषा न जाणणाऱ्या उच्चपदस्थ परप्रांतीयांच्या सोयी-करिता मराठीतून व्यवहार करणें अशक्य व्हावें अशी परिस्थिति निर्माण होतां कामा नये. शिक्षणमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र आणि नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु पं. कुंजीलालजी दुबे यानी स्वतः मराठींतून भाषण करून या बाबतींत उत्तम उदाहरण घालून दिलें आहे. ज्यांना मराठी बोलतां येत नसेल ते राष्ट्र-भाषेंतून बोलले किंवा इंग्रजींतून बोलले तर तेंहि आपण सारख्याच आदराने ऐकलें पाहिजे. महाराष्ट्रीयांना इंग्रजी आणि विशेषतः हिंदी नुसती समजलीच पाहिजे असें नव्हे तर उत्तम रीतीने वक्तृत्व करण्याइतकी बोलतां आली पाहिजे. म्हणजे त्यांच्या कर्तृत्वाला सर्व देशाचें क्षेत्र मोकळें होईल. मराठी भाषेचा अभिमान इतर आव-श्यक भाषांत प्राविण्य मिळविण्याच्या आड येणार नाही इतक्याच बेताचा असला पाहिजे. स्वभाषेचा आणि स्वकीयांचा अभिमान म्हणजे परप्रांतीयांचा आणि पर-भाषेचा द्वेष किंवा तिटकारा नव्हेच नव्हे. हिंदी व मराठी लोक अनेक शतकें एकत्र रहात आले आहेत. एकमेकांच्या प्रांतांत राहत आले आहेत. आजचे महा-राष्ट्रीय हे कालचे हिंदी होते असें अनेक घराण्यांचे इतिहास सांगतील. शिवाजी महाराजाचे पूर्वज रजपूत होते. ते महाराष्ट्रांत आले, त्यानी मराठी भाषा स्वीका-रली व ते मराठे झाले. नागपूर प्रांतात स्थायिक झालेलीं अनेक पिल्ले व नायडू घराणीं मद्रासकडून आलीं. आता ते उत्कृष्ट मराठी बोलतात व मागलि पिढींतील लोक वळणदार मोडी लिहितात. तात्पर्य, प्रांतिक भाषांचा योग्य तो मान राखला जाईल, सर्वजण राष्ट्रभाषा शिकतील व भारतीय भाषांना मानतील तर राष्ट्रीय व सांस्कृतिक ऐक्य अभंग राहील.

संमेलनापुढील चौथें कार्य संशोधनात्मक असल्यामुळे जरा कष्टाचें आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेला लागून असलेल्या बोलीभाषांचा विशेष अभ्यास झाला पाहिजे. ग्रिअर्सनने या भागाची भाषिक पहाणी केली त्याला अर्धे शतक झालें. भंडारा, रायपूर, बस्तर, कांकेर या प्रदेशांत; हळबी व तदंतर्गत भुंजिया, नाहरी, कमारी या

भाषा बोलणारे लोक तेव्हा एक लक्षापेक्षा अधिक होते. नरसिंगपूर व छिंदवाडा जिल्ह्यांत कतिया ही मराठीची पोटभाषा किंवा बोली बोलणारे लोक तेव्हा ४४ हजार होते. भंडारा जिल्ह्यांत बोलली जाणारी हलबी ही मराठीच आहे हे ग्रिअर्सन यानेहि कबूल केलें आहे पण बस्तर–कांकेरमधील हळबी ही उरिया, छत्तिसगडी व मराठीचें मिश्रण आहे असें त्याचें म्हणणें आहे. आज पन्नास वर्षांनी तेथील भाषेची स्थिति काय आहे तें त्या प्रदेशांत राहून हिंडून त्या बोलीभाषांचे हजारो नमुने एकत्र करून त्यांतील शब्दसंपत्ति, नामांची व क्रियापदांची विविध रूपें इत्यादिकांचें परीक्षण करून ठरविलें पाहिजे. म्हणजे मराठी, छत्तिसगडी आणि उरिया भाषांपैकी कोणत्या भाषेचे संस्कार त्या बोलीभाषांवर अधिक झाले आहेत तें निश्चित होईल. आपल्या प्रांतांत डॉ. देशपांडे, प्रा. बनहट्टी, डॉ. कोलते, श्री. नेने यांच्यासारखे भाषाशास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठीच्या कांही विद्यार्थ्यांनीं हें संशोधन कार्य हातीं घेण्यासारखें आहे. महा–विदर्भ किंवा संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत येण्यासारखी परिस्थिति कधीकाळीं निर्माण झालीच तर त्यावेळीं वरील संशोधनकार्याचा पुष्कळच उपयोग होईल.

—शं. दा. पेंडसे

रा. वामनराव चोरघडे यांनी 'युगवाणी'च्या खास अकोला–संमेलनांकाकरिता लेख मागितला, मोठ्या तत्परतेने मी होकारहि दिला. मग विचार पडला–लेख लिहायचा कशावर ? विचार करतां करतां, माझें लक्ष 'विदर्भ साहित्य संघ' या नांवांतील 'विदर्भ' या विशिष्ट शब्दावर केंद्रित झालें. मी स्वतःलाच विचारूं लागलों–हा विदर्भ आहे तरी कुठे ? भारताच्या नकाशांत शोध केला असतां हा 'विदर्भ' नांवाचा भूभाग सापडेल तरी कां तेथे ? एक काळ असा होता की त्यावेळीं 'मध्यप्रांत–वऱ्हाड' या नांवाचा एक स्वतंत्र राजकीय प्रान्त अस्तित्वांत होता. 'वऱ्हाड' हा त्या सबंध प्रांताचा एक राजकीय पोटविभाग म्हणून मान्यता पावलेला होता. स्वतंत्र भारताची नवी राज्यघटना अस्तित्वांत आल्यानंतर 'वऱ्हाड'चें म्हणजेच 'विदर्भा'चें अंशात्मक स्वतंत्र राजकीय अस्तित्व लागलीच नष्ट करण्यांत आलें. पूर्वीच्या 'मध्यप्रान्त–वऱ्हाड'चें आता 'मध्यप्रदेश' असें नवें नामाभिधान अधिकृत रीतीने रूढ करण्यांत आलें. जुन्या राजवटींत 'विदर्भ' निदान आपलें वेगळें नांव तरी सांभाळून होता. नव्या राजवटींत तेंहि नाहीसें झालें; त्यांतहि विशेष महत्वाची व लक्षांत घेण्यासारखी गोष्ट ही की सबंध भारतीय जनतेचें प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वाधिकारी लोकसभेने, लोकांच्या संमतीनेच, ते नांव नाहीसें केलें. लोकमान्य आणि विधिमान्य अशी 'मध्यप्रदेश' या नांवाची नवी वास्तवता (Reality) उदयास आली. 'विदर्भ' हा त्यामुळे केवळ भास (Illusion) म्हणूनच शिल्लक राहिला.

या भासाचा पाठलाग करणारा, त्याचें वास्तवतेंत रूपांतर करूं पाहणारा एक फार मोठा वर्ग आज मध्यप्रदेशांत विद्यमान आहे. सांप्रतच्या मध्यप्रदेशाचे तुकडे करून, त्यांतून 'महाविदर्भ' या नांवाचा एक स्वतंत्र राजकीय प्रांत आकारास आणावा, अशी या वर्गाची मागणी आहे. ही मागणी केवळ मध्यप्रदेशाच्या दृष्टीनेच नव्हे तर मध्यप्रदेशांतील मराठी जनतेच्या हिताच्या दृष्टीने, संयुक्त महाराष्ट्राचें महान् स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने प्रतिगामी असल्यामुळे निषिद्ध मानल्या गेली आहे. मौजेची गोष्ट ही की विदर्भ साहित्य संघाच्या कांहीं प्रमुख प्रतिष्ठित आणि वजनदार कार्यकर्त्यांनी या मागणीसंबंधी वृत्तपत्रांतून वेळोवेळीं जोरदार विरोध व्यक्त केलेला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या पुरोगामी आणि व्यापक ध्येयविशेषाच्या परिपूर्तीशीं महाविदर्भाची मागणी विसंगत आहे असें ठासून सांगण्यांत आलें आहे.

'विदर्भ साहित्य संघ' ही या महाविदर्भाच्या मागणीचीच सांस्कृतिक बाजू आहे. वस्तु मुळांत एकच आहे. महाविदर्भ हा तिचा राजकीय पैलू आहे. 'विदर्भ साहित्य संघ' हा तिचा सांस्कृतिक पैलू आहे. या एकाच वस्तूचें पहिलें म्हणजे राजकीय अंग तिरस्कारार्ह म्हणून धुडकावून लाविण्यांत आलें आहे आणि याच वस्तूचें दुसरें म्हणजे सांस्कृतिक अंग, पहिल्या अंगाचा निषेध करणाऱ्यांकडूनच, स्वागतार्ह मानलें जाऊन त्यांच्या स्तुतीस पात्र झालें आहे. या साऱ्या प्रकारांतून यामुळे एक भयानक विसंवाद उत्पन्न झालेला आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वाङ्मयकारण, हीं संस्कृतीचीं निरनिराळीं अंगें आहेत. कोणत्याहि संस्कृतीच्या या निरनिराळ्या अंगांत आचारविचारांच्या बाबतींत एकसूत्रीपणा असावयास पाहिजे, ही अत्यंत स्वाभाविक आणि समंजस अशी अपेक्षा आहे. ही अपेक्षा मान्य केली म्हणजे असें दिसून येतें की विदर्भ साहित्य संघाची निर्मिती ही सर्वस्वी विसंगतीवर आणि विद्रोहावर आधारलेली आहे. विसंवाद आणि विद्रोह हाच आजच्या परिस्थितींत विदर्भ साहित्य संघाचा स्थायिभाव आहे.

होऊं नये ती गोष्ट होऊन गेलेली आहे. विदर्भ साहित्य संघ हा—अजाणतांहि असेल कदाचित—विसंवाद आणि विद्रोह या दुष्ट वृत्तींच्या वातावरणांत सांपडल्या गेला आहे. आता या संकुचित वातावरणांतून विदर्भ साहित्य संघाला कसें बाहेर काढावयाचें ? निरोगी आणि पुरोगामी वृत्तीचें अधिष्ठान त्याला कसें प्राप्त करून द्यावयाचें ? विदर्भ साहित्य संघाच्या साऱ्या खऱ्या हितचिंतकांनी ज्या प्रश्नाचा अत्यंत जिव्हाळ्याने आणि अत्यंत तातडीने विचार करावयास पाहिजे, असा हा प्रश्न आहे; आणि निःस्वार्थ भूमिकेवरून विचार करणाऱ्याला त्याचें उत्तरहि सहज सापडण्यासारखें आहे.

माझ्या मतें, विदर्भ साहित्य संघाला या प्रतिगामी आणि प्रतिषिद्ध प्रवृत्तींच्या कचाट्यांतून सोडविण्याचा एक अत्यंत सोपा मार्ग उपलब्ध आहे. त्याचें

अनुसरण केल्याने विदर्भ साहित्य संघाला निरोगी अवस्था आपोआप प्राप्त होण्यासारखी आहे.

तो मार्ग असा: एखाद्या वस्तूचें विशिष्ट रूप भासमय, आभासमय आहे असें प्रत्ययास आल्यानंतर शाहण्या माणसांनी त्याचा नाद सोडावा आणि त्या वस्तूला प्रखर वस्तुस्थितीशी जुळेल असें रूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करावा. 'विदर्भ' हा एक भास आहे, भ्रम आहे हें पटल्यानंतर आणि तें नांव संकुचित स्वरूपाच्या व फुटीर वृत्तीला उत्तेजन देणाऱ्या राजकीय विचारप्रणालीशी संलग्न आहे हें जाणल्यानंतर आपल्या साहित्यिक चळवळींना त्या शब्दाच्या संसर्गापासून दूर ठेवावें. पुढे मागे कदाचित 'विदर्भ' या नांवाचा उपयोग कशावरून करावा लागणार नाही, अशीहि शंका येथे उपस्थित करतां येत नाही. कारण महाविदर्भाने मराठी भाषिकांची भूक तृप्त होणार नसून महाविदर्भासह आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र, हें ध्येय सफल झाल्याशिवाय त्याचें समाधान होणें शक्य नाही. तेव्हा 'विदर्भ' ही एक बावडी वस्तु समजून तिला बाजूला सारावें आणि 'मध्यप्रदेश' ही वस्तुस्थिति आहे हें ध्यानांत घेऊन 'विदर्भ साहित्य संघ' या नांवाऐवजी 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव मान्य करण्यांत यावें.

१. 'विदर्भ साहित्य संघ' या नांवांतील 'विदर्भ' या शब्दामुळे विदर्भ साहित्य संघाचें साहित्यिक आंदोलन हें महाविदर्भाच्या प्रस्थापनेच्या राजकीय आंदोलनाचेंच सांस्कृतिक अंग आहे, असा जो सकारण ठपका येण्याचा संभव आहे तो येण्याची शक्यता, 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव स्वीकारल्याने कायमची नाहीशी होऊन जाईल.

दुसराहि आणखी एक विचार आहे. भारतांतील आपण सारे लोक एकजिनसी भारतीय संस्कृतीचे घटक आहोंत हें खरें आहे; तरीपण भारतांतील निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांत थोडाफार सांस्कृतिक भेद आहेच. त्या दृष्टीने विचार केला तर मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांची एक संस्कृति आहे असें म्हणतां येईल. त्यांतहि पुनः विदर्भाची मराठी संस्कृति वेगळी; खानदेशची मराठी संस्कृति वेगळी, कोकणची मराठी संस्कृति वेगळी असे जर आपण आणखी क्षुद्र भेद करूं लागलों तर तें मात्र निश्चित आत्मघातकीपणाचें होईल. या आत्मघातकीपणाचें पाप आपल्या माथीं बसूं नये अशी जर आपली इच्छा असेल तर आपण 'विदर्भ साहित्य संघ' या नांवाचा तात्काळ त्याग केला पाहिजे आणि त्याऐवजी 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें हितकर नांव पटकन् पत्करलें पाहिजे.

२. 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव धारण केल्याच्या योगाने होणारा दुसरा फायदा विशेष महत्वाचा आहे. 'विदर्भ साहित्य संघ' म्हटला की त्याबद्दल फक्त विदर्भांतल्या मराठी भाषिकांचीच आस्था आणि आत्मीयता वाटते.

 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव स्वीकारल्यावर लागलीच त्या आत्मीयतेचें

अनुक्रमणिका

क्षेत्र आपोआप व्यापक होऊन जाईल. त्या संघाबद्दल फक्त विदर्भांतीलच नव्हे तर सबंध मध्यप्रदेशांतील मराठी भाषिकांना आत्मीयता वाटूं लागेल. उद्या संयुक्त महाराष्ट्राकरिता विराट आंदोलन करण्याची वेळ आली तर 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघा'च्या वतीनें आपणाला केवळ विदर्भांतीलच नव्हे तर सबंध मध्यप्रदेशांतील मराठी भाषिकांचें साहाय्य आणि सहकार्य मिळवितां येईल. मध्यप्रदेशाचे आठ मराठी जिल्हे सोडून उरलेल्या अ-मराठी जिल्ह्यांत सुद्धा मराठी भाषिकांची फार मोठी संख्या नांदत आहे. त्या सर्वांना संघटित करावयाचें असेल आणि मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या हिताकरिता त्या संघटनेचा उपयोग करून घ्यावयाचा असेल तर 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव असलेल्या संस्थेमार्फतच तें कार्य करून घेणें अधिक सुलभ, सयुक्तिक आणि समर्पक होईल. तसें पाहिलें तर आठ जिल्ह्यांव्यतिरिक्त मध्यप्रदेशाच्या बाकीच्या जिल्ह्यांतील आपल्या मराठी-भाषी बांधवांना आपण सर्वस्वी वाऱ्यावर सोडून दिलें आहे. त्यांची मराठी संस्कृति जर आपणाला जिवंत ठेवावयाची असेल, त्यांच्या अंतःकरणांतील मराठी भाषेबद्दलचें आणि मराठी वाङ्मयाबद्दलचें प्रेम कायम टिकवून शिवाय तें वृद्धिंगत करावयाचें असेल तर त्याकरिता आपण त्यांच्याजवळ गेले पाहिजे. आपल्या साहित्यसंस्थेबद्दल त्यांच्या मनांत आपलेपणा उत्पन्न केला पाहिजे; त्याकरिता तो आपलेपणा उत्पन्न करण्यास उपकारक होईल असेंच नांव आपण आपल्या साहित्यसंस्थेला दिलें पाहिजे. 'विदर्भ साहित्य संघ' या नांवापेक्षा 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव त्यांना जवळ आणण्याच्या दृष्टीनें निश्चित अधिक उपयुक्त आणि प्रभावी ठरेल.

विदर्भ साहित्य संघाचें नांव बदलण्याची व 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नवें नांव ठेवण्याची सूचना सकृतदर्शनीं मामुली स्वरूपाची वाटण्याचा संभव आहे; पण तिच्या परिणामांचा दूरवर विचार केला तर तिचा आशय क्रांतिकारक आहे हें सुजाणांच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. मराठी मुलुखांतील मराठी भाषिकांचें संघटन करणें हें तर आवश्यक आहेच; पण मराठी मुलुखाला लागून असलेल्या अमराठी मुलुखांतील मराठी भाषिकांचें संघटन करणें हें आवश्यक असून शिवाय दूरदर्शीपणाचेंहि आहे. म्हणून 'विदर्भ साहित्य संघ' हें नांव टाकून देऊन आपण मराठी भाषिकांच्या ध्येयाशीं आणि कृतीशीं सुसंगत असें 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नांव धारण करणें ही अत्यंत निकडीची सुधारणा होऊन बसली आहे. येत्या अकोल्याच्या संमेलनांत श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि विदर्भ साहित्य संघाचे सर्व कार्यकर्ते माझ्या या सूचनेचा अत्यंत सहानुभूतीनें विचार करतील, एवढेंच नव्हे तर त्या सूचनेमागील मराठीच्या हितसंबंधाबद्दलची दूरदर्शी जागरूकता लक्षांत घेऊन ती प्रत्यक्ष अंमलांत आणण्याकरिता या अधिवेशनांतच 'विदर्भ साहित्य संघा'चें 'मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ' हें नवें नांव जाहीर करतील अशी मी उमेद बाळगतों आणि 'विदर्भ' हा

अनुक्रमणिका

एक ‘ मास ’ आहे हें ओळखण्यानेच आणि ‘ मध्यप्रदेश मराठी साहित्य संघ ’ हें नांव धारण करण्यानेच मध्यप्रदेशांतील सर्व मराठी भाषिकांच्या संघटनेला उज्ज्वल ‘ भवितव्य ’ प्राप्त होणार आहे असें शेवटीं पुन्हा एकदा आग्रहपूर्वक सांगूं इच्छितों.

—अच्युत नारायण देशपांडे

कोणत्याहि संस्थेपुढील कार्य दोन प्रकारचें असतें—संरक्षणात्मक व विकासात्मक. संरक्षणात्मक कार्यात, आक्रमक व विरोधी शक्तींना तोंड देऊन स्वत:चें कार्यक्षेत्र तसूभरहि कमी न होऊं देण्याची जबाबदारी असते. विरोधी परिस्थितीमुळे संस्थेच्या अस्तित्वावरच घाला येण्याचा अनेकदा संभव असतो. म्हणून संस्थेचे हरप्रकारें संरक्षण करून आक्रमक प्रवृत्तींना पायबंद घालण्याचें काम करायचें असतें. विकासात्मक कार्यात संस्थेच्या कार्याचा विस्तार करायचा असतो; कार्यप्रवणतेचीं नवीन नवीन दालनें उघडायचीं असतात; नवीन उमेदी, नवा उत्साह ह्यांच्या बळावर कार्यक्षेत्र अधिक व्यापक करायचें असतें. वि. सा. संघ ही सुद्धा एक संस्था आहे, म्हणूनच तिच्यासमोरील कार्यहि असेंच दुहेरी आहे.

आजकालच्या ह्या बदलत्या काळांत, मराठीच्या संरक्षणाची फार मोठी जबाबदारी वैदर्भीय जनतेवर आहे. विशेषत: मध्यप्रदेश द्विभाषी प्रांत असल्यामुळे ह्या प्रश्नाला फार धार आलेली आहे. एका दृष्टीने पाहिल्यास, राष्ट्रभाषेचा योग्य तो अभिमान धरूनहि स्वभाषेचा विकास करतां येतो. दोन्ही भाषांच्या प्रेमाचा समन्वय साधणें कठीण नाही. पण असा सुवर्णमध्य साधणें आजकाल अनेकांना जमत नाहीसें दिसतें. ते एकतर राष्ट्रभाषेला शिव्या देऊन, स्वभाषेच्या अवास्तव अभिमानामुळे एकांडे शिलेदार बनतात; किंवा राष्ट्रभाषेच्या अनावर प्रेमांत देहभान हरपून बिचाऱ्या मराठीला पार विसरतात. आत्यंतिकतेचीं हीं दोन्हीं टोकें टाळून हिंदीचा द्वेष न करतां मराठीचा विकास करतां येईल. राष्ट्रभाषा शिका; तिच्यावर प्रभुत्व मिळवा. बाबुराव पराडकर, सप्रे इ. महाराष्ट्रीयांनी हिंदी साहित्यांत मानाचें स्थान मिळवलेलें आहे. बदलत्या समयाला अनुसरून आपण हिंदी शिकलों नाही तर मागे पडूं. स्वभाषेच्या प्रखर अभिमानाची ज्योत राष्ट्रभाषेच्या द्वेषाग्नीवरच पेटवली पाहिजे असें थोडेंच आहे? मराठीचा अभिमान बाळगूनहि हिंदीचा उचित गौरव करतां येईल. मात्र असें करतांना मराठीच्या अधिकारावर व क्षेत्रावर आक्रमण होऊं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. पत्रव्यवहारांत, घरगुती वातावरणांत व सामान्यत: बोलण्याचालण्यांत मराठीलाच अग्रस्थान मिळालें पाहिजे. मराठी प्रांतांत मराठी भाषिकांसमोर भाषण करतांना मराठींतूनच बोलण्याचा साधा शिष्टाचार पाळा व इतरांकडून पाळवून घ्या. तुम्ही स्वत:च आपल्या अधिकारांविषयीं जागरूक राहिलांत म्हणजे इतर लोकहि तुमच्या भाषेवर आक्रमण करतांना वचकतील. तुमच्या मुलांना मराठींतूनच शिक्षण देण्याची

परांकाष्ठा करा, अशी व्यवस्था नसेल तर ती घडवून आणण्याचा प्रयत्न करा. अगदी घरगुती दृष्टांत द्यायचा म्हणजे, मावशीवर आईसारखीच माया करा, पण तिला आईचें स्थान मात्र देऊं नका.

निरनिराळ्या प्रबळ प्रवृत्तींना न जुमानतां संघाला विकासात्मक कार्य घडवून आणायचें आहे. ह्या दृष्टीने पाहतां, विदर्भ साहित्य संघाची तुलना रानांत स्वैर रीतीने वाढणाऱ्या वृक्षाशीं कराविशी वाटते. कुंडींत पाणी घालून प्रेमाने जोपासना केलेलें फुलझाड कितीहि आकर्षक असलें तरी विरोधी शक्तींना तोंड देण्याचें सामर्थ्य त्याच्यांत नसतें. प्रतिकूल परिस्थितीशीं झुंज खेळून स्वतःचा विकास करून घेण्याला तें असमर्थ असतें. केवळ मालकाच्या प्रेमळ कृपाछत्राखालींच त्याची वाढ तेवढी व्हायची. पण रानांतलें आपोआप उगवणारें झाड पहा. कुणी संरक्षणहि करीत नाही. तरीहि वारा, उन, पाऊस, थंडी ह्यांच्याशीं टक्कर खेळत तें बेगुमाणपणे जगत असतें. विरोधी परिस्थितीशी सामना देऊन कणखरपणाने तें आपली वाढ करून घेत असतें. हाच दुर्दम्य आशावाद, हीच चिकाटी व झुंजारवृत्ति विदर्भ-साहित्य संघाच्या अंगीं बाणली पाहिजे.

संघापुढचें हें विकासात्मक कार्य अखंड आहे. हें चिरकाल चालणारें ज्ञानसत्र आहे. "त्यानंतर हारतुरे होऊन हा गोड समारंभ आटोपला" असें संघाच्या कोणत्याहि कार्याविषयी म्हणतां यावयाचें नाही. कारण भाषावर्धनाचा हा सोहळा अविरत चालणारा आहे. प्रत्येक मराठी भाषीयाच्याच नव्हे तर अनेक परभाषीयांच्या मनांतहि 'माझा मराठाचि बोलू कवतिकें' ही उर्मी निर्माण करायची आहे. "प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्" ह्या न्यायानुसार मराठी प्रेमाच्या ह्या एका मंगल ज्योतीपासून असंख्य ज्योती प्रज्वलित होतील, व मराठीला तिचें मानाचें व गौरवाचें स्थान मिळवून देतील, असा विश्वास वाटतो.

मराठीचा विकास करायचा असेल तर रंगभूमीला उर्जितावस्थेस आणलेंच पाहिजे. 'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्' हें वचन सार्थ आहे. नाटकामुळे निरनिराळ्या मनोवृत्तींच्या लोकांचें मनोरंजन होतें. म्हणूनच समाजां-तला सर्व थरांतला प्रेक्षकवर्ग नाटकाकडे आकर्षिला जातो. ह्यामुळे नाटक हें भाषाविकासाचें अमोघ माध्यम झालें आहे. एकादें नाटक लोकांना आवडलें की, त्यांतल्या कोट्या, पात्रांचीं स्वभाववैशिष्ट्यें प्रगट करणारीं भाषणें, व गाणीं ह्यांचा मनावर फार प्रभाव पडतो; लोकांच्या भाषेलाहि तसेंच वळण लागतें. नाटक हें दृश्य व श्राव्य असें दुहेरी काव्य आहे. तेव्हा लोकांच्या मनावर परिणाम घडवून आणण्यांत तें यशस्वी झाल्यास नवल कसलें ! म्हणूनच नवीन नवीन नाटकांना प्राधान्य देऊन त्यांचे प्रयोग करण्याला उत्तेजन मिळालें पाहिजे. ह्या कामीं महत्त्वाची अडचण म्हणजे नाटकगृहांची. ती दूर करायला हवी, म्हणून शक्य होईल तेव्हा उमरावती, अकोला व नागपूर ह्या ठिकाणीं नाटकगृहें बांधण्याचें काम वि. सा. संघाने हातीं घ्यावें. ह्या कामीं स्थानिक धनिकांचेंहि साह्य घ्यावें. भाषासेवेच्या ह्या सोहळ्यांत सामान्य नागरिकांबरोबर लक्ष्मीपुत्रांनीहि आपला वांटा उचलला पाहिजे.

जनतेंत, आजकाल हिंदी चित्रपटांचें जबरदस्त वेड पसरत आहे. अनेक मराठी दिग्दर्शकहि हिंदी चित्रपट काढून पैसा कमावण्याचें ध्येय डोळ्यासमोर ठेवत आहेत. ह्यामुळे मराठी चित्रपटांची संख्या अगदीच रोडावली आहे. गेल्या वर्षी हिंदी चित्रपट शेकड्यांनी निघाले तर केवळ सातच बोलपट मराठी भाषेंत तयार होऊं शकले. तेव्हा मराठीच्या विकासाच्या दृष्टीने मराठी बोलपटांकडून विशेष अपेक्षा करण्यांत अर्थ नाही. चित्रपट हें खर्चिक माध्यम वि. सा. संघाच्या शक्तीबाहेरचें आहे. म्हणूनच मराठी चित्रपट नाही तर मराठी रंगभूमीलातरी चालना देण्याचें काम संघाला करावें लागेल. असें झालें तरच मराठीच्या प्रांतांत मराठीच्या विकासाला अनुकूल परिस्थिति निर्माण होऊं शकेल.

वि. सा. संघाने तरुण मराठी लेखकांना पुढें आणायचें काम केलें पाहिजे. कारण हेच होतकरू लेखक आणखी कांही वर्षांनी मराठीच्या सेवेची धुरा वाहणार आहेत. तरुण लेखकांना उत्तेजन देणें, त्यांच्या लिखाणांतील दोषस्थळें दाखवून त्यांना मार्गदर्शन करणें, हें काम एकतर स्वतः वि. सा. संघाने हातीं घ्यावें किंवा विदर्भांतील उत्तमोत्तम साहित्यिकांची एक समिति नेमून तिच्याकडे हें कार्य सोपविण्यांत यावें. मराठीची ही भावी आघाडी निर्माण करण्याची जबाबदारी संघावर आहे. हें काम संघाने केल्यास वैदर्भीय साहित्यिकांच्या पुढील पिढ्या संघाला खात्रीने धन्यवाद देतील.

तसेंच, मराठींत मोलाची भर पडेल अशा अप्रकाशित मराठी ग्रंथांचेंहि प्रकाशन झालें पाहिजे. नागपूरचे विद्वद्रत्न श्री. दप्तरी ह्यांचे अनेक बहुमोल ग्रंथ अजून प्रकाशनाची वाट पहात आहेत. अशा उत्तमोत्तम ग्रंथांचें स्वतःच प्रकाशन करण्याचें काम संघाने हातीं घ्यावें. उत्तरप्रदेशाचें सरकार दरवर्षी साहित्यिकांना कांही रकम प्रदान करतें. विदर्भांतील निर्धन साहित्यिकांचें लेखन निर्वेध चालावें म्हणून त्यांना मध्यप्रदेशीय सरकारकडून आर्थिक साह्य देव-विण्यांत आलें पाहिजे. ह्याला बराच कालावधि लागेल पण तसें ध्येय मात्र डोळ्यासमोर असावें.

जुन्या वैदर्भीय लेखकांच्या वाङ्मयाचा सखोल व सर्वांगीण अभ्यास झाला पाहिजे. ह्यासाठी दरवर्षी एकेका साहित्यिकाच्या वाङ्मयाच्या निरनिराळ्या पैलूंवर प्रकाश टाकणारे निबंध मागविण्यांत यावेत. एका वर्षी गडकरी नाटककार म्हणून, तर दुसऱ्या वर्षी विनोदी लेखक म्हणून, तिसऱ्या वर्षी कवि व चवथ्या वर्षी शैलीकार म्हणून त्यांच्या लेखनावर विवेचक निबंध लिहिले गेले पाहिजेत. अशा उत्कृष्ट निबंधांना पारितोषिकें देऊन ह्यांच्या प्रकाशनाचीहि व्यवस्था संघाने करावी. कोल्हटकरांच्या वाङ्मयाचाहि असाच सखोल अभ्यास झाला पाहिजे. जुन्या वैदर्भीय साहित्यिकांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्याचा ह्यापेक्षा चांगला मार्ग कोणता ! गडकरी व कोल्हटकर ह्यांचें असेंच स्मारक करणें इष्ट होणार नाही काय !

—मधुकर केशव शेटे

'विदर्भ साहित्य संघ' या नांवांतील पहिलें पद आकुंचित अर्थाने वऱ्हाड व व्यापक आणि ऐतिहासिक दृष्टीने वऱ्हाड नागपूरचा भाग—महाविदर्भ-सूचित करत असलें तरी व्यवहारतः मराठी भाषेच्या संबंधाने संपूर्ण मध्यप्रदेश संघाच्या कार्यकक्षेत येतो. आपला प्रांत दुभाषी आहे. त्यांतील महाकोशल हा हिंदीप्रधान व महाविदर्भ मराठीप्रधान असून दोन्ही भागांत दुसऱ्या म्हणजे अनुक्रमें मराठी व हिंदी भाषिकांची संख्या उपेक्षा न करतां येण्याजोगी मोठी आहे. प्रांताचें हें दुभाषी स्वरूप राजमान्य असून हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना आपल्या राज्यांत राजभाषांचा दर्जा राहावयाचा आहे. तत्वतः दोन्ही भाषांचे हक्क, अधिकार व महत्व समान राहिलें पाहिजे.

या दोन भाषांपैकी हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा म्हणूनहि लोकमान्य व राजमान्य झालेली आहे. घटनेने मान्यता दिलेली हिंदी ही राष्ट्रभाषा असली तरी त्याच घटनेप्रमाणे संस्कृत व उर्दु यांच्या बरोबर इतर अकरा प्रादेशिक भाषा या राष्ट्रीय अथवा भारतीय आहेत हें विसरून चालायचें नाही. हिंदीचा इतर भाषांशीं कोठे संघर्ष येत असेलच तर तो राष्ट्रभाषा विरुद्ध अराष्ट्रभाषा असा नसून राष्ट्र विरुद्ध राष्ट्रीय भाषा असा कांहीसा विचित्र वाटणारा राहील. यौवराज्यधिकार प्राप्त झालेल्या हिंदीचें भाषाभगिनींशी वागण्याचें धोरण कसें राहील हें आपल्या प्रांतांत चांगल्याप्रकारे समजून येईल. कारण याठिकाणीं असणारें त्यांचें निकट साहचर्य व तेंहि सामान्यतः समान भूमिकेवरचें. मुंबई, मद्रास इत्यादि राज्यांत आढळणारा भाषासंघर्षाचा प्रकार म्हणजे छोट्या बहिणींच्या आपसांतील कलागतीचा.

इतर बहुभाषी प्रांतांतील मधून मधून ऐकूं येणाऱ्या 'वाचावाची' वरून आपल्या प्रांतांतील भाषाविषयक संबंध बरेच सलोख्याचे व समंजसतेचे आहेत हें मान्य केलें पाहिजे. यांतील यशाचा वाटा दोन्ही भाषिकांकडे जातो हेंहि प्रांजलपणे मान्य केलें पाहिजे. निव्वळ बहुमताच्या जोरावर हिंदीने आपली कुर घोडी प्रत्येक ठिकाणीं केली नाही हें जसें खरें, तसेंच मराठीने आपल्या प्राप्तीचा वाटा काटेकोरपणे मागण्याचा अट्टाहास धरला नाही हेंहि स्पष्ट आहे. राष्ट्रीय भाषांत एकमेकीला अत्यंत जवळ असणाऱ्या दोन भाषा कोणत्या असतील तर त्या हिंदी व मराठी या होत. दोहींची लिपि एकच. थोडेसे असलेले वर्णभेदहि बाजूस सारून हिंदीने मराठींतील लेखनसुकर वर्ण आत्मसात केले आहेत. हिंदी विरुद्ध हिंदुस्थानी असा झगडा चालला असतां हिंदीचा सतत व प्रभावी पाठपुरावा केला तो मराठी भाषिकांनीच. अहिंदी मातृभाषा असणाऱ्यांपैकी हिंदीची निष्ठापूर्वक साहित्यसेवा केली व करत आहेत ते मराठी भाषिकच. हिंदींत रचना करण्याचें बाळकडू तेराव्या शतकांत नामदेवांनी दिलें तें दोन्ही भाषांना बाळसेदार बनविण्यासाठी. आजहि ती परंपरा अबाधित चालू आहे.

गोंदियाच्या साहित्यसंमेलनांतील अध्यक्षीय भाषणांत, वैनगंगेच्या तीरावर महाराष्ट्र सारस्वताचें झाड अनेक शाखांनी कसें फोफावलें होतें, हें डॉ. कोलते

यांनी आद्यकवि मुकुंदराजांसह अनेकांचा उल्लेख करून दाखविलें. नंतरच्या कालांतहि अनेक लहान मोठ्या साहित्यिकांची महाकोशल ही कर्मभूमि झाली. मराठ्यांच्या राज्यविस्ताराच्या धोरणानुसार ठिकठिकाणीं मराठ्यांच्या वसाहती स्थापन झाल्या. प्रमुख ठिकाणीं मराठी भाषिकांची संख्या—शेती, नौकरी, उद्योगधंदे, स्वतंत्र व्यवसाय इत्यादि कारणांनी—डोळ्यांत भरण्याइतकी मोठी आहे.

सर्वच दृष्टींनी मागासलेल्या या भागांत लोकजागृतीचें कार्य करणारी पुढारी मंडळी महाराष्ट्रीयच होती. राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक इत्यादि क्षेत्रांत त्यांनी केलेलें कार्य अविस्मरणीय आहे. दासबोध व गीतारहस्य यांचा हिंदींत अनुवाद करणारे कै. पं. माधवरावजी सप्रे यांचा बानगीदाखल उल्लेख करतों. महाकोशल-मधील राजकीय जागृतीचे ते जनक होते. शक्य तेवढें मराठीपण राखून या भागां-तील मराठीभाषी जनता स्थानिकांच्या समाज जीवनाशी एकरूप झाली. मराठी-पणांतून उत्पन्न झालेल्या मायबोलीच्या जिव्हाळ्याने ठिकठिकाणीं मराठींतून शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापण्यांत आल्या. आवश्यक असूनहि कांही ठिकाणीं त्या स्थापन न होण्याचें कारण म्हणजे प्रतिकूल परिस्थिति व कार्यकर्त्यांचा निरुत्साह.

तथापि हे प्रयत्न जेथे यशस्वी झाले तेथील कार्यकर्त्यांच्या उत्साहावर विरजण पडण्यासारखी स्थिति आता निर्माण झाली आहे. आपल्या प्रांताचें द्विभाषी स्वरूप लक्षांत घेऊन नागपूर विश्वविद्यालयाने मराठी व हिंदी या दोन माध्यमांची सोय केलेली आहे. बहुतेक महाविद्यालयांतून आवश्यकतेनुसार अध्या-पनाचीहि तशी व्यवस्था झाली असल्याचें समजतें. महाकोशलमध्ये मात्र आढळ-णारी परिस्थिति यापेक्षा वेगळी आहे. बहुसंख्याकांच्या हिंदीचाच माध्यम म्हणून स्वीकार झाला आहे. हिंदीभाषिकांच्या खालोखाल संख्याबल मराठी भाषिकांचेंच असून तेहि उपेक्षा करण्याजोगें अल्प नाही. येथेहि विकल्प म्हणून मराठी माध्यमाला मान्यता मिळावी. जबलपूर सारख्या प्रमुख ठिकाणीं मराठी माध्यमाचें एखादें महाविद्यालय चालणें अशक्य नाही.

महाकोशलमधून—विशेषतः जबलपूरहून—मराठी माध्यम घेणारे शेंकडो विद्यार्थी मॅट्रिकच्या परीक्षेस बसतात. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांत प्रवेश घेतल्यावर हिंदीमधून सारे विषय शिकावे लागतात. मॅट्रिकपर्यंतचा अभ्यास-क्रम मराठींतून पूर्ण केल्यानंतर अवचितपणे करावें लागणारें हें "भाषांतर" तत्वतः व व्यवहारतः कसें हानिप्रद होत जाईल हें स्पष्ट आहे. हिंदी साहित्याचा मुळीच परिचय नसणाऱ्यांना अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, इत्यादि विषयांचें अध्ययन व लेखन एकदम कसें जमणार ! भाषाज्ञानाचा अभाव त्यांच्या यशाला बाधक झाल्या शिवाय कसा राहील ! ज्या भाषेचें आतापर्यंत मुळीच अध्ययन झालें नाही, तिच्या माध्यमाने उच्च ज्ञान संपादन करणें शिक्षणशास्त्राच्या मूलभूत तत्वाला निदान अविरोधी तरी आहे काय !

या प्रश्नासंबंधाने मराठी माध्यमांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आवश्यक तें करावयास हवें. तथापि मराठी भाषा व शिक्षणशास्त्र या दोन्ही दृष्टींनी हा प्रकार इष्ट आहे की काय याचा विचार होणें अगत्याचें आहे. भाषांच्या बाबतींत पंक्तिप्रपंचाचें धोरण कटाक्षाने टाळून यांनी गुण्यागोविंदाने नांदावें यासाठी जागरूक असणाऱ्या आपल्या राज्यशासनाचें लक्ष आपणच या पक्षाकडे वेधावयास नको काय ? मध्यप्रदेशांतील मराठी भाषिकांच्या उपेक्षाबुद्धीचें परिमार्जन विदर्भ साहित्य संघाने तरी करायला हवें.

—दा. ल. अडोणी

थोरांचें उजळून जिणें !

☆

तावून, सुलाखुन घ्या सोनें
हो अग्निदिव्य त्याला लेणें !

आपत्तीविण पुरुषार्थाला
कसा मिळावा सांग उजाळा ?
आपत्तीने चारित्र्याला
नवपैलु झळकतिल तेजगुणें !

आपत्तीला राम न भ्याला
विपत्ति भिववी नच सीतेला
आपत्ती करि वंद्य जगाला
थोरांचें उजळून जिणें !

तावून, सुलाखुन घ्या सोनें
हो अग्निदिव्य त्याला लेणें !!

—नारायण माधवराव सरपटवार

मराठी भाषेचें भवितव्य

मा. ज. कानेटकर

★

मराठी भाषेच्या भवितव्याबाबत अनेकांना भयानें ग्रासिलें आहे असें दिसतें. अकोल्याच्या विदर्भ साहित्य संमेलनांत मराठी भाषेच्या भवितव्याची मजबूत पायाउभारणी कशी करतां येईल याचा बहुतेक मोठ्या इर्षेनें विचार करण्यांत येईल. या संबंधी कार्यक्रम कसा आंखावा हें सांगण्याचा माझा अधिकार नाही; सदहू प्रश्न मजपेक्षा अधिक अधिकारी व्यक्तींनी सोडविणेंच जास्त श्रेयस्कर होईल. मी या लेखांत फक्त आमच्या भयग्रस्ततेचीच चर्चा करणार आहे. आमच्या समोरील समस्येकडे आम्हीं कसें पाहिलें पाहिजे या दृष्टीनें माझे विचार थोडे फार जरी सहाय्यीभूत ठरले तरी मला आनंद वाटेल.

समुद्रावर वावटळ अगर तुफान नसावें अशी इच्छा असणें फार स्वाभाविक आहे, पण घरांतील गंजांतील पाणी जसें स्तब्ध असतें तशागत समुद्रसपाटी असावी ही अपेक्षा योग्य ठरणार नाही. हिमालयाच्या डोक्यावरील बर्फाची टोपी उष्णता मानाप्रमाणे लहान मोठी होत असेल पण ही टोपी अजीबात नामशेष होईल असा धाक बाळगणें हें अनुभवाला धरून होणार नाही. सूर्य क्रमशः थंड होत आहे असें शास्त्रज्ञाचें मत आहे व तो पूर्णपणे थंडावला तर मानवाचें काय होणार हा खरोखर काळजी करण्यासारखा प्रश्न आहे पण या काळजीपायी डोकें धरून बसणें फारसें शहाणपणाचें होणार नाही.

या सर्वांचा अर्थ इतकाच की संघर्ष हा जगाचा धर्म आहे. तेव्हा आमच्या मराठीला संघर्षशून्य परिस्थितींत फोंफावण्यास वाव मिळेल अशी आम्हीं कधींहि अपेक्षा करूं नये. त्याचप्रमाणे कालमानाच्या उष्णतामानानुसार मराठी भाषेच्या प्रभुत्वाचें क्षेत्र कमी अधिक होत राहील पण हें क्षेत्र क्वचित् शून्यवत् होऊन मराठी भाषेचा संपूर्णतः नाश होईल अशी भीति सतत उराशी बाळगणें हें फारसें तर्कशुद्ध आहे असें मला वाटत नाही.

आम्हाला जी भीति वाटते तिचें थोडेंसें विश्लेषण केलें म्हणजे या भीतीचें स्वरूप स्पष्ट होईल व मग भीतिच वाटेनाशी होईल. इंग्रजी भाषा अंतर्धान पावल्यामुळे अगर त्या मागील लागल्यामुळे आणि हिंदी भाषेनें राष्ट्रभाषेची न्यायतः जागा घेतल्यामुळे भाषाक्षेत्रांत फार मोठी उलथापालथ झाली. या उलथापालथी-

मुळे हिंदीचा सर्वांत अधिक लाभ झाला; इतर भाषांना गौणत्व आलें. इंप्रूव्हमेंट ट्रस्टने एखादा नवा रस्ता काढल्यामुळे घरांचा मौलिक तरतमभाव बदलणें फार स्वाभाविक आहे पण त्यामुळे जणुं काय घरावर वीज पडून घर जमीनदोस्त झाल्यागत गळा काढण्याचें मला तरी कारण दिसत नाही. प्रत्येक उलथापालथी-नंतर—अगदी प्रत्यक्ष धरणी कंपानंतरहि—सर्व कांही क्रमशः स्थिरस्थावर होतें असा नेहमीचा अनुभव नाही काय !

राजकारणाच्या क्षेत्रांतच भिन्न कारणांमुळे मराठी भाषीयांचा भाव आज कमी आहे. पण हें असेंच राहणार आहे असें समजण्याचें काही कारण आहे असें मला वाटत नाही.. स्वराज्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या उफाळ्यांतून सध्या आम्ही जात आहोंत. महात्मा गांधी गुजराती होते एवढ्यामुळेच सामान्य गुजरात्याला "मी स्वराज्य मिळविलं" असें वाटत असेल तर वाटूं द्यावें त्याला. लो. टिळकांच्या चलतीच्या काळांत आम्ही नव्हतों कां थोडें आव्यतेनेच वागत ! अहो, आज सुद्धां आमच्यापैकी अनेक म्हणतात, "राजकारण फक्त महाराष्ट्रीयांनाच समजतें." हें म्हणण्याचा हक्क आम्ही इतरांसाहि दिला पाहिजे. हिंदी राष्ट्रभाषा झाल्यामुळे इतर भाषीयांकडे कमीपणाने पाहण्याचा मोह सामान्य हिंदी भाषीयाला व्हावा हें क्षम्यच मानलें पाहिजे. या सर्व मनुष्यस्वभावजन्य भावना आहेत व हे विकार इतरांतच संभवतात असें नसून आम्ही सुद्धा या विकारांनी पीडित असतों.

वरील स्वभावजन्य मर्कटवृत्तीला सत्तालोलुप राजकारणाच्या विंचवाने दंश केल्यामुळे भाषेच्या क्षेत्रांतील भांडण अधिकच चिघळावें हें फार स्वाभाविक आहे. पण या सर्व गोष्टी आजच्या परिस्थितींत अपरिहार्य आहेत हें आम्ही ओळखलें पाहिजे. सोबतच आम्ही हेंहि ओळखावयास पाहिजे की आजची ही जी संघर्षवृत्ति आहे ती आमच्या राष्ट्राचा स्थायीभाव बनूं शकत नाही. स्वतंत्र व उदयोन्मुख राष्ट्राला ही तर्कशून्य वृत्ति स्थायीभाव म्हणून पत्करतां येणार नाही व स्वराज्य-प्राप्तीनंतरची अप्रस्तुतपणाची प्रथम, स्वाभाविक व अनावर ऊर्मी एकदाची शमली (व ती शमणार हें अगदी निर्विवाद आहे) म्हणजे सर्व कांही रीतसरपणे चालूं लागेल याबद्दल तिळपाय शंका बाळगण्याचें कारण नाही.

हिंदीभाषी लोक मराठी भाषेचा प्राण घेण्यास उठले आहेत असें घटकाभर मानूं या. पण तें कितपत शक्य आहे याचा मुळीच विचार न करतां जणुं काय मराठीचें मरण आठवड्यावर आलें असावें अशागत सैरावैरा पळत सुटण्यांत मोठेसें भूषण आहे असें मला वाटत नाही. या बाबतींत तर्क करीत बसण्याचें कारण नाही. परशुरामाने एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा प्रयत्न केला असें म्हणतात. राक्षसांनी सर्व ऋषींच्या माना कापण्याचा पुनः पुनः प्रयत्न केला व अगदी अलिकडचेंच उदाहरण द्यायचें तर हिटलरने यहुद्यांचा निःपात करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांचें काय झालें ? आज क्षत्रीय व यहुदी दोघेहि सहीसलामत

आहेत व राक्षस असेतों ऋषि संपल्याचा पुराणांतरीं दाखला नाही. यापेक्षा का जास्त तीव्र व अधिक यशस्वी प्रयत्न हिंदीभाषी करणार आहेत ? असें ज्याला वाटत असेल त्याची कींवच करावी लागेल.

पं. जवाहरलालजींनी आमच्या देशाला निधर्मी (Secular) राज्य म्हणतांक्षणीं हलकल्लोळ माजला पण या त्यांच्या घोषणेचा परिणाम म्हणून देशांतील एखाद्याच्या तरी संध्यापूजेला कायदेशीर मनाई झाल्याचें उदाहरण दाखवितां येईल काय ? मग हिंदी राष्ट्रभाषा झाली म्हणून आता मराठीच्या प्रगतीच्या आड अडचणी येणारच असें समजण्याचें कारण काय ? राजकारणांतील भाग म्हणून एखादी मराठी शाळा बंद होणें, अगर एखाद्या कॉलेजांत मराठीभाषीयांची संख्या अधिक असूनहि प्रोफेसर हिंदी असल्यामुळे संस्कृत विषयाकरितां संस्कृत माध्यम वापरूनच मराठीला बगल देणें एवढ्या चिल्लर गोष्टींवरून सर्वसामान्य सिद्धांत काढून भयाचा डोंगर रचणें हें दूरदर्शित्वाचें लक्षण नव्हे.

जंगलांत प्रत्यक्ष व्याघ्रदर्शन झालेला भयाने व्यापिला गेला म्हणजे तो घरीं आला तरी त्याला सर्वत्र वाघच दिसतात. अशा भयग्रस्ताने कल्पनेने उभ्या केलेल्या सहस्रावधि काल्पनिक वाघांचा प्राण घेऊन त्याची भीति निवारण करण्याची आशा बाळगतां येईल काय ? या भयग्रस्ताने स्वतःची भीति सोडणें हाच त्याच्या सुटकेचा खरा मार्ग आहे. मराठी भाषेवरील आक्रमणाबाबत आम्ही थोड्याफार प्रमाणांत अशाच वृत्तींत आहोंत. आमच्या काल्पनिक भीतीचीं जीं शेंकडो सर्पें आहेत तीं कोणीहि नष्ट करूं शकणार नाही. आम्हालाच आमची निराधार भयग्रस्तता सोडावी लागेल.

मराठी भाषेच्या भवितव्याबद्दल कोणी भीतीने बोलूं लागला की मला अगदी मेल्यासारखें होतें. ही भावना पुनः पुनः व्यक्त करून आम्ही निष्कारण हिंदीभाषीयांचा आमच्याबद्दलचा राग वाढण्यास मदत करतों व जें न व्हावें अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे त्यालाच प्रत्यक्षतः मदत करतों. एका भाषेने दुसऱ्या भाषेला नष्ट करण्याच्या गोष्टी तर दूरच राहोत, खुद्द कोणतीहि भाषा तिच्याच पोटभाषांपैकीं एखादीलाहि आत्मसात् करूं शकणार नाही. पुणेरी भाषा नागपुरी अगर वऱ्हाडी मराठीला सुद्धा नामशेष करूं शकणार नाही. हिंदी राष्ट्रभाषा झाली तरी छत्तीसगडी अगर बुंदेलखंडी हिंदीचा प्राण घेण्यास ती असमर्थ ठरेल. असें असतां हिंदीभाषा कधी काळीं मराठीला संपूर्णपणे ग्रासूं शकेल या भयाने आम्हांला त्रस्त करून सोडावें हें बुद्धिमत्तेचें लक्षण नव्हे.

यांत आणखी एक मौज अशी आहे की इतरांच्या मानाने मराठीभाषी गृहस्थ निराळी भाषा लवकर आत्मसात् करूं शकतो. ही एक ईश्वराची कृपा आहे व तिच्यामुळे वास्तविक आमचा आत्मविश्वास अधिक वाढावयास हवा. गुजराती, तामीळ, बंगाली, हिंदी या भाषा मराठीभाषाभाषी ज्या प्रमाणांत व जितक्या

चांगल्या बोलूं शकतात त्या मानाने इतर भाषाभाषी स्वच्छ व शुद्ध मराठी बोलत असल्याचें उदाहरण अपवादादाखलच मिळेल. असें असल्यामुळे तर मराठी भाषाभाषीयांची भयग्रस्तता अधिकच अक्षम्य ठरते.

सारांश, मला एवढीच नम्र आणि परोपरीची विनंति करायची की कोणत्याहि मराठी वाङ्मयसेवकाने स्वतःच्या आचार–विचारांतून मराठी भाषेच्या भवितव्याबाबत भयग्रस्ततेचा विचार कोणासमोरहि मांडूं नये. त्याने प्राप्त परिस्थितीवर यत्किंचित्हि परिणाम न होतां फक्त आपला आत्मविश्वास ढासळण्यास मदत होईल व हिंदी भाषीयांचा रोष वाढण्यासच मदत होईल व व्यवहारदृष्ट्या हे परिणाम आमंत्रणीय आहेत असें मला वाटत नाही. मराठी भाषा, नाट्य, काव्य, बोलपट, ग्रंथसंग्रहालयें इत्यादि कशालाहि कायदेशीर बंदी होणार नाही. मराठी भाषाभाषीयांच्या प्रतिभेची खच्ची करण्याचें रिकामटेकडें काम फक्त आम्हीच आपसांत करण्याचा संभव आहे; इतरांना तें करण्यास सवड नाही व संधिहि नाही. राज्यकर्त्यांचा पुरस्कार कधी कमी तर कधी अधिक मिळेल पण तेवढ्यावरून तर्कांचें बारू पळविण्याचें कारण नाही आणि खुद्द मध्यप्रदेशशासनाने तर विदर्भ साहित्यमंदिरास जागा देऊन याहि बाबतींत आमचें तोंड बंद केलें आहे. एखादी मागणी पुरविण्यांत आली की कृतज्ञतेचा पूर वाहवायचा, एखादी मागणी नामंजूर झाली की मराठी भाषेवर हल्ला झाल्याबद्दल ओरड करायची यामुळे आपल्यांतील गांभिर्याचा अभावच सिद्ध होईल. म्हणून म्हणायचें की सध्याच्या संघर्ष व संक्रमण काळांत आम्हीं सर्व प्रकारचें भय सोडून आत्मविश्वासाने व सव्यसाचित्वाने पुढे जाणें यांतच मराठी भाषेचें कल्याण आहे व अशा खंबीर मनोभूमिकेवर अधिष्ठित राहून संथ व संततपणे मराठी भाषेची सेवा करण्यानेच स्वयंभू अमर असलेली (इतर भाषांप्रमाणेंच) मराठी भाषा तेजाने तळपण्याचा संभव आहे.

जीवनलहरी

—१—

शद्बांच्या किमयेतुन
कल्पनेंत कैफांतुन
सुंदरता जीवनांत
कवितेच्या ओळींतुन
शिव्या-शाप जग देतें
शद्ब तेंच वापरते
शद्बांतुन जादु वसे
मधुरपणा वांढतसे !

—२—

शद्बांतुन आज इथे
नवकविता अवतरते
विषयांतुन आज इथे
नवकविता अवतरते
विषय नवे, भाव नवे
दृष्टिकोण नवेनवे
संग्रामहि आज नवा
प्रगतीच्या शंकेचा !—

—योगेश्वर अभ्यंकर

आवाहन !

✱

ये प्रतिभे ! ये नवरसरंगे !
इथे न कोणी ! तू मी दोघे !

एक दीप हा इथे तेवतो
तोहि तुझ्यास्तव मंदच जळतो !
अन्य घरांतिल विझले सारे
निजली चिंता मिटुनी दारें !
मिटले मीहि उभय नेत्र अन्–
तुझ्या समाधित विरलें 'मी' पण !
पण अधिरच हा अधर फुरफुरे
चळवळ मांजवी सव्य करांमें !

म्हणून म्हणतों 'ये ललिते गे !
सरस्वतीच्या शिष्ये सुभगे !'

ये उत्कट ओं छेड ! परंतू—
ताण किती हा ? तुटतिल तंतू
असंख्य रंजित रंजविण्यास–!—
(भ्रष्ट भ्रमिष्टां अपुली आस !)
—अवताराचें कार्य कराया—
मी 'नड ब्रह्मच' तूं बन 'माया' !
अशी दावुं चल जीवन जादू—
प्रियेस मिळतिल विरक्त साधू !

उत्कट भावे ललिके ये गे !
सखे प्रेरणे ! ये ये वेगे !

मुठींत बघ या अपत्यचिन्हें
तुझ्याहि भाळीं शंभर तान्हें !
क्षणांत फुलविल गे फुलराणी !
सत्शिव सुंदर, कळ्या सुमांनी !
मयुरासनि तव युवराजच हे !
ह्या नच कलिका ये प्रतिभे ये !
पुरे, ग, तव ती नवथर लाज !
ये मनमंजरी ! ये मुम्ताज !

—पुंडलीक

काव्यसम्राट

★

निळ्या नभाचा पडदा झरझर हलला—
अस्थिर वायूने एक जोराने मुसंडी मारली—
मेघांचा भयचकित गडगडाट झाला—
—आणि सोनेरी युवतीने सहज डोकावून बाहेर पाहिलें.

ती जिवंत जळती जागती ज्योत—
नव्हे, काव्यसम्राटाची मूर्तिमन्त प्रतिभाच !
वाऱ्याने मारलेली ती ऐरावताची मुसंडी—
नव्हे, त्याच्या हृदयांत माजलेल्या भावनांचा तो हलकल्लोळ !
भयचकित करून सोडणारा मेघांचा गडगडाट—
नव्हे, त्याच्या कल्पनेचा तो खळाळणारा महापूर !
आणि निमिषार्धांत असा खेळ खेळणारा निसर्ग—
म्हणजे काव्यसम्राटाची स्फूर्ति !

मुसळधार पाऊस म्हणजे त्याच्या शब्दांची झरणी,
अफाट वादळ म्हणजे त्याची बेफाट कल्पनाच !
आणि पुराने भरून दुथडी वाहणाऱ्या नद्या—
म्हणजे काव्यसम्राटाचा केवळ भावनाविलास !

सूं सूं करीत वाहणारा थंडगार वारा—
म्हणजे त्याच्या कवितेचा हृदयस्फूर्त भाव !
त्या वाऱ्याने हलणारे वल्लरींचे पल्लव—
म्हणजे त्याच्या कवितेच्या अनेकविध ओळी !
आकाशांत डवरलेला सप्तरंगी इंद्रधनुष्य—
म्हणजे त्याची नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा !
—आणि पाऊस पडल्यानंतर कालांतराने,
'सस्यश्यामला सुजला सुफला' झालेली पृथ्वी—
म्हणजे काव्यसम्राटाचें काव्य—
—त्याची कविता !

—अच्युत केशव पांडे

प्रथमदर्शनीं

★

तुझें प्रथमदर्शन
झालें पाषाणमूर्तीत ।
जड शरीर वस्त्राने
सुवर्णाने अलंकृत ॥१॥

आदिरूप सनातन
झालें सगुण साकार
परि दिसेना नयना
कोणताहि साक्षात्कार ॥२॥

नित्य पूजाअर्चा होते
धूपारती शेजारती ।
नाही समाधान मना
अभाविक माझी मती ॥३॥

येती नानालोक येथें
स्वार्थे बोलती नवस ।
लौकीकार्थ उभवती
कांचनाचेही कळस ॥४॥

देव–देव करताना
कीर्ती वाढते अपार ।
परि कळेना तयां तो
व्यापीतसे चराचर ॥५॥

वाटे असा कैसा देव
घडवीला शिल्पकारे ।
कधी पाहीला तयाने
आणि कोणत्या आधारे ॥६॥

दाही दिशा व्यापूनीया
नित्य राहसी तूं देवा ।
काय राउळीं असतो
महत्तत्त्वाचा या ठेवा ! ॥७॥

करूं लागलें चिंतन
निराकार निर्गुणाचें ।
मनीं पिसाट वादळ
नाना तर्क विचारांचें ॥८॥

कोणापुढे जोडूं हात !
ध्यान कोणत्या मूर्तीचें ! ।
गुंग होई माझी मति
रूप विशाल तत्त्वांचें ॥९॥

महत्तत्त्व आकळेना
बुद्धि होतसे पांगळी ।
मन परतूनी येतें
तुज भेटाया राउळीं ॥१०॥

लाभे शांतता मनाला
भाव स्थिर हो चरणीं ।
भक्ती जडली अंतरीं
आशा उदेली मन्मनीं ॥११॥

—सौ. सुशीला मराठे

वेडें मन

*

जळालें अंतर
लागली हुरहुर
दाटलें काहुर । मनांतरी ॥१॥

शल्य की बोचतें
हृदयांत टोचतें
बोल की बाण ते । संशयात ॥२॥

संगीत संपलें
गान का भंगलें
जीवनांत आलें । नैराश्य कां ? ॥३॥

भावनेचे भर
भरलें हें ऊर
वीणेची ही तार । तोडली कां ? ॥४॥

हास्य ओठांतुनि
तेज नेत्रांतुनी
प्रेम या जीवनीं । निमालें कां ? ॥५॥

तारका सुंदर
सुमनें मधुर
सुखवी अंतर । कां न आता ? ॥६॥

निराशेचा धूर
कोंदला समोर
जाहलें अधीर । वेडें मन ! ॥७॥

—उषा सदाफळ

अनुक्रमणिका

संघ वार्ता

रा. पु. सगदेव
चिटणीस, वि. सा. सं.
नागपूर, यांजकडून

विदर्भ साहित्य मंदिरासाठी जागा

मध्यप्रदेश सरकारने ता. २९ मार्च १९५१ रोजीं विदर्भ साहित्य संघाला विदर्भ साहित्य मंदिरासाठी जागा दिल्याचा हुकूम काढला. ही जागा उत्तर अंबाझरी आणि वर्धा या दोन मोठ्या रस्त्याच्या सांध्यावर नव्या सूतिकागृहासमोर आहे. जागेचें क्षेत्रफळ १.१२ एकर म्हणजे सुमारें ४८७९७ चौरस फूट आहे. जागेचें वार्षिक भाडें एक रुपया असून या जागेच्या विकासासाठी नागपूर इंप्रुव्ह-मेंट ट्रस्टला, ट्रस्टचें विकासाचें काम सुरू होईल तेव्हा दर एकरी ८५०० रुपये प्रमाणे विकास मूल्यें द्यावयाचें आहे. याशिवाय दुसरा कोणताहि बोजा या जागेवर नाही.

हा हुकूम हातीं आल्यानंतर ता. २ एप्रिल १९५१ रोजीं सकाळीं संघाध्यक्ष श्री. माडखोलकर यांच्या हस्ते या जागेवर पाया खोदणीचा मुहूर्त करण्यांत आला. ता. ३ एप्रिल रोजीं सकाळीं संघाचे कार्यवाह श्री. रा. पु. सगदेव आणि मंदिर समितीचे कार्यवाह श्री. प्र. श्री. पटवर्धन यांनी सरकारी नझूल खात्याच्या अधिकाऱ्याकडून जागा मोजून घेऊन तिचा रीतसर ताबा घेतला. ता. ७ एप्रिल रोजीं सकाळीं ९ वाजतां वर्ष प्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर संघाच्या नियोजित अध्यक्ष प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या हस्ते विदर्भ साहित्य संघ आणि विदर्भ साहित्य मंदिर यांच्या पाट्या लावून गुढी उभारण्यांत आली.

विदर्भ साहित्य मंदिरासाठी १ रुपयाचीं तिकीटं

वि. सा. मंदिरासाठी एक रुपयाचीं तिकीटें काढण्यांत आलीं असून त्याचा मुहूर्तहि ता. ७ रोजीं सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या हस्ते गुढी उभारण्याच्या वेळीच करण्यांत आला.

श्रीमंत बाबुरावजी देशमुख पेट्रन झाले.

ता. २६ मार्च १९५१ रोजीं श्रीमंत बाबुरावजी देशमुख हे विदर्भ साहित्य संघाचे पेट्रन झाले. संघाचे ते पहिले आणि एकटेच पेट्रन होत. त्यांचा आश्रय संघाला त्याच्या या प्रगतीच्या सुमुहूर्तावर लाभला हें खरोखरी वि. सा. संघाचें सुदैव होय.

प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांचा सत्कार

वि. सा. संघाचे पेट्रन श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांनी सोमवार ता. २६ मार्च १९५१ रोजीं वि. सा. संघाच्या नियोजित अध्यक्ष सौ. कुसुमावती देशपांडे यांना थाटाची मेजवानी देऊन त्यांचा सत्कार केला. याप्रसंगीं कार्यकारी मंडळाचे नागपुरांतील सर्व सदस्य, विदर्भ साहित्य मंदिराचे संयोजक आणि स्थपति व कांही प्रमुख नागरिक हजर होते. श्रीमंत बाबुरावजी यांनी सौ. कुसुमावतीबाई यांच्या संबंधी गौरवपर भाषण केलें व सौ. कुसुमावतीबाई यांनी त्यांचे योग्य शब्दांत आभार मानून, 'नागपुरांतील अग्रगण्य रसिक, दानशूर अशा श्रीमंत बाबुरावजींचा संघाच्या सर्व कार्यांना सतत पुरस्कार लाभावा' अशी इच्छा व्यक्त केली.

भंडारा येथील प्रमाणपत्र वितरण समारंभ

ता. १ एप्रिल १९५१ रोजीं भंडारा येथे वि. सा. संघाच्या परीक्षांना बसलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रें देण्याचा समारंभ सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. परीक्षा समितीचे संचालक प्रा. डॉ. वि. भि. कोलते हेहि या समारंभाला उपस्थित होते व त्यांनी संघाचे भंडारा येथील प्रमुख कार्यकर्ते श्री. ना. ल. पोतदार यांच्या कामगिरीबद्दल त्यांचा गौरव केला. सौ. कुसुमावतीबाई यांनी सुंदर भाषण करून वि. सा. संघाला मदत करण्याची विनंती भंडारा येथील जनतेला केली.

श्रीमंत बाबुरावजी देशमुख



नागपुरचे दानशूर रसिकाग्रणी श्रीमंत लक्ष्मण श्रीधर उर्फ बाबुरावजी देशमुख हे ता. २६ मार्च १९५१ रोजीं विदर्भ साहित्य संघाचे पेट्रन झाले. नागपूर नाट्य मंडळ आणि ललित कला मंडळ या नागपुरांतील दोन संस्थांचे श्रीमंत बाबुरावजी हे पेट्रन आहेत. यापैकी नागपूर नाट्य मंडळ ही विदर्भ साहित्य संघाची संलग्न संस्था असून वि. सा. संघाच्या मराठी रंगभूमीच्या विकाससंबंधीच्या प्रयत्नांत तिचाच कार्यभाग मुख्य राहील हें उघड आहे. श्रीमंत बाबुरावजी हे आता दोन्ही संस्थांचे पेट्रन झालेले असल्यामुळे वि. सा. संघ आणि नागपूर नाट्य मंडळ यांचें सहकार्य

सुकर होईल अशी आम्हाला आशा वाटते. श्रीमंत बाबुरावजी यांच्या औदार्याचा आणि रसिकतेचा वि. सा. संघाला उत्तरोत्तर अधिकाधिक लाभ होईल अशी आम्हाला खात्री आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या नियोजित अध्यक्ष

विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदावर चालू वर्षासाठी प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांची निवड झाली हें लिहिण्यास आनंद वाटतो. सौ. कुसुमावतीबाई या उत्कृष्ट ललित लेखक आणि मार्मिक टीकाकार म्हणून सर्व महाराष्ट्रांत मान्य असून महिला परिषद, भगिनी मंडळ, सूतिकागृह वगैरे संस्थांनाहि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा लाभ झालेला आहे. अर्थात् त्या जशा आदर्श साहित्यिक तशाच निरलस वृत्तीच्या समाजसेवकहि आहेत. त्यांच्या या दोन्ही क्षेत्रांतील कर्तृत्वाचा लाभ वि. सा. संघाला घडण्याचा योग या वर्षी आल्यामुळे वि. सा. मंदिराच्या रूपाने मराठी साहित्याच्या विकासाच्या ज्या नवीन योजना वि. सा. संघापुढे आहेत त्या यशस्वी व्हावयाला उत्तम मदत होईल



अशी खात्री वाटते. मध्यप्रदेशांत साहित्य आणि साहित्यशास्त्र यांच्या तुलनात्मक व्यासंगाचें केंद्र वि. सा. संघाने निर्माण करावें अशी त्याच्या आजच्या नेत्यांची आकांक्षा आहे. सौ. कुसुमावतीबाई या साहित्याचें शास्त्र आणि कला या दोहोंच्याहि अभिज्ञ असल्यामुळे ही आकांक्षा सफल करावयाला त्यांचें नेतृत्व उपयुक्त ठरणार आहे.

कार्यकारी मंडळाचे निर्णय

विदर्भ साहित्यसंघाच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १५-४-१९५१ रोजीं संघाध्यक्ष श्री. माडखोलकर यांच्या घरीं भरली होती. या सभेला संघाच्या नियोजित अध्यक्ष सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, श्री. ना. ग. डबीर आणि प्रा. भी. गो. देशपांडे हे निमंत्रणाने हजर होते. सभेंत पुढील कामकाज झालें :—

(१) विदर्भ साहित्यसंघाचे पेट्रन झाल्याबद्दल श्रीमंत बाबुरावजी देशमुख यांचे हार्दिक आभार.

(२) श्री. ग. शि. उर्फ नानासाहेब जोग यांची मंदिर-समितीवर स्वीकृत सभासद म्हणून योजना.

(३) प्रा. अ. ना. देशपांडे यांच्या 'नवशक्ति' दैनिकांत आलेल्या लेखासंबंधी वि. सा. संघाचे एक सदस्य श्री. शंकरराव कुळकर्णी यांच्याकडून अध्यक्षांना आलेलें पत्र आणि अध्यक्षांनी त्यांना घातलेलें उत्तर वाचण्यांत येऊन उत्तर मंजूर करण्यांत आलें.

(४) महाराष्ट्र साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या ठरावानुसार ता. १७ मार्च १९५१ रोजीं मुंबई येथे प्रादेशिक संमेलन संस्थांच्या प्रतिनिधींची जी सभा भरली होती, तिच्यासंबंधींची प्रा. डॉ. वि. भि. कोलते आणि प्रा. वा. दा. गोखले यांचीं इतिवृत्तें वाचण्यांत आलीं; व त्यांतील निर्णयांना मान्यता देण्यांत आली.

(५) बोधचिन्ह समितीने तयार केलेल्या बोधचिन्हाला मान्यता.

(६) 'युगवाणी' पुनर्घटना समितीचें प्रतिवृत्त अपुरें असल्याचें आढळून आल्यामुळे तें समितीकडे परत करण्यांत यावें असें ठरलें. ता. ११-३-५१ च्या ६ व्या ठरावाकडे समितीचें लक्ष वेधण्यांत आलें; व तदनुसार समितीने आपलें संपूर्ण प्रतिवृत्त ता. २२-४-५१ चे आंत कार्यकारी मंडळाला सादर करावें, अशी सूचना देण्यांत आली.

(७) मध्यप्रदेशांतील शिक्षणसंस्था, साहित्यसंस्था, वाचनालयें, नाट्यसंस्था इ. वाङ्मयविषयक कार्य करणाऱ्या संस्थांशी वि. सा. संघाचा सहयोग घडवून आणण्यासाठी कार्यकारी मंडळाने एक - कायमची समिति नियुक्त करावी. या समितीला आपलें कार्य चालविण्यासाठी वर निर्दिष्ट केलेल्या सर्व संस्थांना कशा प्रकारें प्रतिनिधित्व द्यावें व तें सुकर करण्यासाठी सदर्हू संस्थांतर्फे किती व कोणते सभासद स्वीकृत करावे, यासंबंधीचे अधिकार देण्यांत यावे.

(८) ता. १७-१२-१९५० रोजी घटनासमितीने सुचविलेल्या दुरुस्त्यांना, द्रव्यनिधि व मालमत्ता या सदरांखालील सूचना खेरीजकरून, मान्यता देण्यांत आली. नियम २८ हा त्यांत सुचविण्यांत आलेल्या 'उमेदवाराचीच लेखी अनुमती असावी' या बदलासह मंजूर.

साधारण सभेची सूचना

वि. सा. संघाची साधारण सभा ता. २८ एप्रिल १९५१ रोजीं दुपारीं १ वाजतां अकोला येथे प्रतिनिधींच्या निवासस्थानीं भरेल. सभेंत प्रामुख्याने वि. सा. संघाच्या घटना दुरुस्तीसंबंधी आणि अध्यक्षांच्या परवानगीने इतर प्रश्नांचाही विचार होईल, तरी सर्व सभासदांनी अवश्य उपस्थित रहावें ही विनंती.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्यमंदिराच्या कोनशिलेच्या स्थापनेचा समारंभ

पं. मिश्र, श्री. माडखोलकर आणि श्री. पु. य. देशपांडे यांचीं भाषणें

[मराठ्यांच्या घोड्याची टाप एका काळीं सिंधु नदीपर्यंत ऐकूं येत होती. संपूर्ण भारतवर्ष हा आमचा आहे, अशा भावनेने एका काळीं मराठे राजकारणाचा विचार करीत असत. त्याच महाराष्ट्रीयांनी आता एका विशिष्ट भू-प्रदेशाचा अभिमान धरावा आणि संकुचित दृष्टीने राजकारणाकडे पहावें, ह्याचें मला नवल वाटतें ! संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला मी स्वतः आणि मध्यप्रदेश मंत्रिमंडळाने सदैव पाठिंबा दिलेला आहे. महाकोशलमधील सारे राजकीय कार्यकर्ते संयुक्त महाराष्ट्र व्हावा, अशाच मताचे आहेत. पण संयुक्त महाराष्ट्र होणें हें माझ्या किंवा आपल्या हातचें नाही. म्हणून, संयुक्त महाराष्ट्र होईपर्यंत ह्या मध्यप्रदेशांतच हिंदी आणि मराठी लोकांना सौहार्दाने रहावयाचें आहे, ही भावना डोळ्यांपुढे ठेऊनच आपण कार्य केलें पाहिजे. हिंदी आणि मराठी ह्या दोनहि भाषांना समानतेने वागविण्याचें मध्यप्रदेश सरकारचें धोरण आहे व ह्या धोरणांत रेसभरहि अंतर पडणार नाही, अशी ग्वाही मी आज आपल्याला देऊं इच्छितों. हिंदीच्या अभिमानाने मराठीला ह्या राज्यांत कोणताहि प्रकारचा अन्याय केला जाणार नाही; व हिंदी ही राष्ट्रभाषा असली, तरी ह्या राज्यांत प्रादेशिक भाषा या दृष्टीने हिंदी आणि मराठी ह्यांचा दर्जा सारखाच राहील. आपण ह्या राज्याला ' दुभाषी म्हणतां पण, माझी इच्छा हें राज्य आपण 'सुभाषी' करून दाखवावें अशी आहे !"—असे उद्‌गार ता. १५-४-५१ रोजीं सकाळीं मध्यप्रदेशाचे गृहमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांनी विदर्भ साहित्यमंदिराच्या कोनशिला-समारंभाच्या वेळीं काढले.]

' भारतीय ' म्हणूनच जगापुढे उभें राहिलें पाहिजे

ना. पं. मिश्र आणखी असें म्हणाले की, "शिलान्यासाचा जो धार्मिक विधी आता झाला, तो ऐकत असतांना माझ्या निदर्शनाला एकच गोष्ट आली. ती ही की, सांस्कृतिक दृष्ट्या सारा भारत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत एकात्म आहे. कारण, जे मंत्र आज आता येथे म्हटले गेले, तेच मंत्र मी इतरत्रहि म्हणतांना ऐकले आहेत. ही जी भारताची मूलभूत एकात्मता आहे, तिचा विकास आणि परिपोष करणें हें आज आपलें पहिलें कर्तव्य आहे. कारण, सारें जग आज आपल्याला केवळ भारतीय म्हणूनच ओळखतें—जगापुढे 'भारतीय' या एकाच नात्याने आपण उभें राहूं शकतों—उभे राहिलें पाहिजे. प्रो. खानखोजे ह्यांनी मला

 सांगितलें की, "मेक्सिकोंत मला कोणी महाराष्ट्रीय म्हणत नाही. भारतीय

म्हणूनच मला सर्व लोक ओळखीत." ही भारतीयत्वाची भावना सर्व देशांत दृढमूल होण्यांतच भारताचें दार्ढ्य आणि सामर्थ्य आहे! अर्थात्, ह्या भारतांत ज्या अनेक भाषा आणि जे अनेक समाज आहेत, त्यांच्या वैशिष्टयाला ह्या एकतेमुळे बाध येण्याचें कारण नाही. उलट तें वैशिष्ट्य ह्या एकतेला उपकारक होईल, अशा पद्धतीनेच भारताचें एकराष्ट्रीयत्व आणि त्यांतील घटकांचें वैशिष्ट्य यांच्या समन्वयाची समस्या आपण सोडविली पाहिजे."

समारंभाची सुव्यवस्थित आयोजना

ता. १५-४-५१ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां उत्तर अंबाझरी--वर्धा रस्त्याच्या जुळणीवरील विदर्भ साहित्यसंघाच्या प्रशस्त जागेत, मुद्दाम उभारलेल्या विस्तीर्ण शामियान्यांत विदर्भ साहित्यमंदिराची कोनशिला स्थापन करण्याचा समारंभ मोठ्या थाटाने साजरा करण्यांत आला. या समारंभाची आयोजना संघाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. आ. रा. देशपांडे (कवि 'अनिल') आणि श्री. नानासाहेब जोग यांनी इतक्या कुशलतेने केली होती की, सकाळीं ८॥ पासून तों १०—२५ पर्यंत चाललेला हा समारंभ अत्यंत व्यवस्थित रीतीने पार पडल्याबद्दल अनेकांनी कौतुकाचे उद्गार काढले. व्यासपीठावर ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या उजव्या हाताला श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, अन्नमंत्री ना. गोपाळराव काळे आणि राजस्वमंत्री ना. पु. का. देशमुख हे बसलेले होते आणि डाव्या हाताला सौ. कुसुमावती देशपांडे, स्वास्थ्यमंत्री डॉ. बालिंगे आणि लोककर्ममंत्री ना. रामेश्वर अग्निभोज हे बसलेले होते. ह्याशिवाय संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे, कोषाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे, मंदिर—समितीचे अध्यक्ष न्या. मू. के. दु. मंगळमूर्ति, परीक्षासमितीचे प्रमुख डॉ. वि. भि. कोलते, हिंदी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष डॉ. बलदेवप्रसाद मिश्र, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. शकुंतला दिवाणजी, श्री. रा. पु. सगदेव, श्री. प्र. ना. खोंडे, डॉ. हिरालाल जैन, प्रो. वा. कृ. चोरघडे प्रभृति संघाचे कार्यकर्ते आणि निमंत्रित पाहुणे बसलेले होते. कोनशिलेपाशी ठेवावयाचा ताम्रपट व्यासपीठावरील छोट्या स्टुलावर सर्वांना दिसेल अशा रीतीने मांडलेला होता; व मंडपाच्या प्रवेशद्वारापाशी मध्यप्रदेश सरकारचे वास्तुविद् श्री. भाईसाहेब करंजगांवकर यांनी काढलेलें विदर्भ साहित्यमंदिराचें भव्य चित्र आणि इतर कांही नकाशे हे फळकावर लावून ठेवलेले होते. समारंभाची व्यवस्था विदर्भ साहित्यसंघाचे 'स्थपति' श्री. गोपाळराव करंदीकर आणि कार्यवाह श्री. रा पु. सगदेव यांनी उत्कृष्ट ठेवली होती.

माननीयांची उपस्थिति

समारंभाला विदर्भ साहित्यसंघाचे 'पेट्रन' श्रीमंत बाबुरावजी देशमुख आदि नागरिक, वि. सा. संघाचे सभासद व कार्यकर्ते हजर होते. याशिवाय भंडारा, वर्धा, बुलढाणा, अमरावती, अकोला, चांदा, गोंदिया वगैरे ठिकाणचेहि वि. सा. संघाचे कार्यकर्ते हजर होते.

अनुक्रमणिका

ना. पं. मिश्र यांचें आगमन होतांच ८॥ वाजतां श्री. अण्णेगिरी भगिनींच्या महाराष्ट्र-गीताने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. नंतर संघाध्यक्ष श्री. माडखोलकर यांचें भाषण झालें.

श्री. माडखोलकर यांचें भाषण

श्री. माडखोलकर म्हणाले, "आज रामनवमीच्या मुहूर्तावर विदर्भ साहित्यमंदिराच्या कोनशिलेची स्थापना होत आहे. आजच्या शुभकार्याला इतका योग्य मुहूर्त दुसरा सांपडला नसता, असें मला वाटतें. कारण प्रभु रामचंद्र हा महाराष्ट्राचा जनक आहे. नर्मदेपर्यंत पसरलेल्या दंडकारण्यांतून, राक्षसांचा संहार करून, त्याने महाराष्ट्राची स्थापना केली. नागपूरच्या परिसरांत असलेलें रामटेक हें क्षेत्र प्रभु रामचंद्राच्या वनवासांतील वास्तव्याची साक्ष आजहि देत आहे. गेलीं हजार वर्षे नागपूर शहर हें महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवरील सत्तेचें केंद्र समजलें जात आहे. सीताबर्डीला सांपडलेला हजार वर्षांपूर्वीचा जो एक स्तंभलेख नागपूरच्या अजबखान्यांत आहे, त्यांत असा निर्देश असल्याचें आढळतें की, महाराष्ट्राचा सम्राट् चालुक्य विक्रमादित्य याचा जो महासामंत त्या वेळीं येथें राज्य करीत असे, तो स्वत:ला 'महाराष्ट्रकूट' म्हणवून घेत असे. अशा या महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवरील पुरातन पवित्र राजधानींत आज विदर्भ साहित्य-मंदिराची कोनशिला स्थापन केली जात आहे, ही घटना अतिशय अर्थपूर्ण आहे.

हिंदी-मराठीचें सारखें प्रमाण

या कोनशिलेची स्थापना आपले शिक्षणमंत्री पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्या हस्तें होण्यांतहि औचित्य आहे. ते स्वतः प्रतिभाशाली साहित्यिक आणि पत्रकार असून 'कृष्णायना' चे निर्माते कवि या नात्याने भारतीय साहित्यांत विशेष प्रकारचें स्थान त्यांनी संपादन केलेलें आहे. मराठी भाषा आणि वाङ्मय यांच्यासंबंधी त्यांची वृत्ति सौहार्दाची आहे. आपलें हें मध्यप्रदेश राज्य द्विभाषी आहे; व या राज्यांतील हिंदी विभागापेक्षा मराठी विभाग हा संख्यादृष्ट्या अल्पबल आहे. तथापि, या राज्यांतील हर एक व्यवहारांत हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांचें स्थान सारखें असावें—त्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे 'फिफ्टी फिफ्टी असावें—असा त्यांचा आग्रह आहे. संयुक्त महाराष्ट्राच्याहि चळवळीला त्यांनी हार्दिक पाठिंबा दिलेला आहे. विदर्भ साहित्यसंघाचेहि ते पुरस्कर्ते आहेत. मुख्यतः त्यांच्याच सहृदयतेमुळे विदर्भ साहित्यसंघाला जागा आणि सरकारी देणगीहि मिळाली असून, विदर्भ साहित्यमंदिरालाहि सरकारी देणगी मिळवून देण्याच्या बाबतींत त्यांचें सहाय्य होईल, अशी मला खात्री आहे. या सर्व दृष्टींनी त्यांच्या हातून हा समारंभ होण्यांत अतिशय औचित्य आहे.

प्रतीक आणि प्रारंभ

विदर्भ साहित्यमंदिर ही केवळ इमारत नाही; तर पूर्व महाराष्ट्राच्या या राजधानींत महाराष्ट्र संस्कृति आणि साहित्य यांचें जें प्रबळ केंद्र आम्हाला

निर्माण करावयाचें आहे, त्याचें हें मंदिर प्रतीक आणि प्रारंभ आहे. या महान् कार्यांत आपलें सर्वांचें सहकार्य विदर्भ साहित्यसंघाला लाभावें, एवढीच माझी प्रार्थना आहे."

यशचिंतनपर संदेश

त्यानंतर श्री. रा. पु. सगदेव यांनी संघाचें प्रतिवृत्त वाचून दाखविलें; व श्री. प्र. ना. खोडे यांनी समारंभाला आलेले संदेश वाचले त्यांत ना. काकासाहेब गाडगीळ, लोकनायक बापुजी अणे, ना. रंगराव दिवाकर, ना. दादासाहेब मावळणकर, बॅ. रामराव देशमुख, श्री. रा. कृ. पाटील, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजकवि यशवंत, महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. अ. का. प्रियोळकर, पं. दिनकरशास्त्री कानडे, श्री. ल. ब. भोपटकर, श्री. दा. वि. गोखले, प्रा. चिं. वि. जोशी, प्रा. श्री. म. माटे, श्री. अनंत हरि गद्रे, श्री. दे. ना. टिळक, डॉ. के. ना. वाटवे, डॉ. कोलाडकर, प्रो. अडोणी, श्री. बालजी पेंडसे, 'महाराष्ट्र साहित्यपत्रिके' चे संपादक प्रा. वाळिंबे, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मंत्री, श्री. ग. वि. केतकर आणि कार्याध्यक्ष श्री. पु. शं. पत्की, लोकहितवादी मंडळाचे श्री. मधुसूदन दळवी, कवि माधव, गॉवडन साहित्यसंस्थेचे श्री. तु. ना. काटकर, 'भारता' चे संपादक श्री. भा. गो. बापट, 'अभिरुची' चे संपादक श्री. चित्रे, संगीतकलानिधि श्री. कृष्णराव फुलंब्रीकर प्रभृतींचे संदेश उल्लेखनीय आहेत.

श्री. पु. य. देशपांडे यांचें भाषण

नंतर ना. पं. मिश्र यांना शिलान्यास करण्याची विनंति करतांना संघाचे उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे म्हणाले, "भाषावार प्रांतरचना होईपर्यंत हिंदी आणि मराठी या दोन भाषांचा संघर्ष या प्रांतांत चालू राहणार, असा अनेक लोकांचा समज आहे. पण, ना. पं. मिश्र यांच्यासंबंधी मला एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते. ती ही की, मध्यप्रदेश हा जोपर्यंत दुभाषी आहे, तोंपर्यंत हिंदी आणि मराठी या दोन भाषांना समान दर्जाच लाभला पाहिजे व तसा समान दर्जा लाभल्यानेच या दोन भाषांची उन्नति होईल, अशी ना. पं. मिश्र यांची भूमिका आहे. ह्या प्रांतांतील विधानसभेने जो राजभाषा अधिनियम मंजूर केला आहे, त्याबद्दल बरीच टीका विशेषतः पुण्या-मुंबईकडील वृत्तपत्रांतून आली असल्याचें मला माहित आहे. पण ह्या अधिनियमांत हिंदी आणि मराठी या दोनहि भाषा राजभाषा म्हणून मान्य असल्याचें स्पष्ट नमूद केलें आहे. जो काय फरक पडतो, तो फक्त सरकारी फायली कोणत्या भाषेत ठेवण्यांत याव्या व कायद्याचा अर्थ लावतांना कोणती भाषा प्रमाण मानावी, याबद्दलच होय. या दोन बाबतींत हिंदीला जें स्थान दिलेलें आहे, तें केवळ व्यवहाराच्या सोयीच्या व आंतरप्रांतीय कारभाराच्या दृष्टीने दिलेलें आहे; व हिंदी ही अखिल भारताची राज्यभाषा असल्यामुळे, तें देणें योग्यहि आहे, ही गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे.

राजकारण उन्नत कसें होईल !

ना. पं. मिश्र यांच्या हस्ते आज हा शिलान्यास होण्यांत सर्वच दृष्टींनी औचित्य आहे; व साहित्यकार या नात्यानेहि त्यांची योग्यता फार मोठी आहे. आपलें राष्ट्रीय जीवन हें जर उन्नत आणि उदार व्हावयाला हवें असेल, तर संस्कृति आणि साहित्य यांच्याविषयींची अभिरुचि हा आपल्या जीवनाचा धर्म झाला पाहिजे. आज आपल्या देशांतील राजकारण कोणत्या हीन थराला जाऊन पोंचलें आहे, हें आपण पहातच आहोंत. राजकारणाची ही अधोगति पाहून, मी आता अशा श्रद्धेला येऊन पोंचलों आहें की, राजकारणाला सांस्कृतिक अधिष्ठान मिळाल्याशिवाय, त्याला कधींहि उन्नत आणि विशाल स्वरूप प्राप्त होणार नाही ! ना. पं. मिश्र हे राजकारणाकडेहि सांस्कृतिक दृष्टीने पाहतात, हें त्यांचें वैशिष्ट्य आपण सर्वांनी लक्षांत घेण्यासारखें आहे. मराठी भाषा आणि साहित्य ह्या दोहोंविषयी त्यांना विशेष प्रेम आहे; व विदर्भ साहित्य संघाला जागा मिळण्याच्या कामीं त्यांचेंच सहाय्य मुख्यतः कारण झालेलें आहे. मला आशा आहे की, विदर्भ साहित्यमंदिराच्या पूर्ततेच्या कामीं त्यांचें आणि मध्यप्रदेश सरकारचें साहाय्य आपल्याला मिळेल !"

ताम्रपट–वाचन

न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांनी ह्या विनंतीला दुजोरा दिल्यावर श्री. आ. रा. देशपांडे यांनी कोनशिलेसोबत ठेवावयाचा ताम्रपट संपूर्ण वाचून दाखविला. नंतर श्री. माडखोलकर यांनी ना. पं. मिश्र यांना कोनशिला बसविण्याच्या जागीं नेलें.

शिलान्यासाचा धार्मिक विधि

कोनशिलेचा हा समारंभ, श्री. आ. रा. देशपांडे यांनी आंखलेल्या धार्मिक योजनेनुसार, विधिपूर्वक करण्यांत आला. त्यासाठी नर्मदा, वैनगंगा, वर्धा, पूर्णा, पैनगंगा आणि गोदावरी इ. महाविदर्भांतलि सात नद्यांचें पुण्य–जल, सध्या भारतांत प्रचारांत असलेलीं नाणीं व विदर्भसाहित्य संघाच्या बोधचिन्हाचा ठसा एवढें साहित्य कोनाशिलेपाशी ठेवलेलें होतें. ताम्रपटावर संयुक्त महाराष्ट्राचें संपूर्ण मानचित्र, विदर्भ आणि मराठी भाषा यांच्या प्रशस्तींच्या निरनिराळ्या वचनांसह, कोरलेलें होतें ही गोष्ट, विदर्भ साहित्यसंघाच्या महाराष्ट्र एकीकरणासंबंधीच्या उत्सुकतेची निदर्शक म्हणून, डोळ्यांत भरण्यासारखी होती. श्री. दामलेगुरुजी यांनी संकल्प सांगितला; व श्री. आ. रा. देशपांडे, श्री. सगदेव आणि श्री. न. बा. उपासनी यांनी पंडितजींना धर्मविधींत मदत केली. विदर्भ साहित्यसंघाचे मुख्य स्थपति श्री. येरगांवकर यांच्या सहाय्याने चांदीच्या थापीने सीमेंट लावून ना. पं. मिश्र यांनी ज्या वेळीं क्रेनवर अडकविलेली कोनशिला बसविली, त्या वेळीं टाळ्यांचा कडकडाट झाला; व फोटोग्राफरांच्या हातांतील कॅमेरे एकदम टिकटिकले ! समारंभ पूर्ण झाल्यावर

ना. पं. मिश्र पुन्हा व्यासपीठावर आले; व श्री. सगदेव यांनी विदर्भ साहित्यसंघातर्फे त्यांना हार घातल्यावर त्यांनी भाषणाला प्रारंभ केला.

ना. पं. मिश्र यांचें भाषण

ना. पं. मिश्र आपल्या भाषणांत म्हणाले, "आजचा हा धर्मविधि म्हणजे भारताच्या सांस्कृतिक एकतेचें मूर्तिमंत प्रत्यंतर होय ! आपल्या ह्या प्राचीन देशांत साम्राज्यवाद ही वस्तु कधी अस्तित्वांतच नव्हती; तर ह्याच्या उलट देशांतील भिन्न भिन्न समाज आणि भिन्न भिन्न भाषा यांना चक्रवर्तित्वाच्या एका छत्राखालीं आणावयाचें आणि परस्परांच्या सहकार्याने सर्व देशाचा उत्कर्ष घडवून आणावयाचा, असेंच आपल्या चक्रवर्तित्वाच्या कल्पनेचें उदार समावेशक स्वरूप होतें. देशांतील सर्व प्रकारचे भेद जबरदस्तीने नष्ट करून सर्व देश एका साम्राज्यसत्तेच्या धुरेखालीं आणावयाचा ही मंदांध कल्पनाहि केव्हा केव्हा डोकें वर काढीत असे. माझ्या 'कृष्णायन' ह्या काव्यांत मी ह्या बाबतींत जरासंधाच्या साम्राज्याचें उदाहरण दिलें आहे. जरासंधाने साऱ्या भारतवर्षांतील हजारो राजे जिंकून आपल्या बंदिगृहांत आणून ठेवले; व स्वतःची साम्राज्यलालसा तृप्त करण्यासाठी तो त्यांना बळी देणार होता. याच्या उलट युधिष्ठिराने भारतवर्षांतील साऱ्या राजांना आपल्या प्रभुत्वाखालीं आणून आणि त्यांचा स्नेहभाव जोडून अखिल भारताचा चक्रवर्ति म्हणून अश्वमेध केला. मदांध साम्राज्यवाद आणि उदार चक्रवर्तित्व यांच्यांतील हा भेद आपण लक्षांत घेतला पाहिजे. देशांतील सारे स्वाभाविक भेद नष्ट करूं पाहणें ही मदांध प्रवृत्ति जितकी अनिष्ट, तितकेंच देशाच्या राष्ट्रीयत्वाला विघातक होईल अशा रीतीने त्या भेदांचें स्तोम माजविणें हेंहि अनिष्ट होय !

मराठीला गौण मानण्याचा हेतु नाही

राजभाषा अधिनियमासंबंधी जी टीका मराठी वृत्तपत्रांतून आली, ती पाहून मला एवढेंच वाटलें की, या प्रश्नाचें व्यावहारिक स्वरूप लक्षांत न घेतां निष्कारण भेदभावनेचा प्रचार ह्या वृत्तपत्रांनी केला. आज भारतीय राज्यघटनेच्या बाबतींतसुद्धा कायदेकानू किंवा विधेयकें यांचा अर्थ लावण्याच्या बाबतींत घटनेचा इंग्रजी मसुदा हाच प्रमाण मानण्यांत आलेला आहे. राजभाषा अधिनियमांत ह्या दोन बाबतींत हिंदी मसुदा हा प्रमाण मानला जाईल, असें ठरविण्यांत केवळ सोय पाहिलेली आहे; —मराठीला गौण स्थान देण्याचा यत्किंचितहि उद्देश नाही. हा अधिनियम विधानसभेपुढे आणण्यापूर्वी संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते माझे मित्र श्री. माडखोलकर यांच्याशी मीं ह्या बाबतींत चर्चा केली होती. त्यांनी त्यावेळीं मला असें स्पष्ट सांगितलें की, "राजभाषेच्या जागीं इंग्रजीच्या ऐवजी हिंदी भाषा येऊं नये असें म्हणण्याइतके कांही आम्ही महाराष्ट्रीय असमंजस नाही. महाराष्ट्रीयांनी हिंदी ही राजभाषा म्हणून प्रथमपासूनच मान्य केलेली आहे; व म्हणून मध्यप्रदेशांत हिंदी आणि मराठी या राजभाषा व्हाव्यात ह्या कल्पनेला आम्ही पाठिंबाच देऊं." विधानसभेंत ह्या अधिनियमावर बोलतांना मी जो खुलासा केला,

अनुक्रमणिका

१९५१
एप्रिल

त्यामुळे माझे मित्र श्री. रुईकर यांनीहि आपलें समाधान झाल्याचें स्पष्ट सांगितलें. मी आपणाला एक गोष्ट मुद्दाम सांगूं इच्छितों—मजजवळ आंत एक आणि बाहेर एक अशी छलछिद्र नीति नाही. राष्ट्रभाषा हिंदी ही प्रादेशिक भाषांच्या विकासाने आणि सहकार्याने समृद्ध होईल, अशीच माझी भावना आहे; व ह्या भावनेनुसार माझे आणि आमच्या मंत्रिमंडळाचें धोरण राहील.

या त्रिवेणीसंगमाचें सार्थक करा

म्हणून, मध्यप्रदेशांतील मराठी जनतेच्या तरुण पिढींत आपण हिंदी मराठीच्या वादाचें विष फैलावूं देऊं नका, अशी माझी आपल्याला विनंति आहे. महाकोशलमधील जनतेपेक्षा मध्यप्रदेशांतील मराठी जनता ही शिक्षणप्रसारांत अधिक पुढे गेलेली असून, मध्यप्रदेशांत शेंकडो महाराष्ट्रीय आणि मराठी संस्था शिक्षणप्रसाराचें कार्य करीत आहेत. महाराष्ट्रीय तरुणांना माझी अशी विनंति आहे की, ह्या मध्यप्रदेशाच्या अफाट जंगली विभागांत, जेथे अद्याप शिक्षण आणि संस्कृति यांचा संपर्कसुद्धा पोंचलेला नाही, तेथे जाऊन त्यांनी शिक्षणप्रसाराचें पवित्र कार्य करावें. त्यांच्या बुद्धिमत्तेला, कर्तृत्वाला आणि सेवाभावनेला हें नवीन क्षेत्र भरपूर वाव देईल. ह्या मध्यप्रदेशांत केवळ हिंदी आणि मराठी या दोन भाषाच एकत्र आलेल्या आहेत, असें नाही, तर कोरकू आदिवासींची जी 'मुंडा' भाषा, कांही पंडितांच्या मतें दाक्षिणात्य द्रविड भाषांची मूळ समजली जाते, तीहि या राज्यांत बोलली जाते. त्या दृष्टीने हिंदी, मराठी आणि द्रविड अशा तीनहि भाषांचा त्रिवेणी—संगम येथें झाला आहे. आपलें विदर्भ साहित्य-मंदिर हें ह्या सर्व भाषांच्या व्यासंगाला चालना देऊन भारतीय संस्कृतीचा विशाल आदर्श निर्माण करो, अशी माझी परमेश्वराला प्रार्थना आहे!''

यानंतर सौ. कुसुमावती देशपांडे यांनी ना. पं. मिश्र व मंत्रिमंडळ याचे त्यांनी केलेल्या सहाय्याबद्दल आभार मानले व त्यांच्या या ऋणाचा भार असाच वाढत जावो, अशी इच्छा व्यक्त केली. त्यांनी सर्व उपस्थित पाहुण्यांचेहि आभार मानले. संयुक्त महाराष्ट्र उद्यां होवो किंवा परवा होवो, मराठीच्या उज्ज्वल भवितव्याविषयी आपणा सर्वांना विश्वास आहे; पं. मिश्र यानी म्हटल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीयतेसाठी प्रथम चैतन्यपूर्ण राष्ट्र निर्माण झालें पाहिजे; असें राष्ट्र व्यक्तींच्या विकासावर अवलंबून असतें व व्यक्तिविकासाचें एक प्रमुख साधन म्हणजे मातृभाषा होय, असें प्रतिपादन करून, मातृभाषेविषयींच्या आपल्या निष्ठेचें पाठबळ विदर्भ साहित्य मंदिराच्या कोनशिलेला लाभूं द्यावें, अशी त्यांनी श्रोत्यांना विनंति केली.

श्री. शकुंतला दिवाणजी यांनी समारंभाला सहाय्य करणाऱ्या व्यक्ति व संस्था यांचे आभार मानले. शेवटीं अण्णोगिरी भगिनींनी 'वंदेमातम्' म्हटल्या-
१७३ नंतर हा समारंभ आटोपला.

हितचिंतकांचे संदेश

(१)

हिंदु विश्वविद्यालय, काशी ५,
दि. १२-४-५१ इ.

श्री. भाऊसाहेब माडखोलकर, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, यांसी

कृ. सा. न. वि. वि.

विदर्भ-साहित्य मंदिराच्या कोनशिला-स्थापनेच्या समारंभाचें आपल्याकडून आलेलें अगत्याचें निमंत्रण मला काल सायंकाळीं पावलें. आपण मला इतक्या आस्थापूर्वक बोलाविलेंत हें आपल्या मजविषयींच्या स्नेहभावाला उचितच आहे. असा भाग्याचा दिवस उगवलेला पाहून मला अतिशय आनंद व्हावा हें स्वाभाविक आहे; व माझें मन अनेक जुन्या आठवणींनी व नानाप्रकारच्या भावनांनी ह्या वेळीं जसें उचंबळून आलें आहे तसें तें उचंबळून यावें, ह्यांतहि नवल कांही नाही. ह्यावेळीं संघाच्या जन्मापूर्वीचे दिवस, व त्याचा बाल्यकाल, हे माझ्या डोळ्यापुढे संबंध दिसत आहेत. विदर्भ साहित्य संघावर माझें निरतिशय प्रेम आहे, हें सांगणें नकोच; व येतां आलें असतें तर मी खास आल्यावांचून राहिलों नसतों. पण ताबडतोब ह्याप्रमाणे ह्यावेळीं मला निघून येतां येत नाही, ह्याबद्दल मला क्षमाहि करावी. पण ह्याप्रमाणे प्रत्यक्ष शरीराने मला त्या समारंभाला येतां येत नसलें, तरी अन्तःकरणपूर्वक पाठविलेल्या ह्या माझ्या शुभेच्छांच्या रूपाने मी तेथे आहेच, ही खातरी असू द्यावी. मी ह्या मंगलप्रसंगी संघाला पूर्ण यश व उत्तरोत्तर नित्य भरभराट चिंतोतों, व ज्या हेतूने तो स्थापन केला गेला त्या हेतुप्रमाणे त्याचे हातून विदर्भ साहित्याची सर्वांगीण सेवा उत्तमपणे पार पडो, असें परमेश्वरास प्रार्थितों.

तेथील सर्व सहकार्यकर्त्यांस माझा नमस्कार अवश्य सांगावा. कळावें ही विनंती.

आपला,
बळवंत गणेश खापर्डे
ता. १३-४-५१

१९५१
एप्रिल

(२)

Minister, for works, Mines, Power
नवी दिल्ली
ता. ११ अप्रील १९५१

धि. वि.

आपलें आमंत्रण ता. १५ च्या समारंभाचे पोहचलें. समारंभास मी सुयश चिंतितों. विदर्भ साहित्य संघ भविष्यकाळांत महाराष्ट्र भाषेच्या उन्नतीच्या दृष्टीने व महाराष्ट्र सारस्वत अधिक समृद्ध करण्याच्या दृष्टीने अधिकाधिक कामगिरी करील अशी आशा करतों. हा समारंभ पंडित मिश्र यांच्या हस्ते साजरा होत आहे यात विशेष औचित्य आहे. राजभाषा हिंदी ही आता सर्वांचीच झाली आहे, आणि त्या दृष्टीने विचार करतां मराठी व हिंदी यांना अधिक जवळ आलें पाहिजे. भाषाभेद असला तरी अर्थ एकच असतो, व दोन पात्रांत ठेवलेलें अन्न यांत रुचिभेद असत नाही. पंडित मिश्र हें एक साहित्यिक आहेत आणि त्यांच्या हस्ते हा समारंभ होत आहे हें पाहून मला फारच आनंद होत आहे. प्रसंग व पुरुष यांचा हा सुंदर संगम कुणालाहि आनंददायक वाटल्याशिवाय राहणार नाही.

आपला स्नेहांकित
न. वि. गाडगीळ.

(३)

नवी दिल्ली
१३-४-५१

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांस स. न. वि. वि.

आपल्या जा. नं. ७८१ ता. ९-४ च्या पत्राबद्दल आभारी आहें. माझ्या आयुष्याचा पुष्कळसा अंश मध्यप्रदेशांत, विशेषतः नागपूरला फार सुखासमाधानांत गेला. यामुळे नागपूरविषयी मला विशेष आपलेपणा वाटतो. विदर्भात तर माझ्या नोकरीला सुरुवात झाली, व विदर्भातील किंवा वैदर्भीय लेखकांनी केलेल्या साहित्यसेवेची मला थोडीशी जाणीव आहे. म्हणूनच प्रत्यक्ष संबंध नसतांहि विदर्भ साहित्य संघाविषयी आपण दिलेली माहिती वाचून मला सकौतुक आनंद वाटला. शिलान्यास समारंभाचे प्रसंगीं, संघाचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो आणि त्याजकडून स्थायी व भरीव साहित्यसेवा घडो असें मनापासून इच्छितों.

आपला,
चिं. द्वा. देशमुख

(४)

स. न. वि. वि.

आपलें विदर्भ साहित्य मंदिर कोनशिला स्थापनेसंबंधींचें निमंत्रण पावलें, आभारी आहें. मला इतरत्र स्वीकृत कार्यामुळे, हजर रहातां येणार नाही. खेद वाटतो. क्षमा असावी.

आपले प्रांताचे (नवीन भाषा प्रचाराप्रमाणे संस्थानचे) सरमंत्री यांचे हस्ते समारंभ होत आहे, हें सुदैव होय. या प्रसंगीं समारंभास माझें शुभचिंतन व सुयश चिंतनपर शुभेच्छा स्वीकृत व्हाव्या ही विनंती आहे.

आपले संस्थानांत यापुढे मराठी भाषिकांना प्रमुखतः साहित्यिकांचेंच कार्य उरणार आहे, व ही स्थिति निदान कांही वर्षेंतरी चालू रहाणार आहे, असें मी समजतों. या दृष्टीने साहित्यिकांचे केंद्र मंदिर स्थापन व्हावें हें सुचिन्ह होय.

माझे मते सदरहू प्रसंगीं मराठी भाषिकांसंबंधीचे प्रमुख प्रश्न सरमंत्र्यांचे नजरेस आणणें अप्रासंगिक होणार नाही.

उदाहरणार्थ—

(१) लेजिस्लेटिव्ह कौन्सिल, सेक्रेटरिएट, युनिव्हर्सिटी वगैरे सरकारी व निमसरकारी संस्थांतून होणारी मराठीची उचलबांगडी व तत्संबंधी शिस्तवार प्रयत्न हे अयोग्य होत, व सरकारतर्फेंचें या धोरणास प्रोत्साहन नाही असें जाहीर होणें अयोग्य नव्हे असें नजरेस आणलें जावें.

(२) कॉलेजेसमधून व शाळांमधून (विशेष सरहद्द जिल्ह्यांतील) मराठीची गळचेपी हळूहळू अगर वेगाने परिस्थितीनुसार होत आहे तिला आळा सरकारी जाहीरनाम्याने व्हावा असें नजरेस आणावें.

(३) मनुष्य स्वभावानुसार ही गोष्ट नुसती सरकारी फर्मानाने होणारी नसल्या मुळे सरहद्द तहशिली अगर विभागाशेजारचे मराठी जिल्ह्यांत सामील केल्यावांचून नं. १ मधील परिस्थिति सुधारणें दुरापास्त होय हें सांगितलें जावें.

(४) सरकारी कर्मचारी मराठी जिल्ह्यांतील लोकांचे भाषेंत त्यांची वास्तपुस्त करूं शकतील आणि इंग्रजीप्रमाणे असेल गरज तर शिकतील अशा तोऱ्याने न वागतील अशी काळजी घेऊन त्या भागांत पाठविले जावे हें नजरेस आणावें.

(५) निव्वळ देशभक्ति अगर राष्ट्रभाषा यांचें, दळणवळणास उपयुक्तता ही एक दृष्टि सोडून, हट्टवादाने स्तोम माजविणें व दुराग्रहाने त्यासंबंधी ज्वलंत बद्दल रचना करणें हें देशाचे किंवा संस्थानाचे दृष्टीने इष्ट नव्हे, हें नजरेस आणावें.

अनुक्रमणिका

(६) निव्वळ बहुमताचे जोरावर केलेल्या कायद्यास लोकांनी मानलेंच पाहिजे ही वृत्ति इंग्रजाचे Prestige चे कल्पनेस युक्त होती. सर्वच एकदेशीय पण भिन्न भाषियांमध्ये ही परस्परांत वृत्ति Prestige करितां ठेवणें हें अयुक्त होय, हें नजरेस आणावें.

(७) "हिंदी" ला "राष्ट्रभाषा" न म्हणतां "संघराज्य भाषा" संबोधण्यांत यावें म्हणजे त्यांतील दुराग्रहोत्पादक भाग जाईल. हिंदीला वास्तवांत संघराज्यभाषा याद्दृष्टीने उपयुक्तता आहे हें सर्वच मानतात व या दृष्टीने कोणाचाच विरोध असत नाही. पण ती "राष्ट्रभाषा" म्हणून त्यांतील पुढारी जेव्हा इतर भाषांचें संपूर्ण उच्चाटन हें त्यासंबंधी प्रचाराचें कर्तव्य समजून इतरांना राष्ट्रद्रोही ठरविण्याचे व्यापारांत पडतात तेव्हा विरोधाचें कारण उत्पन्न होतें. तरी विनंती करण्यांत अशी यावी की सरकारतर्फे "संघराज्यभाषा" अथवा त्याचा डॉ. रघुवीर निर्मित पर्याय शब्द नियमाने वापरला जाण्याची काळजी घेतली जावी म्हणजे गैरसमाजाचें कारण समूळ जाईल.

असो! पत्र कल्पनेपेक्षा लांबलें यांची माफी असावी.

समारंभ उत्कृष्टपणे पार पडो असें शुभचिंतन करितों. कळावें.

आपला
रामराव देशमुख

*

श्री. रा. पु. सगदेव, चिटणीस, विदर्भ साहित्य संघ यांनी ता. १५ एप्रिलच्या समारंभाचे वेळीं सादर केलेलें प्रतिवृत्त

माननीय शिक्षणमंत्री, पं. द्वारकाप्रसाद मिश्र, विदर्भ साहित्य संघाचे सभासद आणि निमंत्रित सन्मान्य स्त्री--पुरुष;

विदर्भ साहित्य मंदिराच्या या कोनशिलास्थापना प्रसंगीं विदर्भ साहित्य संघाच्या आतापर्यंतच्या कार्याचें आणि कार्यकर्त्यांचें शुभ स्मरण करणें आणि आपणाला करून देणें हें मी आपलें पवित्र कर्तव्य समजतों. विदर्भ साहित्य संघाला प्राप्त होत असलेलें आजचें भरघोस स्वरूप पाहून विदर्भांतील सर्व मराठी भाषा बोलणाऱ्यांचीं अंत:करणें कृतज्ञतेने भारावून जातील आणि त्यांच्या मन:चक्षूसमोर २८ वर्षांपूर्वींचा काळ उभा राहील.' त्यावेळीं विदर्भांत कोणत्याहि प्रकारच्या वाङ्मयीन संस्था' अस्तित्वांत नव्हत्या. आपापल्यापरी साहित्यसेवा करणाऱ्या साहित्यिकांना एकत्रित येऊन विचार विनिमय करण्याची संधि देणारे कोणतेंहि साधन उपलब्ध नव्हतें. तरुणांच्या अंत:करणांत मराठी भाषा व साहित्य याविषयी प्रेम निर्माण करण्यासाठी आणि होतकरू साहित्यिकांना उत्तेजन देण्यासाठी ज्या

सभासंमेलनाचा उत्कृष्ट उपयोग होतो, अशीं सभासंमेलनें विदर्भात कुठेच भरत नव्हतीं. त्यांची आवश्यकता लक्षांत येतांच हीं नानाप्रकारचीं कार्यें करण्यासाठी एखाद्या साहित्य संस्थेची स्थापना करणें कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांना फार जरुरीचें वाटलें. विदर्भ साहित्य संघाच्या स्थापनेची मूळ कल्पना त्यांचीच. अर्थात् कविभूषण खापर्डे हे या संघाचे मुख्य संस्थापक होत. त्यांच्याच खटपटीने आणि प्रेरणेने ता. १३ व १४ जानेवारी १९२३ सालीं अमरावती येथील ब्रह्मविद्या-मंदिरांत एक साहित्य संमेलन भरलें आणि त्यांत ता. १४ जानेवारी रोजीं विदर्भ साहित्य संघाची रीतसर स्थापना झाली. उपरोक्त साहित्य संमेलन हेंच संघाचें पहिलें संमेलन होय. या संमेलनाचें अध्यक्षपद, मराठींतील युगप्रवर्तक नाटककार, टीकाकार आणि विनोदी लेखक श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांनी मंडित केलें होतें. विदर्भ साहित्य संघाच्या कार्याचें क्षेत्र, त्यावेळीं संपूर्ण विदर्भ म्हणजे वऱ्हाड, मध्यप्रांताचे मराठी चार जिल्हे, पूर्व खानदेश आणि हैद्राबाद संस्थानमधील मराठवाडा हें ठरलें होतें. विदर्भ म्हणजे हा संपूर्ण प्रदेश होय. संघाच्या स्थापनेच्या निमित्तानें 'विदर्भ' या प्राचीन शब्दाचें पुनरुज्जीवन होऊन निरनिराळ्या ठिकाणीं विभागल्या गेलेल्या या चार तुकड्यांच्या एकीकरणाच्या कल्पनेलाहि अनायासेच चालना मिळाली. 'संघ' या शब्दाची योजना करतांना संस्थापकासमोर बौद्धधर्माच्या इतिहासांत अतिशय गाजलेला 'संघ' हा शब्द होता. ऐतिहासिकता, प्राचीनता, पवित्रता आणि सूत्रकता या अनेक दृष्टींनी या शब्दाची योजना आपल्या संस्थेच्या नांवांत करतांना संस्थापकानें फार दूरदर्शित्व पत्करलें यांत शंका नाही. संघाच्या उद्देशांत आरंभापासूनच वाङ्मय-विषयक कार्य, इतिहास संशोधन, हस्तलिखितांचा संग्रह, ग्रंथालय, ललित कलांचा अभ्युदय, मासिकाचें संपादन, ग्रंथप्रकाशन असे नानाविध उद्देश होते आणि त्याप्रमाणें आरंभीं नेटानें कार्याला सुरुवातहि झाली होती. संघानें काही हस्तलिखितें व बरीचशी ऐतिहासिक साधनसामुग्री जमविलीहि. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांना अजूनहि अत्यंत उपयुक्त असलेला 'महानुभावीय मराठी वाङ्मय' हा डॉ. य. खु. देशपांडे यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ प्रसिद्ध केला. संमेलनें भरविण्याची व्यवस्थाहि उत्तम केली. १९२४ सालीं दुसरें संमेलनहि अमरावती येथेच भरलें. अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध इतिहासकार यादव माधव काळे यांनी मंडित केलें होतें. तिसरें अधिवेशन नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं १९२६ मध्ये यवतमाळ येथे भरलें. त्यावेळीं लोकनायक अणे हे स्वागताध्यक्ष होते. १९२७ साली चिंतामण विनायक वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं संघाचें चौथें अधिवेशन हैद्राबादला साजरें झालें. पाचवें अधिवेशन १९२८ मध्ये जळगांव -पूर्व खानदेश, येथे झालें. न्यायमूर्ति केशवराव कोरटकर हे त्यावेळीं अध्यक्ष होते. त्याच्या पुढील वर्षी संघाचें ६ वें अधिवेशन दादासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखालीं आपल्या नागपूर येथेच झालें होतें. यानंतरच्या अधिवेशनाचें आमंत्रण अमरावतीनें दिलें होतें. पण अण्णासाहेब खापर्डे यांची काशी येथील हिंदु विश्वविद्यालयांत मराठीचे प्राध्यापक

१९५१
एप्रिल

म्हणून नेमणूक झाल्यामुळे ते अमरावती सोडून बाहेरगांवीं गेले आणि म्हणून संघाच्या कामांत बरेंच शैथिल्य निर्माण झालें तें नाहीसें करण्याचा प्रयत्न बराच करण्यांत आला. पण त्यांत यश आलें नाही. तेव्हा डॉ. वि. भि. कोलते, यांनी सौ. मथुराबाई द्रविड आणि श्री. अ. तु. वाळके यांच्या साह्याने संघाचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला व १९३७ साली प्रा. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखालीं संघाचें सातवें अधिवेशन अमरावती येथे घडवून आणलें. मध्यप्रांत वऱ्हाडचे त्यावेळचे पंत प्रधान डॉ. ना. भा. खरे यांनी संमेलनाचें उद्घाटन करतांना मराठींतील कांही जप्त पुस्तकांवरील निर्बंध काढून घेतल्याचें जाहीर केलें. ही अभूतपूर्व गोष्ट म्हणजे या संमेलनाचा स्पृहणीय विशेष होता. या पुनरुज्जीवनाच्या वेळीं संघाचें कार्य व्यवस्थित आणि विशेष नेटाने चालावें म्हणून लोकनायक अणे यांना संघाध्यक्ष निवडण्यांत आलें. पुढील समलन वर्धा येथे भरायचें, पण लागलीच महायुद्धाचे ढग जमूं लागले. तशांत वर्धा येथील कार्यकर्त्यांची पांगापांग झाली. संघाध्यक्ष लोकनायक अणे यांची भारताचे वकील म्हणून परदेशांत नेमणूक झाली. अशा अनेक गोष्टी घडल्या. त्यामुळें संघाच्या कार्यात पुन्हा शैथिल्य आलें. त्यांतून विदर्भ साहित्य संघाला वर काढण्याचें कार्य प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी केलें. त्यांच्याच प्रयत्नांनी आकोट येथे संघाचें आठवें संमेलन डॉ. य. खु. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें. संघाला त्या वेळीं पायाशुद्ध स्वरूप देण्यात आलें. नवीन घटना तयार करण्यांत येऊन संघ रजिस्टर करण्यात आला. प्रा. दिवाणजीसारखे अत्यंत उत्साही सरचिटणीस संघाला लाभले आणि त्यामुळें संघाचीं पुढील अधिवेशनें आणि इतर कार्यें उत्साहाने पार पडूं लागलीं. सुदैवाने नवीन कार्यकर्तेहि संघाचें काम करण्याला उभे राहिले. १९३७ मधील विदर्भ साहित्य संमेलनाचे चिटणीस असलेले उत्साही कार्यकर्ते श्री. प्रा. ना. खोडे यांच्या दीर्घ परिश्रमाने दर्यापूर येथील वि. सा. संघाचें ९ वें अधिवेशन अत्यंत उत्साहाने पार पडलें. संघाध्यक्ष म्हणून निवडून आलेले प्रा. बनहट्टी हेच संमेलनाध्यक्ष होते. १० वें अधिवेशन पुसद येथे श्री. पु. य. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालें. ११ वें अधिवेशन गोंदिया येथे डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. याचवेळीं लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखालीं संघाचा रौप्य महोत्सव थाटाने साजरा झाला.

या नंतरचें संमेलन चांदा येथे व्हायचें होतें. त्याचें कार्यहि सुरू झालें. पण ऐनवेळीं संघाचे एकनिष्ठ कार्यकर्ते प्रा. ना. कृ. दिवाणजी यांना काळाने आमच्यांतून अकस्मात हिरावून नेलें. पण त्यामुळें हतबल होणें म्हणजे प्रा. दिवाणजींच्या कार्याचा विसर पडूं देण्यासारखें होतें. म्हणून चांद्यालाच आणि तेंहि शक्य तितक्या लवकर आम्ही तें संमेलन घडवून आणलें. त्या प्रसंगीं डॉ. मा.
१७९ गो. देशमुख यांची अध्यक्षस्थानी योजना झालेली होती. आता या पुढेंच

संमेलन संघाचे अत्यंत उत्साही व कळकळीचे संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली अकोला येथे साजरें व्हायचें आहे.

अकोट येथील संमेलन प्रसंगीं संघाचें मुखपत्र म्हणून एक मासिक चालू करावें असें ठरलें होतें. त्याप्रमाणे श्री. वा. ना. देशपांडे यांच्या संपादकत्वाखालीं लौकरच 'युगवाणी'चें प्रकाशन होऊं लागलें. पुसद संमेलनाच्या वेळीं द्रव्याभावी युगवाणीचें काय होणार हा प्रश्न उपस्थित झाला. पण त्या प्रसंगी संघाचे तरुण व स्वार्थत्यागी कार्यकर्ते श्री.. द. ना. ठाकूर हे मदतीला धावून आले. त्यांनी पांच वर्षेपर्यंत युगवाणीचें मुद्रण विनामूल्य करून देण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणे आतापर्यंत युगवाणीचे अंक नियमितपणे त्यांच्याच उदारतेमुळे प्रसिद्ध होऊं शकले. मध्यंतरी श्री. वा. ना. , देशपांडे यांच्याकडून युगवाणीचें संपादकत्व श्री. वामनराव चोरघडे यांच्याकडे आलें. या दोन्ही संपादकांनी युगवाणीचा लौकिक वाढविला व संघाच्या वाङ्मयीन कार्याला उच्च स्थान प्राप्त करून दिलें. श्री. द. ना. ठाकूर यांनी तर निःस्वार्थ सेवेचा उत्तम आदर्श सर्वांपुढे ठेवला याबद्दल त्यांचे साभार अभिनंदन जेवढें करावें तेवढें थोडेंच होईल.

पुसद संमेलनाच्या प्रसंगी आणखी एका महत्वाच्या कार्याला चालना मिळाली. दर्यापूर येथील संमेलनांतील अनौपचारिक चर्चेत श्री. सगदेव यांनी परीक्षांची योजना सुचविली होती. तिचाच पुरस्कार पुसद येथे करण्यांत आला व प्रा. बनहट्टी यांच्या संचालकत्वाखालीं परीक्षा-समिति स्थापन होऊन संघातर्फे मराठी भाषा व साहित्य विषयक परीक्षा घ्यायला सुरुवात झाली. प्रा. बनहट्टी व प्रा. अ. ना. देशपांडे यांच्या प्रयत्नांनी परिक्षांच्या कार्याला स्थिर स्वरूप प्राप्त झालें. गेलीं दोन वर्षे परिक्षासमितीचें कार्य डॉ. वि. भि. कोलते यांच्या संचालकत्वाखालीं चालू आहे. श्री. रा. पु. सगदेव हे परीक्षा समितीचे कार्यवाह आहेत. अगदी आरंभीच्या वर्षी परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १०० होती. आतां प्रत्येक वेळीं साधारणपणे ३५० ते ४०० पर्यंत विद्यार्थी या परीक्षांना बसतात. प्रा. वि. भि. कोलते यांच्या सूचनांवरून मराठीतर जनतेसाठी मराठी प्रवेश व मराठी प्रारंभ अशा दोन परीक्षा सुरू करण्यांत आल्या. त्यांचा अनेकांना चांगला उपयोग होत आहे. संघाच्या परीक्षांना मध्यप्रदेश सरकारकडून मान्यता मिळविण्याचे आमचे प्रयत्न चालू आहेत. ही मान्यता लौकरच हाती येईल असें वाटतें. सध्या या परीक्षा निरनिराळ्या २१ केंद्रस्थानी घेतल्या जातात व या कार्यात स्थानिक मंडळीकडून आम्हांला निरपेक्ष साह्य होतें. याबद्दल संघ त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे अध्यक्ष म्हणून निवडून आल्यापासून संघाच्या कार्याला विशेष जोर चढला आहे. विदर्भ साहित्य संघाला आपल्या कचेरीसाठी व इतर वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्य करण्यासाठी स्वतःचें मंदिर पाहिजे होतें. त्या मंदिराची उभारणी करण्याचें अत्यंत महत्वाचें काम श्री. माडखोलकरांनी

आपल्या अंगावर घेतलें. गेल्या वर्षभर अविश्रांत परिश्रम करून त्यांनी विदर्भ साहित्य संघासाठी मध्यप्रदेश सरकारकडून जागा मिळविली. त्याच जागेवर सध्या आपण बसलों असून आपल्या संकल्पित विदर्भ साहित्य मंदिराची कोनशिला स्थापण्याचा मंगल समारंभ आज रामनवमीच्या शुभमुहुर्तावर साजरा करीत आहोंत. संघाला ही जागा मिळवून देण्याच्या कामी आपणापैकीं अनेक सज्जनांचें जसें साहाय्य झालें आहे तसेंच तें विदर्भ साहित्य मंदिर उभे करण्याच्या बाबतीतीह व्हावें अशी आपणाला नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाला आतापर्यंत अनेकांनी द्रव्य साहाय्य केलें आहे. संघ ज्यावेळी कर्जात रुतलेला होता त्यावेळी अमरावती व नागपूर येथे नाट्यप्रयोग करून विदर्भ नाट्यमंदिराने सुमारे ६०० रुपयांची मदत आम्हाला दिली. याचें श्रेय विदर्भ नाट्यमंदिराचे अध्यक्ष वि. भि. कोलते, चिटणीस श्री. शं. ना. सहस्रबुद्धे व प्रा. दिवाणजी यांच्याकडे जातें. त्याचवेळी श्री. पु. य. ऊर्फ बाबासाहेब देशपांडे यांनी सरकारकडून १ हजार रुपयांची देणगी मिळवून दिली. या वर्षी तर मध्यप्रदेश सरकारने पांच हजार रुपयांची देणगी देऊन संघाच्या कार्याला मान्यता व विशेषच प्रोत्साहन दिलें. संघाच्या निरनिराळ्या प्रकारच्या सभासदांनी केलेली मदतहि विसरणें शक्य नाही. विशेष महत्वाची व अभिनंदनीय गोष्ट अशी की नागपुरांतील सुप्रसिद्ध दानशूर व रसिकाग्रणी साहित्यप्रेमी श्रीमंत बाबुरावजी देशमुख हे वि. सा. संघाचें पहिलेच पेट्रन झाले आहेत. त्यांचा उल्लेख करण्यास मला अतिशय आनंद वाटतो. मराठी भाषेच्या व साहित्याच्या या कार्याला या सर्व सज्जनांची कृपा आमच्यावर अशीच निरंतर रहावी, नव्हे ती उत्तरोत्तर वाढत जावी अशी प्रार्थना आहे.

★

मध्यप्रदेश ॲकॅडेमी

ता. ७ डिसेंबर १९५० रोजी दुपारी २ वाजतां मध्यप्रदेश सरकारच्या शिक्षण खात्याचे कार्यवाह डॉ. वेणीशंकर झा यानी मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलन आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या प्रतिनिधींशी या दोन्ही संस्थांच्या सहकार्याने मध्यप्रदेश ॲकॅडेमी स्थापन करण्यासंबंधी अनौपचारिक चर्चा केली. या बैठकीला संमेलनातर्फे संमेलनाचे उपाध्यक्ष डॉ. बलदेवप्रसाद मिश्र, साहित्यमंत्री श्री. के. एन्. जयचंद्र, आणि अर्थमंत्री श्री. के. पी. मिश्र हे हजर होते व विदर्भ साहित्य संघातर्फे श्री. ग. त्र्यं. माडखोलकर. श्री. बाळासाहेब ढवळे आणि श्री. प. श्री. पटवर्धन हे हजर होते. या चर्चेत ॲकॅडेमी संबंधीच्या योजनेची स्थूल रूपरेषा ठरविण्यांत आली. शिक्षण मंत्री नामदार पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांनी दसऱ्याच्या सुमारास जबलपूर येथे भरलेल्या मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलनाचें उद्घाटन करतांना जें भाषण केलें होतें त्यांतील विचारांना धरून ही रूपरेषा

ठरविण्यात आली. या बैठकींत आणखी असेंहि निश्चित करण्यांत आलें की दोन्ही संस्थांच्या प्रत्येकी पांच प्रतिनिधींची संयुक्त सभा भरून तिने ॲकॅडेमीच्या घटनेचा मसुदा तयार करावा.

या निर्णयानुसार ता. १४ एप्रिल १९५१ रोजी सकाळी ९ वाजतां श्री. माडखोलकर यांच्या घरी संमेलन आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या प्रतिनिधींची संयुक्त सभा अनौपचारिक रीत्या ॲकॅडेमीच्या स्थापनेचा विचार करण्यासाठी भरली होती. या सभेला संमेलनातर्फे डॉ. बलदेवप्रसाद मिश्र, डॉ. हिरालाल जैन, प्रा. विनयमोहन शर्मा, प्रा. सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी आणि श्री. ललिताप्रसाद पुरोहित हे हजर होते व विदर्भ साहित्य संघातर्फे सौ. कुसुमावती देशपांडे, डॉ. य. खु. देशपांडे, प्रो. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. ए. श्री. पटवर्धन आणि श्री. रा. पु. सगदेव हे हजर होते.

डॉ. मिश्र यांनी अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर जुन्या सी. पी. ॲड बेरार लिटररी ॲकॅडेमीचे पुनरुज्जीवन न करतां नवी ॲकॅडेमी स्थापन करावी असा निर्णय प्रथम करण्यांत आला; व नंतर या नव्या ॲकॅडेमीचें नामकरण 'मध्यप्रदेश साहित्य परिषद' असें करण्यांत येऊन तिच्या घटनेची रूपरेषा व नियामक मंडळ आणि कार्यकारी मंडळ यांची योजना निश्चित करण्यांत आली. अल्पोपहार होऊन ही प्रास्ताविक सभा संपली.

सचिवालयांतील सभा

यानंतर दुपारीं २ वाजतां ना. पं. मिश्र यांच्या अध्यक्षतेखालीं या संयुक्त सभेची मुख्य बैठक झाली. तिला शिक्षणखात्याचे कार्यवाह डॉ. वेणीशंकर झा, भाषाविभागाचे कार्यवाह श्री. आ. रा. देशपांडे आणि प्रकाशनाधिकारी श्री. परिहार हेहि हजर होते. प्रथम श्री. माडखोलकर यांनी सर्व प्रतिनिधींचा पं. मिश्र यांच्याशी परिचय करून दिला. नंतर ना. पं. मिश्र यांनी प्रास्ताविक भाषण करताना ॲकॅडेमींत हिंदी आणि मराठी यांच्या प्रतिनिधित्वाचें प्रमाण सर्व बाबतींत समान असावें असें सांगितलें; व सरकारचें धोरण ॲकॅडेमीला मदत करण्याचें राहील, पण तिच्यावर कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण ठेवण्याची सरकारला इच्छा नाहीं असाहि स्पष्ट खुलासा केला. यानंतर सकाळच्या बैठकींत निश्चित झालेली रूपरेषा, नियामक मंडळ आणि कार्यकारी मंडळ यांची योजना संमत झाली; व तदनुसार पुढील कामें करण्यासाठीं दोन उपसमित्याहि नेमण्यांत आल्या. अल्पोपहार झाल्यावर ही सभा समाप्त झाली.

राजभाषा अधिनियम

विदर्भसाहित्य संघाचें शिष्टमंडळ

ता. १४ एप्रिल रोजीं दुपारी ३॥ वाजतां सचिवालयांत विदर्भ साहित्य संघाच्या शिष्टमंडळाने राजभाषा अधिनियमासंबंधीचा वि. सा. संघाचा ठराव शिक्षणमंत्री ना. पं. मिश्र यांना सादर केला. शिष्टमंडळांत संघाध्यक्ष श्री.

अनुक्रमणिका

माडखोलकर, उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे, अमरावतीचे शाखाध्यक्ष प्रो. ग. त्र्यं. देशपांडे, 'युगवाणी' चे संपादक प्रा. वा. कृ. चोरघडे, वि. सा. मंदिर समितीचे कार्यवाह श्री. ए. श्री. पटवर्धन आणि संघाचे कार्यवाह श्री. रा. पु. सगदेव हे होते. पंडितजींनी सुमारे अर्धा तास चर्चा करून सरकारची भूमिका विषद केली. नंतर शिष्टमंडळाने आभारपूर्वक त्यांचा निरोप घेतला.

विदर्भ साहित्यमंदिराची कोनशिला
सोबत पायांत ठेवलेला ताम्रपट

विदर्भ साहित्यमंदिराचा कोनशिलासमारंभ रविवार ता. १५ एप्रिल रोजीं रामनवमीच्या सुमुहूर्तावर संपन्न झाला. या कोनशिलेबरोबर विदर्भ साहित्य-मंदिराच्या पायांत ठेवण्यासाठीं जो ताम्रपट तयार केला आहे, तो संपूर्ण पुढे दिला आहे :—


॥ श्री ॥

विदर्भ साहित्य संघ

स्थापना :—उमरावती येथे शालिवाहन शके १८४४ इसवी सन १९२३ या वर्षी.
संस्थापकः—बळवंत गणेश खापर्डे. प्रथम संमेलनाध्यक्ष-श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
कार्यक्षेत्र :—वऱ्हाड आणि मध्यप्रदेश
उद्देश :—मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्ध्यर्थ सर्व दृष्टींनी प्रयत्न करणें.

विदर्भ साहित्य संघाच्या नागपूर येथील उत्तर अंबाझरी रस्त्यावरील केंद्रीय कार्यालयाच्या मंदिराच्या कोनशिलान्यासाचा समारंभ स्वस्ति श्रीमनृप शालिवाहन शके १८७३, खरनाम संवत्सरे, रविवारी चैत्र शुद्ध नवमी 'रामनवमी', ह्या शुभ दिवशीं सकाळीं माननीय पंडित द्वारकाप्रसाद मिश्र, शिक्षण मंत्री मध्यप्रदेश शासन, ह्यांच्या हस्तें झाला. त्यानिमित्त हा ताम्रपट कोनशिलेखालीं घालण्यांत आला.
रविवार ता. १५ एप्रिल १९५१

विदर्भ साहित्यसंघाचें बोधाचिन्ह



विदर्भ साहित्य संघाचें कार्यकारी मंडळ १९५०

अध्यक्षः–गजानन त्र्यंबक माडखोलकर

उपाध्यक्षः–पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

चिटणीसः–श्रीमती शकुंतला दिवाणजी

नियोजित अध्यक्ष १९५१

सौ. कुसुमावती देशपांडे

राम उवाच

यत्क्षेमं त्रिदिवाय वर्त्म निगमस्याङ्गं च यत्सप्तमम्
स्वादिष्ठं च यदैक्षवादपि रसाच्चक्षुश्च यद्वाङ्मयम्
तद्यस्मिन्मधुरं प्रसादि रसवत् कान्तं च काव्यामृतम्
सोऽयं सुभ्रु पुरो विदर्भविषयः सारस्वतीजन्मभूः ॥

–बालरामायणे राजशेखरः

श्रीज्ञानेश्वर

माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके। परि अमृतातें ही पैजेसीं जिंके। ऐसीं अक्षरेंचि रसिके। मेळवीन

—ज्ञानेश्वरी ६-१४


फलेठाणापासौनि दक्षिणेपर्यंत मऱ्हाटी भाष जेतुला ठाइं वर्ते तें एक मंडल। तयासि उत्तरें बालेघाटाचा सेवट असे। ऐसे एक खंडमंडळ। मग उभय गंगातीर तेहि एक खंडमंडळ। आन तयापासौनि मेघंकर घाट ते एक मंडळ। तयापासौनि आवघे वर्‍हाडः तेहि एक मंडळ। पर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे। किंचित किंचित भाषेचा पालट असे म्हणौनि खंडमंडळे म्हणावीं।

— महानुभावीय आचारबंद
महंत विश्वनाथ बासवीडकर

जैसी पुष्पांमाजि पुष्प मोगरी। कि परिमळांमाजि कस्तुरि। तैसी भासामाजि साजिरा। मराठिया। –ख्रिस्तपुराण, फादर स्टीफन्स

१९५१
एप्रिल

संयुक्त महाराष्ट्राचें मानचित्र



गीत मराठ्यांचें श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति, दीप्ति, धृतिहि देव मन्मनीं वसो
वचनिं, लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्ममर्म मनिं वसो ॥

—श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

कोनशिलेवरील लेख

विदर्भ साहित्यमंदिराच्या कोनशिलेवर पुढील लेख कोरलेला आहे.—

श्री

विदर्भ साहित्यसंघ

विदर्भ साहित्यमंदिर–कोनशिला स्थापना

नामदार पंडित द्वारकाप्रसाद मिश्र
गृहमंत्री, मध्यप्रदेश यांच्या हस्ते

मिति : रविवार, चैत्र शुद्ध ९, शके १८७३, तारीख १५ एप्रिल १९५१

१:८५ संघाध्यक्ष—श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

अनुक्रमणिका

अकोल्याला चला

वामन कृष्ण चोरघडे

★

प्रस्तुत लेख केवळ 'युगवाणी'चा संपादक या नात्याने किंवा कार्यकारी मंडळाचा अनेक वर्षांचा संबंधी या नात्याने मी लिहीत नसून येथे माझी भूमिका विदर्भ साहित्य संघाच्या साधारण सभासदाची आहे. गेलीं पांच सात वर्षे साहित्य संघाच्या कार्यांत मी पुष्कळच भाग घेतल्यामुळे संघाविषयी मला आपुलकी वाटणें आणि संघाकडून मराठी भाषेच्या सेवेची आणि समृद्धीची कामगिरी सफल व्हावी अशी मी आशा करणें साहाजिकच आहे. म्हणूनच सर्व सभासदांना माझी अशी विनंती आहे की त्यांनी अकोल्याला चलावें.

भौगोलिक दृष्टीने अकोला हें फार चांगलें ठिकाण आहे म्हणून नव्हे किंवा अकोल्याचें स्वागत मंडळ सर्वांची उत्कृष्ट बरदास्त ठेवतील म्हणून किंवा अकोल्याला नाटक, करमणूक इत्यादींच्या भरगच्च कार्यक्रमांनी सम्मेलनाचा उत्सव साजरा होईल म्हणूनहि नव्हे ! सर्व सभासदांनी आणि या प्रांतांतील मराठी वाङ्मयाच्या व भाषेच्या हितचिंतकांनी अकोल्याला चालण्याचें मुख्य प्रयोजन म्हणजे या सम्मेलनांत आपली उपस्थिति लावणें हेंच होय. मराठीच्या हितचिंतकांनी सध्याच्या परिस्थितींत आपल्या भाषेबद्दल आस्था आणि प्रेम सर्वांना पटवून देण्याची सध्या फार गरज आहे. विदर्भ साहित्य संघाचें कार्य चंद्रकलेसारखें किंवा एखाद्या छायाशील वृक्षासारखें उत्तरोत्तर वाढत आहे हें सिद्ध करून दिलें पाहिजे इतकें झाकलेलें नाही. विदर्भ साहित्य संघाने काय करावें या संबंधींच्या अनेक सूचना अनेक हितचिंतकांनी केल्या आहेत आणि त्या याचवेळीं केल्या यावरूनच त्यांना साहित्य संघाच्या वाढत्या व्यापाची आणि जबाबदारीची कल्पना आहे हें उघड आहे. ही जाणीव सर्व सभासदांनी एकत्र येऊन दोन दिवस खेळीमेळीने सम्मेलनांत भाग घेऊन अधिक दृढ करावी आणि भाषेचा प्रश्न जागरूकपणे विचारांत घ्यावा हें आज फार निकडीचें असें कर्तव्य आहे.

स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेमध्ये मातृभाषे संबंधी जी व्यवस्था नमूद केली आहे तिची जाणीव सुशिक्षितांना व कार्यकर्त्यांना आहे. मध्यप्रदेशाच्या राज्यकारभारांत मराठी आणि हिंदी यांना जें स्थान मिळालें त्यांत उजवें डावें

झाल्याचा पुष्कळांचा समज आहे आणि त्यासंबंधी विदर्भ साहित्य संघाकडून कांहींच कारवाई केली जात नाहीं असा त्याचेवर आरोप आहे. हा आरोप या प्रांतांतील व तसेंच प्रांताबाहेरील व्यक्ति व वृत्तपत्रें यांनी केलेला आहे. वस्तुस्थिति तशी नाहीं. दोन भाषा सारख्याच तोलाने कोर्टांतील वैधानिक मतभेदांत अधिकृत मानणें अशक्य असल्याने इंग्रजी ऐवजी हिंदीला अंशतः उजवेपण मिळालें हें खरें पण तें अपरिहार्य आहे. मध्यप्रदेशांत राजभाषेचा कायदा विधिमंडळासमोर प्रस्तुत करतांना मध्यप्रदेशाचे शिक्षणमंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचें भाषण ज्यांनी वाचलें असेल त्यांना माझ्या म्हणण्याचा पडताळा पाहून घेतां येईल. विदर्भ साहित्य संघाने वेळोवेळी याबाबत समयज्ञतेने सर्व मुद्यांचा खुलासा करून घेतला आहे. अकोला साहित्य सम्मेलनाच्या अगोदर पुन्हा एकदा सर्व चर्चा करून घेण्याच्या उद्देशाने वि. सा. संघाच्या शिष्टमंडळाने ता. १४ एप्रिल रोजीं शिक्षण मंत्र्यांची भेट घेऊन आपलें समाधान करून घेतलें आहे.

याबाबतींत एक अडचण आहे. पुष्कळ मंडळींना " आपले न्याय्य हक्क गेले " असें वाटतांच एकदम संघर्षाची लढाईची हाहाकाराची किंकाळी फोडावीशी वाटते. अशा मंडळींच्या दुर्दैवाने वि. सा. संघाच्या कार्यकर्त्यांचे आणि प्रस्तुत कायदा प्रत्यक्षांत आणणाऱ्यांचे संबंध मित्रत्वाचे आणि एकाच उद्देशासाठी प्रयत्न करणाऱ्या सेवकांसारखे असल्यामुळे हाहाकाराची भाषा वि. सा. संघाला वापरतां येत नाहीं.

थोडा संशय निर्माण झाला तो तत्त्वामुळे नसून तपशीलामुळे झाला आहे आणि तसा गैरसमज व्हावयास जागाहि आहे. कारण कायद्याची अंमलबजावणी करणारांचा जुना पीळ आणि इंग्रजी खाक्या अजून नाहीसा झालेला नाहीं. त्यांच्या हातीं बरेचसे अमलदारी अधिकार असतात. हे अधिकार योग्य रीतीने व खबरदारीने प्रत्यक्षांत आणण्यासाठी थोडा अवधी हवा आहे. अशा अधिकाऱ्यांकडे विदर्भ साहित्य संघाला जाणें शक्यहि नसतें व तें उपयोगाचेंहि नसतें. तथापि तपशीलाबाबतहि संघ योग्य वेळीं योग्य ती खबरदारी घेईल एवढा विश्वास निर्माण करण्याइतकें कार्य संघाने केलें आहे. कायदा करणाऱ्यांची भूमिका स्पष्ट निःसंदिग्ध आणि कुठलाहि आडपडदा न ठेवणारी दिसते. नोकरवर्गाने किंवा स्वयंपाक्याने घरांत कचरा ठेवल्याची किंवा स्वयंपाक बिघडवल्याची जबाबदारी अगदी बोट दाखवून घरांतील कर्त्या माणसावर जशी लादतां येत नाहीं तसेंच कांहींसें सध्या मराठी भाषेच्या बाबतींत झालेलें आहे. आणि ही परिस्थिति सुधारण्यास अवसर अवकाश सगळें आहे. मध्यप्रदेशांत मराठी हिंदीचे संबंध सलोख्याने नांदविण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे व "मध्यप्रदेश साहित्यसंस्था" स्थापन करणाऱ्यांनी हें अंशतः दाखवून दिलें आहे. बाहेरच्यांना जी परिस्थिति दिसते ती

 बहुधा तशी असते असें नाहीं. प्रत्येक जण आपल्या आजूबाजूच्या परिस्थिती

बरहुकुम अंदाज अडाखे बांधीत असतो आणि म्हणून पुष्कळदा शंकेचें संशयाचें, असंतोषाचें वातावरण निर्माण होण्यास मदत होते.

ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र हे अत्यंत स्पष्टपणाचें धोरण बाळगीत असल्याने त्यांचें लक्ष एकदोन गोष्टींकडे वेधण्यांत हित आहे. ज्या मराठी शाळा अनेक अज्ञात कारणांनी बंद करून त्या जागीं हिंदी शाळा उघडण्यांत आल्या त्यांची पुनः स्थापना केल्याने मिश्राजींवरील विश्वास वृद्धिंगत होण्यास संधी मिळणार आहे. अशा अनेक शाळांची यादी उपेक्षणीय नाहीं इतकी मोठी आहे. या गोष्टीकडे पं. मिश्र समयज्ञतेने अवश्य लक्ष देतील अशी आशा आहे. दुसरी विनंति ना. मिश्रजींना करावयाची आहे. राजा देतो पण कोठावळ्याचें पोट दुखतें. अशा स्थितींत राजाचें उदारपण अन्यांकडून डागळलें जाणार नाहीं याची काळजी राजाने घ्यावयाची असते. हें लक्षांत घेऊन आपलें धोरण योग्य रीतीने पाळलें जात आहे की नाहीं हें पं. मिश्रजी जागरूकपणें पाहतील तर अनेक संशयांची आपोआप निवृत्ति होईल.

भाषेच्या कायद्याचा तपशील आणि अंमलबजावणी सुजाणपणे व्हावी अशी ज्यांची ज्यांची इच्छा असेल त्यांनी आपापल्यापुरता एक दुहेरी कार्यक्रम अमलांत आणावा. (१) आपल्या भाषेबद्दल प्रेम बाळगावें. तिचा जास्तींत जास्त सदुपयोग करावा आणि तिचें साहित्य आस्थापूर्वक संवर्धण्यास मदत करावी. (२) हिंदी भाषेचा आग्रहाने अभ्यास करावा आणि आपल्या भाषे-इतकीच ती भाषा आत्मसात करावी. आरोग्यतज्ञ नेहमी सांगतात की आपल्या शरीराचा कस टिकवावा आणि आजूबाजूचें वातावरण स्वच्छ ठेवावें म्हणजे हडापिडा, रोगराई टळते आणि रोगराई नसेल तर अधिक आरोग्य आणि अधिक सुखी जीवनाचा लाभ होतो.

याचें प्रात्यक्षिक अकोल्याला पटवून घेण्या देण्याची वेळ आज आल्यामुळेच माझी सर्वांना विनंती अशी की त्यांनी अकोल्याला चलावें.

अकोल्याला चालण्याचें आणखी एक कारण म्हणजे श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर हे या संमेलनाचे अध्यक्ष आहेत. माडखोलकरांच्या साहित्यिक जीवनाचे अनेक पैलू आपल्याला माहीत आहेत. त्यांच्या व्यक्तिगत जीवनाशी आपणा पैकी सर्वांची ओळख नाहीं. श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्याबद्दल एकच शब्द वापरायचा झाला तर त्यांच्या माझ्या गेल्या वीस वर्षांच्या परिचयानंतर मी जो शब्द वापरूं शकेन तो म्हणजे 'जिद्दी'! शब्द अस्सल नागपुरी आहे आणि त्यांत माडखोलकरांचें जीवन प्रतिबिम्बित झालें आहे. एखादें कार्य अंगावर घेतलें म्हणजे वावटळ उठावी किंवा रान उठवावें तसें माडखोलकर वागतात. स्वतः तर क्षणाची उसंत घेत नाहीत पण दुसऱ्यांनाहि सुखाचे खाऊ पिऊ देत नाहीत. दिवसाला दिवस न म्हणणें

आणि रात्रीचा दिवस करणें हेंहि त्यांच्या किती अंगवळणी पडलें आहे याचें प्रत्यंतर आम्हा मंडळींना त्यांनी गेल्या एक वर्षांत कधीहि विसर पडणार नाही इतक्या स्पष्टपणे आणून दिलें आहे. गेल्यावर्षी विदर्भ साहित्य संघाचें अध्यक्षपद त्यांनी स्वीकारावें म्हणून जेव्हा मी आणि डॉ. भाऊ साहेब कोल्हे त्यांना विनंती करावयास गेलों तेव्हा त्यांनी निःसंदिग्ध शब्दांत सांगितलें, की " मी जर अध्यक्ष झालों तर साहित्य संघाला स्वतः ची वास्तु मिळवून देण्याचे सर्व प्रयत्न करीन आणि त्यांत तुम्हांला सर्व परीने भाग घेतां आला तरच मी ही जबाबदारी अंगावर घेईन." या वाक्याची वास्तविकता मला व कोल्ह्यांना प्रामाणिकपणे सांगावयाचें म्हणजे त्यावेळीं जाणवली नव्हती कारण आम्ही पुष्कळांना अनेक कारणांनी आजवर विनंत्या केल्या आहेत. माडखोलकरांनी हें कार्य इतक्या तडफेने आणि वेगाने आरंभिलें की त्यांच्या गतीने चालतांना आमचा जीव मेटाकुटीस आला.

अाणि त्यानंतर सौ. शांताबाई वारल्या. तो आघात इतरेजनांनाहि जाणवला, तर मग भाऊसाहेबांवर काय प्रसंग बेतला असेल याची कल्पना येऊं शकते ! आम्ही त्यांच्याशी अत्यंत सहानुभूतीने वागूं गेलों आणि एक दिवस ते मला व कोल्ह्यांना म्हणाले की— "शांताबाई गेल्या. मला स्वतःला संसार असा राहिला नाही. आता माझी सगळी शक्ति मी विदर्भ साहित्य संघाच्या कार्याला लावूं शकतों." या त्यांच्या वाक्यांतील कारुण्याने आमच्या डोळ्यांत अश्रु आले आणि भाऊसाहेबांची निश्चयी मुद्रा पाहून ते न येतील तर बरें असें वाटूं लागलें. विदर्भ साहित्य संघाच्या गेल्या वर्षाच्या अनेकविध प्रगतीला माडखोलकरांची ही जिद्दच प्रामुख्याने कारणीभूत झाली आहे. एरवी साहित्यिक म्हणून, समाजसेवक म्हणून त्यांच्यांत आणि इतर पुष्कळांमध्ये फारसा फरक नाही. असे हे जिद्दी माडखोलकर आपली एक वर्षाची गाजलेली कारकीर्द संपवून अकोल्याच्या व्यासपीठावर सर्व कार्याचा आढावा घेणार आहेत. त्यांचें स्वागत करावयास व त्यांचें भाषण ऐकावयास आपण अवश्य अकोल्यास जाऊं या.

अकोल्याला चालण्याचें दिसरें कारण म्हणजे पुढील वर्षाच्या अध्यक्षपदाचीं सूत्रें सौ. प्रा. कुसुमावती देशपांडे आपल्या हातीं घेणार आहेत. मराठी भाषेसंबंधी आस्था व प्रेम बाळगणाऱ्यांची आजची पिढी कुसुमावतीबाईंना अनेक रीतीने ओळखते. आमच्यापैकी पुष्कळांना त्यांनी शिकविलें आहे. व्यवस्था, टापटीप, कामाचा उरक, कलेची दृष्टि, जीवनातील प्रत्येक गोष्टीतील औचित्याची जाणीव ह्० त्यांच्या गुणांचा ठसा आमच्यापैकी प्रत्येकाच्या अंतःकरणावर उमटलेला आहे. त्यांचे हे सगळे गुण प्रत्ययास येतात ते नर्मदेच्या वेगाने येत नाहीत तर गंगेच्या निर्मल, संथ, सतत झुळझुळ वाहणाऱ्या प्रवाहाने येतात. त्यांच्या प्रत्येक कार्यामागे कला व जीवन यांच्या समन्वयाचें अधिष्ठान तर असतेच पण तें कार्य शांतपणे, सौम्यपणे, दुसऱ्याच्या मनाला किंचिदपि न दुखवितां करण्याची जाणीव त्यांच्या

कृतीकृतीतून प्रतीत होते. आजच्या साहित्य संघाच्या कार्यात या सर्व गुणांची इतक्या निकडीने आवश्यकता आहे की माडखोलकरांच्या नंतर कुसुमावतीबाईंच्या येण्यांत शुभ ग्रहांचा हात असला पाहिजे असें वाटून जातें. धो धो पाऊस येऊन जमीन भिजवून गेल्यानंतर शांतपणे योजनापूर्वक पेरणी करणाऱ्या शेतकऱ्याचें हिंदुस्थानच्या कृषि जीवनांत जें स्थान आहे तें विदर्भ साहित्य संघांत कुसुमावती-बाईंचे राहावयाचें आहे. त्यांच्या अधिकार ग्रहणाचा शुभ योग पाहण्यासाठी आपण अवश्य अकोल्याला जाऊं या.

अकोल्याच्या सम्मेलनांत अनेक ठराव यावयाचे आहेत, अनेक गोष्टींवर चर्चा व्हावयाची आहे. ज्यांच्या मनांत संशय असेल त्यांना उत्तरें मिळून जाणार आहेत. ज्यांच्यांत निष्ठा असेल त्यांना तिचें संवर्धन करतां येईल. ज्यांना उगीचच तर्कवितर्क करून आपलें म्हणणें मांडण्याची संवय आहे अशांचीहि मनोमन खात्री व्हावयाची आहे.

याच अनुषंगाने एका गोष्टीचा उल्लेख केल्यास तें अप्रयोजक होणार नाही असें वाटतें. माझे मित्र प्रा. अ. ना. देशपांडे यांनी अकोल्याच्या सम्मेलनासाठी सूचना म्हणून 'युगवाणी'च्या याच अंकांत एक लेख लिहिला आहे. या लेखाच्या धर्तीवर त्यांनी अन्यत्रहि इतक्यांत बरेंच लिहिलें आहे. विदर्भ साहित्य संघांतील 'विदर्भ' हें नांव बदलवून त्या जागीं अधिक व्यापक असें 'मध्यप्रदेश' नांव घालावें अशी त्यांची सूचना आहे. प्रा. देशपांडे माझे मित्र आहेत. आम्ही एकाच कॉलेजांत एकाच वर्गांत बरोबरीने शिकलों. त्यांना लिहिण्याचा उत्साहहि पुष्कळ आहे. परंतु पत्रक्यामध्ये त्यांनी जें लिहिलें त्यांत त्यांची मनःस्थिति निरोगी नसल्याची खूण त्यांचा मित्र असूनहि मला आढळून आली. विदर्भ साहित्य संघाचें कार्य कोणत्या मर्यादेपर्यंत आहे हें घटनेंत नमूद आहे. वि. सा. संघ गेल्या तीन दशकांपासून स्थापन होऊन कार्य करीत आहे. त्याची "निर्मिति विसंगति व विद्रोहावर कशी आधारलेली आहे" आणि "विसंवाद आणि विद्रोह हाच आजच्या परिस्थितींत विदर्भ साहित्य संघाचा स्थायीभाव कसा आहे" हें देशपांडेच जाणोत. जे प्रश्न आज वि. सा. संघासमोर आहेत त्यांचा जेव्हां मागमूसहि नव्हता आणि मी व देशपांडे जेव्हां नुकतेच बोकिलांची भूनिती उघडायला लागलों होतों तेव्हांपासून या प्रांतांतील मराठीच्या हितचिंतकांनी ही संस्था स्थापन करून तिला नांव दिलें रूप दिलें, आकार दिला. स्वतः देशपांडे यांनीहि हें रूप आणि आकार घडविण्यांत कमी मदत केलेली नाही. एम. ए. ची पदवी घेतल्यानंतर व अध्यापक आणि जबाबदार नागरिक म्हणून स्वतः देशपांडे प्रतिष्ठित झाल्यानंतर विदर्भ साहित्य संघाचे सभासद नोंदविण्यासाठीं ते कित्येक सभासदांच्या घरीं गेलेले पुष्कळांना माहित आहेत. वि. सा. संघाच्या ज्या परीक्षा समितीला आज देशपांडे फुटीरवृत्तीचा नमुना म्हणून दूषण देत आहेत त्याच परीक्षा समितीचें आरंभीचें तिला नांवरूपाला आणण्याचें कार्य गुरुवर्य दादासाहेब बनहट्टींच्या बरोबर देशपांडे यांनी स्वतः राबून

यशस्वी रीतीनें केलेलें आहे. इतकेंच नाहीं तर ज्या ज्या वेळीं वि. सा. सं. च्या कार्यावर अन्यांकडून टीका झालेली आहे त्या त्या वेळीं देशपांडे यांनीच इतर नावा-खालीं लेख लिहून अत्यंत कडक शब्दांत समर्पक उत्तरें दिलेली आहेत. तीनचार वर्षांपूर्वी जो वि. सा. संघ त्यांना इतका आपला वाटत होता त्यांत आज "प्रति-गामी आणि प्रतिषिद्ध प्रवृत्ति" एकदम कुठून आणि कशा शिरल्या आणि त्या शिरूनहि स्वतः देशपांडे यांनी लेखणी व्यातिरिक्त अन्य साधन किंवा सौजन्ययुक्त प्रतिकाराचा दुसरा कोणताहि मार्ग कसा अवलंबिला नाही हें निरोगी लोकांना एक मोठें गूढ होऊन बसलें आहे ! आजहि देशपांडे हे संघाचे सभासद आहेत आणि संघाच्या कोणत्याहि कार्यकर्त्यांनी त्यांना संघ "प्रतिषिद्ध आणि प्रतिगामी" असल्याचें प्रत्यंतर दिलेलें नाही. त्यामुळे देशपांडे असें कां लिहितात व त्यांचें हें लिहिणें बोलणें त्यांच्या सभासदत्वाशी कसें सांधावयाचें हा प्रश्न सुसंगतीची आवड आहे त्यांना सोडविणें सोपें नाही.

प्रत्यक्ष कार्य करणें आणि हें कार्य नुसतेंच दुरून पाहून किंवा अन्य कांही व्यक्तिगत कारणांनी त्या कार्यापासून अलिप्त राहून नुसती टिका टिप्पणी करीत राहणें यांत फार फरक आहे. म्हणूनच माझ्या-सारख्या त्यांच्या मित्रालाहि असें वाटतें कीं देशपांडे यांना कांहीतरी दुखत खुपत सलत असलें पाहिजे. आणि तें बोलून दाखविणें त्यांना परवडत नसलें पाहिजे. अशा मनोवृत्तींतून देशपांडे यांनी सुचविलेला 'विदर्भ' शब्द बदलविण्याचा उपाय संघाला कितपत व्यापकता आणून देईल हा मोठा प्रश्नच आहे. नांवाने व्यापकता किंवा संकुचितता जोडतां तोडतां आली असती तर जगांतील कित्येक प्रश्न जादूची कांडी फिरल्या सारखे सुटून गेले असते. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांत आणि हितचिंतकांत भिन्न भिन्न राजकीय मतांचे लोक आहेत. आणि ही वस्तुस्थिति देशपांडे आपल्या लेखणीने नाकारीत नाहीत. त्यांत राजकीय दृष्ट्या हिंदुत्वनिष्ट आहेत, कॉंग्रेसवाले आहेत, सोशॅलिस्ट आहेत, साम्य-वादी आहेत, संयुक्त महाराष्ट्रवोल आहेत, महाविदर्भवाले आहेत. यांतील एक गोष्ट त्यांना परवडते म्हणून देशपांडे मुद्दाम विसरतात आणि ती म्हणजे ही सर्व मंडळी आपल्या मायबोलीचें हित साधण्याच्या दृष्टीने एकत्र आली असून त्यांच्या राज-कीय मतांची 'झाव' संघाला लागूं नये या बाबतींत संघाइतकीच दक्ष आहे. कुठ-ल्याहि राजकीय प्रवाह प्रलापांना वि. सा. संघांत स्थान नाही हें सर्व जाणतात आणि तत्संबंधी देशपांडेहि अजाण नाहीत. विदर्भ साहित्य संघाचें "मध्यप्रदेश साहित्य संघ" असें नामांतर करण्याची देशपांडे यांची सूचना ज्यांना फारशी विधा-यक आणि 'क्रांतिकारक' वाटत नाही त्यांना "सुजाण" न म्हणण्याचें धाडस देशपांडे करीत आहेत. धाडसाचें कौतुक करावें असा आपल्यावर बाळपणापासून

 संस्कार केला जातो. पण हें धाडस फारसें कौतुकास्पद नाही असें धाडसाची पुष्क-

ळच संयम असलेल्यानाहि निश्चितपणे वाटल्यास त्याबद्दल देशपांडे यांनी नवल वाटून घेऊं नये म्हणजे झालें !

वि. सा. संघावर या ना त्या रीतीने तुटून पडणाऱ्यांचा हिरीरीने प्रतिकार करावा असा माझा येथे हेतू नाही आणि तशा प्रकारची माझी प्रवृत्तिहि नाही. जेव्हा एखाद्या कार्यावर टीका होते तेव्हां तें कार्य चालू आहे हें आपापतः सिद्ध होत असतें. इतर टिकाकारांबद्दल लिहिलें बोलल्याने कांही विधायक घडून येईल असें नाही. देशपांडे माझे मित्र आहेत, आमच्यापैकी आहेत, आमचे आहेत आणि महत्वाची गोष्ट अशी की आमच्या मदतीला धावून येणारे आहेत. म्हणूनच हें सर्व लिहिण्याचें प्रयोजन. देशपांडे तर स्वतः अकोल्याला येतीलच पण ज्यांना संघाबद्दल, संघाच्या कार्यकर्त्यांबद्दल असंतोष आहे, जवळ न आल्यामुळे ज्यांच्या मनांत समज गैरसमज निर्माण झाले आहेत त्यांनीहि माझें सांगणें एवढेंच की आपण सर्व अकोल्याला जाऊं या आणि सर्व परिस्थिति पाहूं या.

माझी अशी खात्री आहे की एवढें केल्याने स्वच्छ आकाशांत नुसतेच ढग जमले असतील तर ते तेथील आनंदमंगल समीराच्या झोताने पांगतील आणि पुन्हा निळ्यानितळ आकाशांत चंद्राची सुषमा आपल्या मंद मधुर तेजाचा अभिषेक करील.

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष सहावें] **युगवाणी** [अंक चौथा

एप्रिल १९ १

वार्षिक वर्गणी पांच रु. सभासदांना विनामूल्य सभासदांची वर्गणी ३ रु.

संपादकीय—

विदर्भ साहित्य संघाच्या १९५० सालच्या कार्यकारी मंडळांतील संपादकाच्या हातचा हा शेवटचा अंक होय. मेचा अंक नवें कार्यकारी मंडळ नव्या उमेदीने काढील.

'युगवाणी'चे अंक सभासदांकडे नियमित जात असतात आणि सभासद जागरूकपणे 'युगवाणी'ची दखल घेत असतात हें शुभ लक्षण आहे. १९५१ सालां जानेवारीपर्यंत जे सभासद झाले त्यांच्याकडे जानेवारीपासूनचे अंक पाठविले गेले आहेत. आपलें सभासदत्व लवकर नोंदवून घेण्यासंबंधीच्या सूचना सभासदांना अनेकवार करूनहि पुष्कळ मंडळी अजून सभासद म्हणून नोंदविली गेली नाही. कितीहि उशीरा सभासद झालें तरी आपल्याला अंक मिळतीलच ही आशा या वर्षी सफल होऊं शकणार नाही कारण नवीन सभासद सारखे वाढल्यामुळे 'युगवाणी'चे १९५१ जानेवारी, फेब्रुवारी व मार्चचे अंक अजिबात संपले आहेत आणि यापुढे होणाऱ्या सभासदांना मार्चच्या पुढचेच अंक मिळूं शकतील.

विदर्भ साहित्य संघाच्या नागपूर येथील स्वतःच्या इमारतीचा कोनशिला समारंभ १५–४–५१ ला झाला. त्यानंतरच संघवार्तेची जुळवाजुळव करणें शक्य झाल्यामुळे आणि अकोल्याचें सम्मेलन याच महिन्याच्या शेवटच्या तारखांना निश्चित झाल्यामुळे प्रस्तुत अंक वाचकांच्या हातीं नेहमीपेक्षा दोनतीन दिवस उशीरा पडेल.

प्रस्तुत अंकाबद्दल एक खुलासा करावयाचा आहे. विदर्भ साहित्य संघाने जें कार्य आरंभिलें आहे त्या संबंधांत विचारवंतांनी कांही सूचना करण्यासंबंधीची विनंती मीं अगदी वेळेवर केली होती. परंतु तरीहि डॉ. पेंडसे, श्री. माधवराव कानिटकर, प्रा. देशपांडे, प्रा. शेटे, प्रा. अडोणी यांनी अक्षरशः तीन चार दिवसांत आपले लेख पाठवून संघाबद्दल जी आस्था आणि माझ्याबद्दल जो आपलेपणा दाखविला त्याबद्दल मी कृतज्ञ आहें.

प्रस्तुत अंकांत सम्मेलनाचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांच्या व्यक्तित्वाचे विशेष व्यक्त करणारे जे लेख आले ते अपरिहार्य अडचणीमुळे पुढच्या अंकासाठी मला राखून ठेवावे लागले. हा अंक फार घाईत काढावा लागला. क्षमस्व.

— वामन चोरघडे
२५–४–५१

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा

★

विदर्भ साहित्यसंघाची शक्ति मराठी भाषिकांच्या संघटनेवर आधारलेली असल्याने प्रत्येक मराठी प्रेमी नागरिकाने विदर्भ साहित्य संघाचें सभासदत्व स्वीकारणें अवश्य आहे. सभासदत्वाची वर्गणी वार्षिक फक्त रु. ३ असून मराठीबद्दल आस्था बाळगणाऱ्या कुणालाहि संघाचें सभासद होतां येतें. सभासदत्वाचें वर्ष जानेवारी तें डिसेंबर असतें.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
युगवाणी कार्यालय, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक व प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.